सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर सोमवार, ६ एप्रिल २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १२८ । पाने १२ । किंमत रु. ८/-

## विचारपुष्प



"भारत माता की जय" म्हणजे एक दुसऱ्याशी बंधुत्वाचे नाते पक्के करणे आहे. आम्ही कोणत्याही पक्षाचे, पंथाचे, प्रांताचे, जातीचे असू, पेशाने, पदाने, शिक्षणाने कुठेही असू. आपण या भारत मातेची संताने आहोत.

**- मधुभाई कुलकर्णी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# महागाई भडकणार, जीडीपी घटणार

## मध्यपूर्वेतील संघर्षाचा भारताला फटका

**नवी दिल्ली, ५ एप्रिल**

मध्यपूर्वेतील संघर्षामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होणार आहे. ऊर्जेच्या किंती आणि पुरवठ्यावरील निर्बंधांमुळे आर्थिक दबावाची शक्यता आहे. आगामी काळात महागाई वाढेल आणि अर्थव्यवस्थेचाही वेगही मंदावणार असल्याचे मुडीजच्या अहवालातून समोर आले आहे.

मध्यपूर्वेतील संघर्षामुळे भारतावर होणाऱ्या परिणामावर अहवालातून चिंता व्यक्त करताना म्हटले की, ऊर्जेच्या किंती आणि पुरवठ्यावरील निर्बंधांमुळे वाढ मंदावू शकते आणि आर्थिक दबाव वाढू शकतो. मूडीज रेटिंग्सने नवीन आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज पूर्वीच्या ६.८ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. एलपीजी पुरवठ्यातील व्यत्यय आणि इंधनाच्या किमतीतील वाढीचा देशांतर्गत परिणाम होऊ शकतो. यामुळे वाहतूक खर्च वाढेल आणि अन्नधान्याच्या महागाईवर दबाव येईल. भारत आपल्या कच्च्या तेलापैकी सुरे ५५ टक्के आणि एलपीजीपैकी ९० टक्क्यांहून अधिक पश्चिम आशियातून आयात करत असल्याने आगामी काळात याचे दूरगामी परिणाम दिसून येईल. मूडीजने नवीन आर्थिक वर्षात सरासरी ४.८ टक्के महागाई दराचा अंदाज वर्तविला आहे.

## महत्त्वाचे

### सोने, चांदीच्या वस्तूंवर सरकारची आयातबंदी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने सोने, चांदी आणि प्लॅटिनमपासून बनवलेल्या सर्व वस्तूंच्या आयातीवर तत्काळ प्रभावाने बंदी घातली आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने यासंदर्भात रविवारी प्रसिद्धीपत्रक जारी केले. मुक्त व्यापार करारांचा गैरवापर रोखणे हा या निर्बंधांचा उद्देश आहे. अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले की, सोने, चांदी आणि प्लॅटिनमपासून बनवलेल्या सर्व वस्तूंच्या आयातीसाठी करार झाला किंवा खरेदीसाठी आगाऊ रक्कम दिली गेली तरीही उपरोक्त धातूंच्या वस्तूंना भारतात प्रवेश दिला जाणार नाही. आयात निर्बंध सर्व प्रकरणांमध्ये लागू होतील. आयटीसी (एचएस) कोडच्या प्रकरण ७१ अंतर्गत येणाऱ्या सर्व वस्तूंसाठी आयात धोरण आणि अटी तत्काळ प्रभावाने बदलण्यात आल्या आहेत.

# सुनेत्रा पवार यांच्या विरोधात आकाश मोरे

## बारामतीत काँग्रेसने दिला उमेदवार

**पुणे, ५ एप्रिल**

बारामतीची विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध होईल, अशी शक्यता असतानाच सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेस मैदानात उतरली आहे. काँग्रेसने अ‍ॅड. आकाश मोरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत प्रसिद्धिपत्रकानुसार, बारामती मतदारसंघातील आगामी पोटनिवडणुकीत अ‍ॅड. मोरे हे काँग्रेसचे उमेदवार असतील.





या निर्णयाची घोषणा पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी ५ एप्रिल रोजी केली. राज्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या बारामती मतदारसंघात आता काँग्रेसने नव्या उमेदवारावर विश्वास दाखवला आहे. त्यामुळे या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे अ‍ॅड. मोरे आणि सुनेत्रा पवार यांच्यात थेट लढत होणार आहे. एकीकडे महायुतीने ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न चालवले असतानाच, दुसरीकडे काँग्रेसने आपला उमेदवार जाहीर करून महाविकास आघाडीतील बेबनाव चव्हाट्यावर आणला आहे.








सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### जगातून कम्युनिस्ट तर, देशातून काँग्रेस हद्दपार



**तिरुवनंतपूरम** : भारतात सर्वात आधी साक्षर राज्य म्हणून केरळम ओळखले गेले. येथील तरुण शिक्षित आणि बुद्धिमान आहेत, पण त्यांच्याकडे रोजगार नाही. आम्हाला असे केरळम घडवायचे आहे, जिथे तरुणांना राज्यातच रोजगार मिळेल आणि नोकरीसाठी आखाती देशात जावे लागणार नाही. जगातून कम्युनिस्ट पक्षाचे अस्तित्व संपुष्टात येत आहे आणि काँग्रेस देशातून हद्दपार झाली असल्याची टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. केरळमधील कुन्नाथुनाडू येथे आयोजित प्रचार सभेत बोलताना शाह म्हणाले, राज्यात अनेक वर्षे लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंट (एलडीएफ), युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (यूडीएफ)आळीपाळीने सत्तेत येत आहेत, पण दोन्ही पक्ष भ्रष्टाचारात सहभागी आहेत. जर खरा विकास हवा असेल, तर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली रालोआ सरकार निवडणे आवश्यक आहे.

### इमारत कोसळून ४ मृत्यू: १० गंभीर

**अनुपपूर** : मध्य प्रदेशातील अनुपपूर जिल्ह्यातील कोतमा बसस्थानकाजवळ बांधकाम सुरू असलेले तीन मजली लॉज कोसळले. या अपघातात चार मजुरांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी आहेत. त्यांना शहडोल मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी हलविले. अद्यापही अनेक लोक ढिगाऱ्याखाली दबले असून, बचावकार्य सुरू आहे. अपघाताची माहिती मिळताच राज्यमंत्री दिलीप जयस्वाल, जिल्हाधिकारी हर्षल पंचोली आणि पोलिस अधीक्षक मोती उर रहमान घटनास्थळी पोहोचले. अपघातावर मुख्यमंत्री मोहन यादव यांनी दुःख व्यक्त केले. एसडीआरएफचे शंभर जवानांचे पथक ढिगारा हटवण्यात गुंतले असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. त्यामुळे मृतक आणि जखमींचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

# आंध्रप्रदेशात इसिसशी संबंधित मॉड्युल उद्ध्वस्त

### कित्येक राज्यांत होणार कारवाई

◆ **अमरावती, ५ एप्रिल**

विदेशी सूत्रधार आणि इसिससह विविध अतिरेकी संघटनांशी संबंध असलेल्या तसेच भारतात तरुणांना कट्टरपंथी बनवण्यात सहभाग असलेले अतिरेकी मॉड्युल उद्ध्वस्त करण्यात आले, अशी माहिती गुप्तचर विभागातील एका सूत्राने रविवारी दिली.

या नेटवर्कसोबत संबंधित दक्षिणेतील तिघांना यापूर्वी अटक करण्यात आली. केवळ इतकेच नव्हे तर अशा बारापेक्षा जास्त लोकांना अटक करण्यासाठी आंध्रप्रदेश पोलिसांनी बिहार, दिल्ली, कर्नाटक, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तेलंगणा आणि राजस्थान या राज्यांमध्ये पथके तैनात केली आहे.

मुख्य आरोपी रहमतुल्लाह शरीफ आणि त्याचे साथीदार जिहादी प्रचार-प्रसार करण्यात आणि ऑनलाईन व्हिडीओंच्या माध्यमातून तरुणांना प्रवृत्त करण्यात गुंतलेल्या हस्तकांच्या संपर्कात होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. मॉड्युलचा विस्तार करण्यासाठी महिलांना एका स्वतंत्र 'खवातीन' शाखेत सामील होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले असावे, असा संशय तपासकर्त्यांना आहे.

विदेशी सूत्रधार आणि इसिस व अल-कायदा यासारख्या अतिरेकी संघटनांशी संबंध असलेले एक जिहादी मॉड्युल उघडकीस आले आहे. हे मॉड्युल भारतातील तरुणांना अतिरेकी करण्यात गुंतलेले होते, असे गुप्तचर विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. हे मॉड्युल अतिरेकी सामुग्रीचा प्रसार करायचे आणि विदेशी सूत्रधारांच्या संपर्कात होते, असे अधिकाऱ्याने सांगितले. ◀(वृत्तसंस्था)



#### ओसामा बिन लादेनचे व्हिडीओ

आरोपींनी मुस्लिम तरुणांना जिहाद आणि अतिरेकी विचारसरणीकडे वळवण्यासाठी ओसामा बिन लादेन, इसरार अहमद शेख, झाकीर नाईक आणि अन्वर अल-अव्लाखीचे व्हिडीओ प्रसारित केले.

#### समाज माध्यमांवर ४० पेक्षा जास्त खाते

या मॉड्युलने ४० पेक्षा जास्त समाजमाध्यम खात्यांच्या माध्यमातून पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया आणि बांगलादेशातील सूत्रधारांशी संपर्क साधला तसेच 'हिजरत' सुलभ करणे आणि भारतात 'खिलाफत' स्थापन करणे हा त्यांचा उद्देश असल्याचे पोलिसांना आढळले.



हिमाचल प्रदेशातील लाहौल आणि स्पिती जिल्ह्यातील अटल बोगद्याच्या उत्तर प्रवेशद्वाराजवळ बर्फाच्छादित पर्वतांचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी जमली आहे. हिमवृष्टीनंतर हा परिसर पांढऱ्या शुभ्र चादरीने झाकला असून, पर्यटकांना आकर्षित करत आहे

# काँग्रेसला केरळमधून अपेक्षा

## वायनाडने दिली गांधी घराण्याला साथ

**श्यामकांत जहागीरदार**




◆ **नवी दिल्ली, ५ एप्रिल**

पाच राज्यात होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत यावेळी केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडीला सर्वाधिक अपेक्षा आहे. त्यातच एका निवडणूक पूर्व सर्वेक्षणात काँग्रेसला डाव्या लोकशाही आघाडीपेक्षा जास्त जागा दर्शवल्यामुळे काँग्रेसच्या गोटात उत्साह संचारला आहे.

ज्या पाच राज्यात विधानसभा निवडणुका होत आहे, त्यात केरळशिवाय आसाम, पुडुचेरी, तामीळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश आहे. यात फक्त आसाममध्ये काँग्रेसचा थोडाफार प्रभाव आहे, पण तो निवडणूक जिंकण्यासाठी पुरेसा नाही. तामीळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये तर काँग्रेसची स्थिती शून्य आहे. पुडुचेरी अतिशय छोटे आणि कोणताही राजकीय प्रभाव नसलेले राज्य आहे. त्यामुळे काँग्रेसला यावेळी थोडीबहुत जी अपेक्षा आहे, ती केरळमधूनच आहे. यामुळे काँग्रेस नेत्यांचा केरळमधील प्रचारावर जोर आहे.

केरळमधून यावेळी काँग्रेसला सर्वाधिक अपेक्षा आहे, कारण २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे नेते राहुल गांधी अमेठी मतदारसंघातून पराभूत झाले होते, त्यावेळी त्यांना केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघाने मदतीचा हात दिला होता. वायनाडमधून लोकसभा निवडणूक जिंकल्यामुळे राहुल गांधी यांची झाकली मुठ सव्वा लाखाची राहिली होती. अन्यथा त्यांचे राजकीय भवितव्य पूर्णपणे धोक्यात आले असते.

२०२४ ची लोकसभा निवडणूक राहुल गांधी यांनी उत्तरप्रदेशातील रायबरेली आणि केरळच्या वायनाड मतदारसंघातून लढवली होती. यावेळी ते दोन्ही मतदारसंघातून जिंकले. २०१९ आणि २०२४ मध्ये वायनाड लोकसभा मतदारसंघात राहुल गांधी जवळपास चार लाख मतांनी जिंकले होते. नंतर राहुल गांधी यांनी वायनाड लोकसभा मतदारसंघाचा राजीनामा देत रायबरेलीची जागा आपल्याकडे कायम ठेवली होती. नंतर या वायनाड मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने प्रियांका वढेरा यांना उमेदवारी दिली आणि त्या जिंकल्याही. सध्या प्रियांका वढेरा वायनाडच्या खासदार असल्यामुळे केरळची निवडणूक काँग्रेससाठी प्रतिष्ठेची झाली आहे.

काँग्रेस आणि गांधी घराणे जेव्हा राजकीयदृष्ट्या अडचणीत आले, तेव्हातेव्हा त्यांना दक्षिण भारताने साथ दिली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने आधीच्या दोन लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत बऱ्यापैकी यश मिळवत ९९ जागा जिंकल्या. यात दक्षिण भारतातील ४२ जागांचा समावेश होता. विशेष म्हणजे या ४२ जागांत केरळमधील सर्वाधिक म्हणजे १४ जागा होत्या. दक्षिण भारतातील चार राज्यांनी साथ दिली नसती तर काँग्रेस २०२४ मध्ये ९९ वर पोहोचलीच नसती.

२०१९ मध्ये काँग्रेसने ५२ जागा जिंकल्या होत्या, त्यातील ५० टक्क्यापेक्षा जास्त म्हणजे २९ जागा दक्षिण भारतातील चार राज्यातील होत्या. २०१४ मध्ये काँग्रेसला फक्त ४४ जागा जिंकता आल्या, यातील ५० टक्क्यापेक्षा थोड्याकमी म्हणजे १९ जागा दक्षिण भारतातील होत्या.

# मतदारांच्या विश्वासघाताची गांधी घराण्याची जुनी सवय

◆ **नवी दिल्ली, ५ एप्रिल**

काँग्रेस आणि गांधी घराणे जेव्हाजेव्हा राजकीयदृष्ट्या अडचणीत आले, त्यांनी दक्षिण भारतात धाव घेतली. आणि दक्षिण भारताने त्यांचे राजकीय पुनर्वसनही करण्यात साथ दिली. मात्र प्रत्येकवेळी गांधी घराण्याने दक्षिण भारतातील जनतेचा विश्वासघात केला, हा इतिहास आहे.

१९७७ मध्ये तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा रायबरेली मतदारसंघात जनता पक्षाचे राजनारायण यांनी धक्कादायक पराभव केला. लोकसभेत पोहोचण्यासाठी इंदिरा गांधींना सुरक्षित मतदारसंघाची गरज होती. त्यावेळी कर्नाटकमधील चिकमंगळूरचे काँग्रेस खासदार चंद्रगौडा यांचा राजीनामा घेण्यात आला आणि त्या मतदारसंघात झालेली पोटनिवडणूक इंदिरा गांधींनी लढवली. माजी मुख्यमंत्री जनता पक्षाचे वीरेंद्र पाटील यांचा इंदिरा गांधींनी ७७ हजार मतांनी पराभव केला. १९८० ची लोकसभा निवडणूक इंदिरा गांधींनी आंध्रप्रदेशच्याच मेडक मतदारसंघातून लढवली आणि त्या जिंकल्या.

१९९९ मध्ये राजकारणात पदार्पण करतांना अमेठीसोबत सोनिया गांधींना सुरक्षित मतदारसंघाची गरज होती. त्यामुळे कर्नाटकमधील बेल्लारी मतदारसंघाची निवड करण्यात आली. सोनिया गांधी यांच्याविरुध्द भाजपाने दिल्लीच्या मुख्यमंत्री असलेल्या सुषमा स्वराज यांना उमेदवारी दिली. या निवडणुकीत सुषमा स्वराज यांचा पराभव झाला, सोनिया गांधी अमेठी आणि बेल्लारी अशा दोन्ही मतदारसंघातून विजयी झाल्या. दोन्ही मतदारसंघातून विजयी झाल्यामुळे सोनिया गांधींनी अमेठीची जागा कायम ठेवत बेल्लारीच्या जागेचा राजीनामा दिला. म्हणजे दक्षिण भारतातील मतदारसंघाचा गांधी घराण्याने शिडीप्रमाणे वापर केला. आपली राजकीय गरज पूर्ण झाल्यानंतर गांधी घराण्यातील नेते दक्षिण भारताला बायबाय करत उत्तर भारतात निघून गेले. २०२४ मध्ये राहुल गांधी यांनी जे केले, ते सोनिया गांधी यांनी १९९९ मध्येच केले होते. दक्षिण भारतातील जनतेचा विश्वासघात करण्याची काँग्रेसची विशेषतः गांधी घराण्यातील नेत्यांची जुनी सवय म्हटली पाहिजे. ◀(तभा वृत्तसेवा)

वर्धेत लग्नाच्या वरातीत दुहेरी हत्याकांड

# धारदार चाकूने काका-चुलत भावाचा खून

## अल्पवयीनास अटक, महिला आश्रम परिसरातील घटना

◆ **वर्धा, ५ एप्रिल**

लग्न आटोपून परत येत असलेल्या वरातीत दबा धरून असलेल्या अल्पवयीन मुलाने चुलत भावावर चाकूने सपासप वार केले. मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या काकावरही हल्ला केल्याने तेही गंभीर जखमी झाले. महिला आश्रमजवळील हनुमान मंदिर परिसरात शनिवारी उशिरा घडलेल्या या घटनेत वडील आणि मुलाचा मृत्यू झाला. याप्रकरणी शहर पोलिसांनी १७ वर्षीय अल्पवयीन मुलास अटक केली.

रितेश प्रभाकर भलमे आणि प्रभाकर भलमे अशी मृतकांची नावे आहेत. तर अल्पवयीन आरोपी हा प्रभाकर भलमे यांचा पुतण्या आहे.

म्हसाळा येथील रहिवासी गजानन वाळके यांच्या घरी विवाह सोहळा होता. बरबडी येथील रहिवासी प्रभाकर, मुलगा रितेश आणि कुटुंबीयांसह या सोहळ्याला उपस्थित होते. वायगाव (निपाणी) येथे विवाह सोहळा पार पडल्यानंतर वरातीतील सर्व सदस्य रात्री उशिरा खाजगी बसने वर्धेत पोहोचले. प्रभाकर आणि रितेश हे बॅण्ड पथक आणि कुटुंबीयांसह महिलाश्रमाजवळील हनुमान मंदिरा जवळ उतरले. प्रभाकरचा अल्पवयीन पुतण्या आधीच तिथे दबा धरून होता.

वरात येताच त्याने रितेशवर धारदार चाकूने सपासप वार केले. मुलाला वाचविण्यासाठी आलेले प्रभाकरही या हल्ल्यात जखमी झाले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे वरातीत गोंधळ सुरू झाला. जखमींना तत्काळ रुग्णालयात हलविले. मात्र, डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले.

माहिती मिळताच पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर, ठाणेदार संतोष ताले आणि इतर अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आरोपीला अटक केली. ◀(तभा वृत्तसेवा)

#### चाकूची ऑनलाईन खरेदी

आरोपीने काही दिवसांपूर्वी एका ऑनलाईन शॉपिंग साईटवरून चाकू खरेदी केला होता. गेल्या पाच वर्षांपासून आरोपी आणि मृतकांमध्ये जमिनीच्या वादातून अनेकदा खटके उडायचे. त्यामुळे वर्धा आणि सेवाग्राम पोलिस ठाण्यांमध्ये परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. मृत प्रभाकर हे स्टेशनरीचे दुकान तर त्यांचा मुलगा रितेश हा नुकताच एका कंपनीत कामाला लागला होता. आरोपी धुमाल बॅण्ड पथकात काम करतो.

### सांबात शोधमोहीम

**सांबा**: जम्मू-काश्मीरमधील सांबा जिल्ह्यातील एका गावात तीन संशयित व्यक्ती फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी रविवारी व्यापक शोधमोहीम सुरू केली. दारुई भागातील बेध खड परिसरात एका रहिवाशाने कोरड्या ओढ्याच्या काठावर या तिघांना पाहिल्याचे सांगितले.

# इस्रायलमधील सहा हजार कामगार सुरक्षित

◆ **लखनौ, ५ एप्रिल**

इस्रायलमधील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील सहा हजारांहून अधिक कामगार सुरक्षित असल्याची माहिती उत्तर प्रदेश सरकारने दिली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या निर्देशानुसार, या सर्व कामगारांवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले जात आहे. कामगार विभागाचे प्रधान सचिव डॉ. षण्मुगा सुंदरम हे इस्रायलमधील भारतीय दूतावासाच्या सातत्याने संपर्कात असून तेथील परिस्थितीचा नियमित आढावा घेत आहेत. दूतावासाकडून मिळालेल्या माहितीनुसार, इस्रायलमध्ये कार्यरत सर्व भारतीय कामगार सुरक्षित आहेत आणि सध्या कोणतीही गंभीर आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली नाही.

दरम्यान, काही भारतीय नागरिकांनी स्वेच्छेने परतण्याचा निर्णय घेतला असून त्यांना जॉर्डनमार्गे मदत करण्यात आली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# इराणमध्ये घुसून वैमानिकांची सुटका

## मोहिमेत दोन हेलिकॉप्टर, एक विमान नष्ट

◆ **वॉशिंग्टन, ५ एप्रिल**

अमेरिकेच्या सैन्याने धाडसी मोहीम राबवत इराणच्या डोंगराळ भागात अडकलेल्या दोन वैमानिकांची सुखरूप सुटका केली. इराणच्या गुप्तचर संस्थेला पत्ता न लागू देता आणि हवाई संरक्षण यंत्रणेला जाम करीत ही कारवाई करण्यात आली. ३६ तासांच्या मोहिमेनंतर दोन्ही वैमानिकांना सुखरूप आणले. अमेरिकन लष्कराच्या इतिहासातील ही एक धाडसी मोहिम होती, अशी माहिती अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. या मोहिमेदरम्यान अमेरिकन हवाई दलाचे एक मालवाहू विमान आणि दोन हेलिकॉप्टर नष्ट झाले.

वैमानिक इराणच्या धोकादायक भागात अडकले होते आणि शत्रू त्यांच्या मागावर होते. आमचे सैन्य अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेली डझनभर विमाने तैनात करण्यात आली आणि संधी मिळताच मोहीम राबवत वैमानिकांची सुटका करण्यात आली. एक अधिकारी काही प्रमाणात जखमी झाला आहे, परंतु लवकरच पूर्णपणे बरा होईल, असे ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे. इराणने अमेरिकेचे दोन लढाऊ विमाने पाडली होती. एक वैमानिक सुखरूप परतला तर दोन बेपत्ता होते. यातील एकाची सुटका शनिवारी करण्यात आली, तर दुसऱ्याला रविवारी इराणच्या हद्दीतून बाहेर काढण्यात आले.

इराणने एफ ए-१०, एफ-१५ ई लढाऊ विमान पाडल्यानंतर वैमानिक बेपत्ता होते आणि ते इराणच्या हद्दीत अडकले होते. इस्लामिक रिव्हाल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीने वैमानिकांना पकडून देणाऱ्यास बक्षीस जाहीर केले होते. ◀(वृत्तसंस्था)



इराणमध्ये अडकून पडलेल्या दोन वैमानिकांना सुखरूप बाहेर काढताना अमेरिकेला एक मालवाहू विमान आणि दोन हेलिकॉप्टर गमवावी लागली. विमान,हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा इराणने केला तर शत्रूच्या हाती पडू नये म्हणून स्वतःहा उडविल्याचा दावा अमेरिकेने केला आहे

#### ४८ तासात करार करावा

**इराणकडे करार करण्यासाठी किंवा धोरणात्मक समुद्री मार्ग पुन्हा खुला करण्यासाठी ४८ तासांचा वेळ आहे, अन्यथा त्यांच्यावर मोठा हल्ला केला जाईल. इराणमध्ये विमान पाडल्याचा आणि वैमानिक बेपत्ता असल्याचा तेहरानसोबत सुरू असलेल्या चर्चेवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे ट्रम्प यांनी स्पष्ट केले.**

#### अमेरिकेचे सी-१३० विमान पाडल्याचा इराणचा दावा

**कोसळलेल्या लढाऊ विमानातील वैमानिकाची सुटका करण्यासाठी अमेरिकेने राबवलेल्या मोहिमेदरम्यान किमान पाच जण ठार झाले, तर एका मालवाहू विमानासह अनेक हवाई वाहने नष्ट करण्यात आली, असा दावा इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्ड्सने केला आहे. पाडण्यात आलेल्या विमानांमध्ये इस्फाहानच्या दक्षिणेकडील एका सी-१३० लष्करी मालवाहू विमानाचा आणि दोन ब्लॅक हॉक हेलिकॉप्टर्सचा समावेश होता, असे इराणने सांगितले.**



# कुंभ सनातन संस्कृतीच्या सर्वसमावेशक भावनेचे प्रतिबिंब

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**नाशिक, ५ एप्रिल**

कुंभमेळा भारताच्या सांस्कृतिक मूल्याचे प्रतीक आहे. कुंभासाठी येणारा विशाल जनसमुदाय सनातन संस्कृतीच्या सर्वसमावेश भावनचे प्रतिनिधित्व करतो. यात लोक जात किंवा विचारसरणीवर आधारित कोणताही भेदभाव न करता एकत्र येतात, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

रविवारी केले. २०२७ च्या सिंहस्थ कुंभासाठी होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि भाविकांसाठी सोयी-सुविधा सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने नाशिकमध्ये व्यापक व्यवस्था केली आहे, असे फडणवीस यांनी अखिल भारतीय संत समितीच्या समारोप समारंभाला संबोधित करताना सांगितले. कुंभ ही एक अशी अद्वितीय संधी आहे, जिथे प्रत्येकजण समानतेने सहभागी होतो आणि गंगा व गोदावरीलसारख्या पवित्र नद्यांच्या माध्यमातून आध्यात्मिक शुद्धीचा शोध घेतो, असे फडणवीस यांनी सांगितले. कोणीही जात किंवा श्रद्धांबद्दल विचारत नाही; सर्वजण एकतेच्या भावनेने एकत्र येतात, असे ते म्हणाले. हा उत्सव भारताच्या सांस्कृतिक मूल्यांचे प्रतीक आहे. कोणत्याही स्वरूपात सामाजिक भेदभाव ही एक नंतर आलेली विकृती आहे, जी हळूहळू लोप पावत आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. राज्याच्या धर्मस्वातंत्र्य कायद्यांतर्गत, सक्तीचे किंवा फसवणुकीने केले जाणारे धर्मांतर रोखण्यासाठी पावले उचलली जातील, असे त्यांनी पुढे नमूद केले.

#### सरकार शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करेल

मागील काही दिवसांत राज्यातील विविध भागांत झालेल्या अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होऊन आर्थिक फटका बसलेल्या शेतकऱ्यांना सरकार सर्वतोपरी मदत करेल, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. अवकाळी पाऊस, गारपीट आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांधील १.२२ लाख हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# इराणच्या हल्ल्यात यूएईचा पेट्रोकेमिकल प्रकल्प उद्ध्वस्त

## बॅलेस्टिक क्षेपणास्त्राचा मारा, स्फोटानंतर लागली आग



◆ **अबू धाबी ५ एप्रिल**

इराणने रविवारी पहाटे संयुक्त अरब अमिराती अर्थात् युएईवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. एका एका पेट्रोकेमिकल (रासायनिक उत्पादननिर्मिती कारखाना ) प्रकल्पावर क्षेपणास्त्र आदळले. यानंतर झालेल्या स्फोटात प्रकल्पाला आग लागली. या हल्ल्यात संपूर्ण प्रकल्प उद्ध्वस्त झाला आहे. बचाव पथकाने तातडीने कर्मचाऱ्यांना बाहेर काढल्याचे त्यांचा जीव वाचला.

अबू धाबीच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, बोरूज पेट्रोकेमिकल प्रकल्पावर इराणकडून क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा करण्यात आला. हवाई संरक्षण प्रणालीने त्यांचे ड्रोन आणि क्षेपणास्त्र नष्ट केले, यातील एक क्षेपणास्त्र प्रकल्पावर कोसळल्याने आग लागली. यात प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले आहे.

सध्या प्रकल्पातील काम पूर्णपणे थांबवण्यात आले आहे. सुदैवाने, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून युएईवर हल्ला केल्याचे इराणच्या खतम अल-अंबिया केंद्रीय मुख्यालयाच्या प्रवक्त्याने सांगितले. दुसरीकडे लेबनीज संघटना हिजबुल्लाहने लेबनीज किनाऱ्यापासून ६८ सागरी मैल अंतरावरील एका इस्रायली युद्धनौकेला लक्ष्य केले. ही नौका लेबनॉनवर हल्ला करण्याच्या तयारीत होती. हिजबुल्लाहच्या प्रवक्त्याने निवेदनात म्हटले की, अनेक तासांच्या निगराणीनंतर नौदल क्रूझ क्षेपणास्त्राने इस्रायली युद्धनौकेला उद्ध्वस्त करण्यात यश आले. (वृत्तसंस्था)

### इराणच्या औद्योगिक तळाला फटका

**इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी पुष्टी केली की रविवारच्या हल्ल्यांमुळे इराणच्या औद्योगिक तळाचे मोठे नुकसान झाले आहे. इराणची ७० टक्के पोलाद उत्पादन क्षमता नष्ट करण्यात आली, ज्याचा उद्देश शस्त्रे तयार करण्याची क्षमता कमकुवत करणे होते. इराणची राजवट सध्या पूर्वीपेक्षा अधिक कमकुवत आहे.**

### इराणी, हिजबुल्लाहच्या शस्त्रसाठ्यांवर इस्रायलचे हल्ले

इस्रायली संरक्षण दलाने (आयडीएफ) प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, रविवारी पहाटेपासून इराण आणि लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या शस्त्रसाठ्यांना लक्ष्य करीत शेकडो हल्ले करण्यात आले. लेबनॉनमधील २०० हून अधिक आणि इराणच्या १४० ठिकाणांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्राचा अचूक मारा करण्यात आला. या मोहिमेचा उद्देश इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सच्या हल्ल्याची क्षमता कमकुवत करणे होते. विमानांना लक्ष्य करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या उत्पादन, साठवणूक केंद्रांना नष्ट करण्यात यश आले.



### मणिपुरात तीन बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ,५ एप्रिल**

मणिपूरच्या इम्फाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यांमध्ये तीन बंडखोरांना अटक करण्यात आली असून, भारत-म्यानमार सीमेजवळ राबवण्यात आलेल्या एका स्वतंत्र मोहिमेत १६ आयईडी जप्त करण्यात आले आहेत, असे पोलिसांनी रविवारी सांगितले.

इम्फाळच्या जुळ्या जिल्ह्यांमध्ये शनिवारी विविध ठिकाणांवरून प्रतिबंधित कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या (पीडब्ल्यूजी) तीन सदस्यांना अटक करण्यात आली. शुक्रवारी तेंग्नौपाल जिल्ह्यातील मोरे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील यांगौबुंग गावाजवळ सुरक्षा दलांनी शस्त्रे आणि स्फोटकांचा मोठा साठा जप्त केला.

या मोहिमेदरम्यान एके-४७ रायफल व त्याचे मॅग्झिन, ९ मिमी व्यासाची दोन पिस्तुले व त्याचे मॅग्झिन्स, १६ आयईडी, चार डिटोनेटर्स, एक सेफ्टी फ्युज आणि आठ बॅटरी तसेच १६,८०० क्याट्स हे म्यानमारचे चलन जप्त करण्यात आले. जप्त केलेल आयईडी घटनास्थळीच निकामी करण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# भाजपाचा विरोध मुस्लिमांना नव्हे, तर घुसखोरांना

### नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, ५ एप्रिल**

भाजपा मुस्लिमांच्या नव्हे, तर घुसखोरांच्या विरोधात आहे, असे स्पष्ट करीत केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी आसाम आणि पश्चिम बंगालमधील पक्षाच्या निवडणूक यशाबद्दल विश्वास व्यक्त केला.

आसाममधील विधानसभा निवडणुका १ एप्रिल रोजी नियोजित आहेत, तर पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान होईल आणि मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

आसाम आणि बंगाल या दोन्ही राज्यांमध्ये भाजपाचा विजय होईल, असा मला ठाम विश्वास आहे. कोणाचाही धर्म काहीही असो, सर्वांना सोबत घेऊन जाणे हे भाजपाचे धोरण आहे. आम्ही घुसखोरांच्या विरोधात आहोत. मात्र, मुस्लिमांच्या विरोधात नाही, असे गडकरी यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.



पक्षाच्या विकासाभिमुख धोरणावर प्रकाश टाकताना त्यांनी सांगितले की, पायाभूत सुविधांमधील मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक आणि सुशासनावर भर देणारा दृष्टिकोन हे भाजपाच्या प्रचार रणनीतीचे मुख्य आधारस्तंभ आहेत. आसामसह संपूर्ण ईशान्य भागात, सुमारे पाच लाख कोटी रुपयांचे प्रकल्प राबवले जात आहेत. यामध्ये सुमारे १.५ लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प यापूर्वीच पूर्ण झाले आहेत, तर १.५ लाख ते २ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सध्या प्रगतीपथावर आहेत. या व्यतिरिक्त आणखी दोन लाख कोटी रुपयांचे प्रकल्प विचाराधीन आहेत, असे गडकरी म्हणाले. (वृत्तसंस्था)

### सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पायाभूत सुविधांचे स्वरूप बदलेल

**या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आसाम आणि ईशान्य भारताच्या पायाभूत सुविधांचे स्वरूप आमूलाग्र बदलेल; हा असा प्रदेश आहे ज्याला ऐतिहासिकदृष्ट्या दळणवळणाशी संबंधित आव्हानांचा सामना करावा लागला होता, असे ते म्हणाले. सर्वसमावेशकता हाच पक्षाच्या धोरणाचा गाभा आहे, असे गडकरी यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केले. सर्वांना सोबत घेऊन चालणे हेच भाजपाचे धोरण आहे, असे ते म्हणाले. पक्षाचा विरोध घुसखोरीला असून, कोणत्याही धार्मिक समुदायाविरुद्ध नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.**

# बीएसएफ मतदार ओळखपत्र तपासणार

## शांततापूर्ण निवडणुकीसाठी आयोगाचा निर्णय

◆ **नवी दिल्ली, ५ एप्रिल**

पाच राज्यांमध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) जवान मतदार केंद्रांवर मतदार ओळखपत्र तपासतील आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवरही त्यांचे नियंत्रण असेल. निष्पक्ष आणि शांततापूर्ण निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी या राज्यांमध्ये अडीच लाख केंद्रीय निमलष्करी जवान तैनात करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.



आसाम, केरळ, पुदुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांसाठी आयोगाने केलेल्या शिफारशीवरून केंद्रीय गृहमंत्रालयाने केंद्रीय दलांची मोठ्या प्रमाणावर तैनाती केली आहे. निष्पक्ष आणि शांततापूर्ण निवडणूक पार पडावी हा यामागील उद्देश आहे. पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांदरम्याने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सेवा बजावलेला पोलिस निरीक्षक आणि त्यावरील दर्जाचा कोणताही अधिकारी कर्तव्यावर नसेल याची खात्री केली जावी. अशा अधिकाऱ्यांची यादी तयार करून त्यांची तत्काळ बदली केली जावी असे निर्देश आयोगाने बीएसएफला दिले. बीएसएफ जवान सीसीटीव्हीवर लक्ष ठेवतील. प्रत्येक मतदान केंद्रावर एक पुरुष आणि एक महिला बीएसएफ जवान तैनात केले जातील. मतदार ओळखपत्र तपासणे हे त्यांचे काम असेल. (वृत्तसंस्था)

### स्थानिक पोलिसांना वगळले

**मतदारांचे ओळखपत्रे तपासणे आणि सीसीटीव्ही नियंत्रणाच्या कामातून स्थानिक पोलिसांना वगळण्यात आले. मतदान केंद्रावरील सीसीटीव्ही दोन बीएसएफ जवानांच्या पूर्ण नियंत्रणाखाली असतील. हे कर्मचारी सीसीटीव्ही कॅमेरे व्यवस्थित कार्यरत असल्याची खात्री करतील. इतकेच नाही, तर ते सीसीटीव्ही फीड्सचे निरीक्षणही करतील. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी आरोप केला आहे की, असे आदेश देऊन निवडणूक आयोगाच्या प्रस्थापित नियमांचे उल्लंघन करत आहेत.**




# एआय-१७१ विमानाच्या ब्लॅक बॉक्सचा डेटा जाहीर करा

## अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांचे पंतप्रधानांना पत्र

◆ **अहमदाबाद, ५ एप्रिल**

'कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर' (सीव्हीआर) आणि ब्लॅक बॉक्समधील डेटा सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे, अशी मागणी २६० जणांचा बळी घेणाऱ्या एअर इंडियाच्या दुर्दैवी विमान अपघातानंतर दहा महिन्यांनी मृतांच्या शोकाकुल कुटुंबीयांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे.

१२ जून २०२५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही वेळातच लंडनच्या दिशेने निघालेले एअर इंडियाचे एआय-१७१ हे बोईंग ७८७-८ विमान एका वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृह संकुलावर कोसळले. त्यानंतर विमानाने पेट घेतला. यात विमानातील २४२ पैकी २४१ आणि जमिनीवरील १९ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या.

गुजरातमधील जवळपास ३० शोकाकुल कुटुंबांनी शनिवारी अहमदाबाद येथे भेट घेतली आणि पंतप्रधानांना पत्र लिहून, या दुर्घटनेमागील सत्य उलगडण्यासाठी सीव्हीआर आणि ब्लॅक बॉक्समधील डेटा सार्वजनिक करण्याची विनंती केली. अपघाताचे कारण काय होते आणि त्यात काही तांत्रिक बिघाड होता का, याबद्दलचे सत्य आम्हाला जाणून घ्यायचे आहे, असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

या पत्राच्या प्रती विमान अपघात तपासणी ब्युरो आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांना पाठवण्यात आल्या. ब्लॅकबॉक्समधील माहिती सार्वजनिक करणे शक्य नसेल, तर किमान ती माहिती पीडितांच्या कुटुंबीयांसोबत खाजगीरीत्या सामायिक केली जावी, असे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# ४५ सिलेंडरसह आरोपी जेरबंद

◆ **मुंबई, ५ एप्रिल**

घराघरांतून गॅस सिलेंडर चोरी करणाऱ्या एका आरोपीला पवई पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून ४५ सिलेंडर आणि तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. हा आरोपी मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे परिसरात सक्रिय असल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीला दुचाकी चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला होता. मात्र तपासादरम्यान आरोपी चोरीच्या वाहनांचा वापर करून विविध भागांतून गॅस सिलेंडर चोरत असल्याचे उघड झाले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'सुपर डुपर' : विनोद अन् हलकीफुलकी मेजवानी





**मुंबई** : मराठी सिनेसृष्टीत कौटुंबिक विनोदी चित्रपटांना नेहमीच प्रेक्षकांची पसंती मिळत आली आहे. भावनांची गुंफण, नातेसंबंधांची उकल आणि हलक्याफुलक्या विनोदाची जोड यामुळे असे चित्रपट प्रेक्षकांच्या मनात घर करतात. अशाच धाटणीचा 'सुपर डुपर' हा नवा मराठी चित्रपट ३ एप्रिलपासून चित्रपटगृहात प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांना मनोरंजनाची वेगळी अनुभूती देण्याचा प्रयत्न करत आहे. दिग्दर्शक समीर पाटील यांच्या या चित्रपटात विनोद, गोंधळ, नात्यांची गुंतागुंत आणि अनपेक्षित वळणांची रंजक मांडणी पाहायला मिळते. चित्रपटात ललित प्रभाकर आणि विदुला चौगुले यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. चित्रपटात सामाजिक वास्तवाची झलकही दिसते. परंपरा आणि आधुनिक जीवनशैलीतील संघर्ष, बदलती कौटुंबिक मूल्ये आणि संवादाची गरज हे मुद्दे दिग्दर्शकाने सहज आणि प्रभावीपणे मांडले आहेत. विशेष म्हणजे, या सर्व विषयांना उपदेशात्मक सूर न देता हलक्याफुलक्या शैलीत सादर करण्याचा प्रयत्न चित्रपटात जाणवतो.

### प्रियांका चोप्रा राघवांच्या पाठीशी

**मुंबई** : 'आप'ने मोठा निर्णय घेतांना राघव चड्ढा यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवले असून त्यांच्या जागी अशोक मित्तल यांची नियुक्ती केली. या निर्णयानंतर राघव चड्ढा यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना 'मला गप्प बसवले गेले आहे, हरवले नाही' असे ठाम शब्दांत सांगितले. या घडामोडीनंतर राघव चड्ढा यांनी संसदेत उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांचा एक व्हिडिओ शेअर केला. शिक्षण आणि रोजगारातील तफावत, 'वन नेशन, वन ट्रीटमेंट', वेतन निर्देशांक आणि भगतसिंग यांना भारतरत्न देण्याची मागणी यांसारख्या विषयांचा या व्हिडिओमध्ये समावेश आहे. त्यांनी हा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर शेअर करत केवळ भारतीय तिरंग्याचा इमोजी वापरला, ज्यातून सध्याच्या राजकीय वादाच्या पार्श्वभूमीवर शांत पण ठाम संदेश देण्याचा प्रयत्न दिसतो. या व्हिडिओवर प्रतिक्रिया देताना प्रियांका चोप्रा हिने कमेंट सेक्शनमध्ये हार्ट-आयज आणि टाळ्यांचे इमोजी पोस्ट करत राघव चड्ढा यांना पाठिंबा दर्शवला आहे. राघव चड्ढा यांनी अभिनेत्री परिनीती चोप्रा हिच्याशी विवाह केला असून, प्रियांका चोप्रा ही तिची चुलत बहीण आहे.

### ४८ अंश सेल्सिअस तापमानात चित्रीकरण



**मुंबई** : धुरंधर-२ हा चित्रपट सध्या धुमाकूळ घालत असून अजूनही प्रेक्षकांच्या उड्या पडत आहेत. या चित्रपट निर्मितीबाबतच्या सुरस कथा आता बाहेर येत आहेत. अभिनेता रणविरसिंगने तब्बल ४७-४८ अंश सेल्सिअस तापमानात शुटिंग केले असल्याची माहिती चित्रपटाचे मेकअप आणि प्रोस्थेटिक आर्टिस्ट करनदीप सिंग यांनी दिली. विशेष म्हणजे लेदर जॅकेट आणि विग घालून शूटिंग केली होती, असे त्यांनी सांगितले. चित्रपटाच्या क्लायमॅक्स सीनच्या शूटिंगला जवळपास १५ ते २० दिवसांचा कालावधी लागला होता. पंजाबमधील लुधियाना शहराच्या बाहेरील भागात हे चित्रिकरण झाले होते आणि त्यावेळी तेथील तापमान तापमान ४७-४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. दृश्य एका औद्योगिक सेटअपमध्ये चित्रित करण्यात आले होते. आजूबाजूला ना कोणते झाड होते ना सावलीसाठी एखादा आडोसा. सेटवर पंखे आणि एसी होते, पण प्रचंड उष्णतेमुळे ते फारसे प्रभावी ठरत नव्हते. यावेळी जेवण करणेही कठीण झाले होते.

# सत्तेवर येताच सरमा यांना तुरुंगात पाठवू

## राहुल गांधींचा आसामच्या मुख्यमंत्र्यांना इशारा

◆ **गुवाहटी, ५ एप्रिल**

आसाममध्ये काँग्रेस सत्तेवर आल्यास मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांना तुरुंगात पाठवले जाईल आणि त्यांनी माफी मागितली तरीही त्यांना सोडले जाणार नाही, अशा शब्दात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी प्रचारसभेतून हल्लाबोल केला.

आसाममधील बिस्वनाथ येथे एका निवडणूक सभेला संबोधित करताना, राहुल गांधी यांनी भाजपप्रणीत केंद्र सरकार आणि राज्याचे मुख्यमंत्री सरमा यांच्यावर टीका करताना ते म्हणाले, आसामची सूत्रे खऱ्या अर्थाने दिल्लीच्या हातात आहे. भविष्यात काँग्रेस भ्रष्टाचार आणि महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यांवर आपला संघर्ष अधिक तीव्र करेल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष पंतप्रधान मोदी यांना नियंत्रित करतात आणि आसामच्या मुख्यमंत्र्यांना गृहमंत्री अमित शाह नियंत्रित करत आहेत. सरमा यांनी भ्रष्टाचारात आपल्या कुटुंबाला गोवून त्यांनी मोठी चूक केली आहे. आता त्यांच्या कुटुंबावरही आरोप लावले जातील आणि काँग्रेस सत्तेत आल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करेल. (वृत्तसंस्था)



आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी निमलष्करी दलाच्या तुकड्या रवाना करण्यात आल्या आहेत. अयोध्या येथून जात असताना या जवानांनी रामलल्लाचे दर्शन घेतले

# ऑईल इंडियाने वाढवले कच्च्या तेलाचे उत्पादन

## थारच्या वाळवंटातून दररोज १२०२ बॅरल्स



◆ **जयपूर, ५ एप्रिल**

वाढता भू-राजकीय तणाव आणि जागतिक तेल बाजारातील अनिश्चिततेच्या पृष्ठभूमीवर ऑईल इंडिया लिमिटेडने राजस्थानमधीर थारच्या वाळवंटातून होणारे कच्च्या तेलाचे उत्पादन लक्षणीयरीत्या वाढवले असून, जोधपूर सँडस्टोन फॉर्मेशनमधून दररोज १,२०० बॅरल्स इतक्या विक्रमी उत्पादनाची नोंद केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

या सरकारी मालकीच्या कंपनीने मागील वर्षीच्या दररोज ७०५ बॅरल्सच्या तुलनेत आपले उत्पादन सुमारे ७० टक्क्यांनी वाढवले आहे. देशांतर्गत उत्पादन वाढवण्याच्या आणि ऊर्जा सुरक्षा बळकट करण्याच्या प्रयत्नांमधील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

जैसलमेरमधील बाघेवाला क्षेत्रात उत्पादित होणारे कच्चे तेल टँकर्सद्वारे गुजरातच्या मेहसाणा येथील तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाच्या (ओएनजीसी) केंद्रापर्यंत वाहून नेले जाते आणि तिथून ते पाईपलाईनद्वारे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे (आयओसीएल) चालवल्या जाणाऱ्या 'कोयाली' शुद्धीकरण प्रकल्पाकडे पाठवले जाते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ऑईल इंडियाच्या राजस्थान क्षेत्रातील कच्च्या तेलाचे वार्षिक उत्पादन ४३,७७३ मेट्रिक टनांवर पोहोचले. हे प्रमाण मागील वर्षातील ३२,७८८ मेट्रिक टनांच्या तुलनेत वाढले असून, तांत्रिक प्रगती आणि कार्यक्षम कामकाजामुळे साध्य झालेली ही भक्कम वाढ दर्शवते.

हे यश आधुनिक पुनर्प्राप्ती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मिळाले आहे. यात चक्रीय बाष्प उत्तेजना (सायक्लिक स्टीम स्टिम्युलेशन) या उच्च स्निग्धता असलेल्या कच्च्या तेलाच्या निष्कर्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या औष्णिक वर्धित तेल पुनर्प्राप्ती पद्धतीचा समावेश आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. विशेषतः थार प्रदेशातील आव्हानात्मक भूशास्त्रीय परिस्थितीचा विचार करता, ही एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. भारताच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यात अपारंपरिक संसाधनांमध्ये असलेली क्षमता यातून अधोरेखित होते, असे एका अधिकाऱ्याने म्हटले.

राजस्थान खोऱ्यातील बिकानेर-नागौर उपखोऱ्यातील बाघेवाला तेलक्षेत्र हे देशातील मोजक्याच भूभागावरील जड तेलक्षेत्रांपैकी एक आहे. ऑईल इंडियाने १९ विहिरींमध्ये सीएसएस ऑपरेशन्स पूर्ण केले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत हे जवळपास ७२ टक्क्यांनी जास्त आहेत आणि या वर्षात १३ नवीन विहिरींचे उत्खनन केले आहे. यांची संख्या मागील वर्षाच्या नऊ विहिरींच्या तुलनेत वाढली आहे. (वृत्तसंस्था)

### कच्च्या तेलाची उच्च स्निग्धता

**उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी कंपने फिशनोब ड्रिलिंग आणि बेअरफूट कम्प्लिशन यासारख्या प्रगत ड्रिलिंग आणि उत्पादन तंत्रज्ञानाचाही वापर केला आहे. हे तंत्रज्ञान भारतातील जड तेलाच्या साठ्यांमध्ये प्रथमच वापरले जात आहे. यासोबतच इलेक्ट्रिक डाऊनहोल हीटर्स, हायड्रॉलिक सकर रॉड पंप आणि उच्च तापमानाती थर्मल वेलहेड्सचाही वापर केला जात आहे. या क्षेत्रातील कच्च्या तेलाच्या उच्च स्निग्धतेमुळे पारंपरिक पद्धतीने ते काढणे व्यवहार्य नव्हते. त्यामुळे डायल्युएंट इंजेक्शन आणि आर्टिफिशियल लिफ्ट सिस्टिम यासारख्या नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करण्यास प्रवृत्त व्हावे लागेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.**

### बनावट औषधांचा साठा जप्त; सहा अटकेत

◆ **नवी दिल्ली, ५ एप्रिल**

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने आंतरराज्यीय बनावट औषधांच्या रॅकेटचा पर्दाफाश करत सहा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत सुमारे १ लाख २० हजार बनावट गोळ्या आणि कॅप्सूल जप्त करण्यात आल्या असून, कोट्यवधी रुपयांचा अवैध व्यवसाय उघडकीस आला आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे ११ मार्च २०२६ रोजी शाहदरा येथील बिहारी कॉलनीत छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान भागीरथ पॅलेस परिसरात 'बाबा श्याम मेडिकोज' नावाचे दुकान चालवणाऱ्या निखिल अरोरा उर्फ सनी याला अटक करण्यात आली. पुढील तपासात शिवम त्यागी, मयंक अग्रवाल, मोहित शर्मा, शाहरुख आणि राहुल या इतर आरोपींनाही ताब्यात घेण्यात आले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# दक्षिणेचे संकेत

स्थानिक स्वराज्य संस्था असो की विधानसभा वा लोकसभा, दक्षिण भारतात भारतीय जनता पक्षाला सातत्याने अग्निदिव्यातून सामोरे जावे लागत आहे. कर्नाटक वगळता केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला दक्षिणेत सतत संघर्ष करावा लागला. पक्षाचा जो काही प्रभाव होता, तो फक्त कर्नाटक राज्यातच. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी करताना ७१ जागा जिंकल्या. लिंगायत मतदारांनी दाखविलेल्या विश्वासामुळे उत्तर कर्नाटकात घवघवीत यश प्राप्त केले. पण, ही कामगिरी केवळ शहरी भागापुरतीच मर्यादित होती. ग्रामीण भागात मात्र, जनता दल आणि काँग्रेसची स्थिती मजबूत होती. काँग्रेस आणि जनता दल (धर्मनिरपेक्ष) यांनी सरकार स्थापन केले. तथापि, जनतेमध्ये भारतीय जनता पक्षाची लोकप्रियता वाढली. २००४ मध्येच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने मोठे यश प्राप्त करीत तब्बल १८ जागा जिंकल्या. २००८ मध्ये झालेली विधानसभा निवडणूक भाजपासाठी दक्षिणेतील विजयाचे द्वार उघडणारी ठरली. केंद्र सरकारमधील यूपीए आघाडी सरकारमधील भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे बाहेर येत असल्याने काँग्रेस आणि सहकारी पक्षांविषयी जनतेमध्ये चीड निर्माण झाली होती. याच पृष्ठभूमीवर कर्नाटकात भाजपासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले. मे २००८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने २२४ पैकी ११० जागा जिंकत सहा अपक्ष आमदारांच्या मदतीने दक्षिणेत पहिल्यांदा सत्ता स्थापन केली. त्यानंतर पक्षाच्या कामगिरीत चढउतार येत राहिले. २०१३ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यावेळी फक्त ४० जागा मिळाल्या, पण पुढच्याच म्हणजे २०१८ मध्ये भाजपाने १०४ जागा जिंकत मुसंडी मारली आणि सत्ता स्थापन केली. २०२३ च्या निवडणुकीत पुन्हा पराभवाला सामोरे जावे लागले. दक्षिणेत भारतीय जनता पार्टीला शून्यातून सुरुवात करावी लागली. स्वातंत्र्यानंतर बराच काळ काँग्रेसचीच सत्ता राहिल्याने कार्यकर्त्यांची फळी निर्माण करण्याचे मोठे आव्हान भाजपासमोर होते. भाजपाच्या स्थापनेनंतर शहरी भागात जम बसविण्यास प्रारंभ केला. याच आधारावर १९८९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने चार जागांपर्यंत मजल मारली. त्यानंतर मात्र भाजपाने कधीही मागे वळून पाहिले नाही.

दक्षिणेत कर्नाटक वगळता भाजपाला अन्य राज्यांमध्ये एकदाही सत्तेच्या आसपासही जाता आले नाही. कारण, दक्षिणेतील राजकारण हे प्रादेशिकतेकडे जास्त झुकलेले असते. त्याला भाषा आणि सांस्कृतिक वादाची किनार आहेच. भारतीय जनता पार्टी म्हणजे हिंदी भाषिकांचा आणि उत्तर भारतीयांचा पक्ष असल्याचे मतदारांच्या मनावर बिंबविण्यात आले आहे. तामिळनाडूतील राजकारण सातत्याने द्रमुक आणि अद्रमुक या दोन पक्षांभोवतीच केंद्रित राहिले आहे. १९८० पासूनच्या विधानसभा निवडणुकीची आकडेवारी पाहता गेल्या ४५ वर्षांत भाजपाला कधीही दोन आकडी संख्या गाठता आली नाही. ही स्थिती फक्त भाजपाचीच आहे असे नाही. काँग्रेसलाही १९६७ नंतर तामिळनाडूत सत्ता स्थापन करता आली नाही. द्रविडी अस्मिता, हिंदी आणि हिंदुत्वाला विरोध हे तामिळनाडूतील राजकारणाचे मुख्य आधार राहिले आहेत. म्हणूनच द्रविड मुनेत्र कळघम आणि अखिल भारतीय अण्णा द्रमुक हे दोन पक्षच आळीपाळीने सत्तेवर येत असतात. पेरियार ई. व्ही. रामास्वामी यांनी १९४४ मध्ये द्रविड कळघम हा पक्ष स्थापन केला. त्यांची हिंदीविरोधी भूमिका अत्यंत टोकाची होती. सी. एन. अण्णादुराई आणि पेरियार हे दोघेही कट्टर द्रविड अस्मितेला मानणारे नेते होय. पण, कालांतराने या दोन नेत्यांमध्ये टोकाचे मतभेद निर्माण झाले. पेरियार यांचा तर हिंदीला कट्टर विरोध होता. त्यांनी द्रविडनाडू नावाच्या स्वतंत्र राज्याची मागणी केली होती. तसेही दक्षिणेत सातत्याने प्रादेशिक पक्षांचेच वर्चस्व राहिले आहे. येथील मतदार अजूनही द्रविडी अस्मितेतून बाहेर पडलेले नाहीत. त्यामुळेच दक्षिणेत काँग्रेस, भाजपासह अन्य राष्ट्रीय पक्षांना बस्तान बसविता आले नाही.

१९६७ पासूनची राजकारणाची स्थिती पाहता काँग्रेसला सातत्याने द्रमुकला पाठिंबा देण्याची भूमिका घ्यावी लागली तर भाजपानेही एआयडीएमकेसोबत युती केली. गेल्या निवडणुकीत युतीत लढल्यानंतरही भाजपाला अवघ्या चार जागा मिळाल्या. या निवडणुकीत अण्णा द्रमुकसोबत युती केली असून भाजपा २७ जागांवर लढत आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी भारतीय जनता पक्षासाठी अनुकूल वातावरण आहे. केंद्रातील राजकीय परिस्थितीचा प्रभावही पडण्याची शक्यता आहे. तामिळनाडूतील राजकारण द्वि-ध्रुवीय आहे. जयललिता यांच्या निधनानंतर राज्यात निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढणारे नेतृत्व निर्माण झालेले नाही. दुसरीकडे द्रमुककडे स्टॅलिन यांच्या रूपात सशक्त पर्याय उभा आहे. मात्र, स्टॅलिन यांनी हिंदी आणि हिंदुत्वविरोधी भूमिका घेतल्याने त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. थिरुप्पारकुंद्रम येथील कार्थिगल दीपम् मुद्यावरून तामिळनाडूचे राजकारण तापले होते.

मदुराईजवळ थिरुप्पारकुंद्रम टेकडीवर प्राचीन सुब्रमण्यमस्वामी मंदिर आहे. या मंदिरावर असलेल्या एका पवित्र स्तंभावर दीप लावण्याची परंपरा कित्येक वर्षांपासून चालत आलेली आहे. याच मंदिराजवळ दर्गा आहे. दर्गा जवळ असल्याने मुस्लिमांच्या भावना दुखावल्या जातील म्हणून द्रमुक सरकारने दीप लावण्यास विरोध केला. जेथे जेथे प्राचीन मंदिरे आहेत त्याच्या आसपास मशिदी, दर्गे उभारल्याची शेकडो उदाहरणे आपल्याला देशभरात दिसून येतात. हे प्रकरण तामिळनाडू हायकोर्ट आणि अगदी सुप्रीम कोर्टापर्यंत गेले. दोन्ही न्यायालयांनी राज्य सरकारला फटकारताना परंपरेनुसार दीप लावण्याची परवानगी दिली. या मुद्यावरून तामिळनाडूतील राजकारण ढवळून निघाले होते. अण्णा द्रमुकने सतत दोनवेळा सत्ता स्थापन केल्यानंतर द्रमुकची सत्ता आली. २३ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. राज्यातील वातावरण पाहता यावेळी अद्रमुक-भाजपा युतीचे सरकार येण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. केरळ हे आणखी सागरी किनारी असलेले राज्य, जेथे भाजपाला कठोर परिश्रमाला सामोरे जावे लागत आहे. येथील राजकारण हे हिंसक प्रवृत्तीचे आहे. विरोधकांना जिवानिशी संपविण्याचे प्रयत्न अनेकदा झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची हत्या करण्यात आली. केरळमध्ये मुस्लिम आणि ख्रिश्चनांची एकत्रित लोकसंख्या ४५ टक्क्यांच्या जवळ आहे. हिंदू ५४.७० टक्के आहेत. लोकसंख्येची ही आकडेवारी २०११ च्या जनगणनेनुसार आहे. २००१ ते २०११ या काळात मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचा दर १२.२३ टक्के एवढा होता. हिंदूंचा २.२३ तर ख्रिश्चनांचा १.३८ टक्के एवढा होता. हीच दरवाढ कायम राहिली असल्यास पूर्वोत्तर राज्यांप्रमाणेच केरळमध्येही हिंदूधर्मीय अल्पसंख्यक होण्याच्या स्थितीत पोहलेले असतील. २०१६ मध्ये भाजपाचा पहिला आमदार नेमोम मतदारसंघातून निवडून आला होता. पण, २०२१ च्या निवडणुकीत भाजपाचा थोड्या मतांनी पराभव झाला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुरेश गोपी यांनी इतिहास घडविला. थ्रिसूर लोकसभा मतदारसंघातून त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या उमेदवाराचा जवळपास पाऊण लाख मतांनी पराभव केला. केरळच्या संसदीय इतिहासात गोपी हे भाजपाचे निवडून येणारे पहिले खासदार ठरले. गोपी हे लोकप्रिय मल्याळम अभिनेते असून सध्या ते केंद्रात पेट्रोलियम राज्यमंत्री आहेत. २०२५ मध्ये झालेल्या स्थानिक निवडणुकीत ऐतिहासिक कामगिरी करताना भाजपाने तिरुवनंतपुरम् महापालिका जिंकली आहे. याशिवाय २६ ग्रामपंचायती आणि दोन नगरपरिषदांमध्येही विजय मिळविला आहे. या राज्यातील मुस्लिम मतदार मुस्लिम लीग अथवा काँग्रेसला मतदान करतात तर ख्रिश्चन हे डाव्यांच्या पाठीशी उभे राहतात. पण, हिंदू मतदार काँग्रेस आणि डावे पक्ष यांच्यात विभागले जातात. यावेळी मात्र चित्र वेगळे दिसत असून हिंदू मतदारही जागृत होत आहेत ज्याचे परिणाम ५ मे रोजी जाहीर होणाऱ्या निकालातून उमटतील, अशी आशा आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# ‘होर्मुझ’ - इराणचे अण्वस्त्र!

दीवार! चार दशकांपूर्वी गाजलेल्या अमिताभ बच्चन व शशी कपूर यांच्या या चित्रपटात एक संवाद आहे. एक भाऊ म्हणजे अमिताभ बच्चन दुसऱ्याला विचारतो, ‘‘मेरे पास गाडी, बंगला, पैसा सब कुछ है, तेरे पास क्या है?’’ दुसरा भाऊ शशी कपूर उत्तर देतो, ‘‘मेरे पास मां है!’’

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प आमच्याजवळ अब्राहम लिंकन, ट्रिपोली, फोर्ड यासारखी अजस्त्र विमानवाहू जहाजे आहेत, अत्याधुनिक विमाने आहेत. पाणबुड्या आहेत. इराणजवळ असे काहीच नाही असे म्हणत आहेत. आणि याला इराणचे उत्तर आहे, ‘‘आमच्याजवळ ‘होर्मुझ’ आहे.’’

**इराणचे अण्वस्त्र :** एका महिन्यापासून सुरू असलेल्या आखाती युद्धात होर्मुझ सामुद्रधुनी इराणचे एक प्रकारचे अण्वस्त्र सिद्ध होत आहे. इराणचे हे अण्वस्त्र, हा हुकमी एक्का अद्याप तरी अमेरिकेला ताब्यात घेता आलेला नाही. तो ताब्यात घेण्यासाठी राष्ट्रपती ट्रम्प यांनी घालून दिलेली नवी मुदत आज ६ एप्रिल रोजी संपत आहे. अमेरिका-इस्रायल यांनी इराणच्या आण्विक संयंत्रांवर पुन्हा हल्ला चढवून त्याचे आणखी काही घटक उद्ध्वस्त केले आहेत. आण्विक संयंत्रात ‘हार्ड वॉटर प्लँट’ नावाचा एक भाग असतो. तो आता उद्ध्वस्त केल्याचा दावा इस्रायलने केला आहे. मात्र या देशांना इराणचे होर्मुझ नावाचे अण्वस्त्र अद्याप निकामी करता आलेले नाही.

**होर्मुझ देवता :** इराणसाठी होर्मुझ म्हणजे साक्षात देवता. पर्सियन देवतेच्या नावावरून ओळखली जाणारी ही सामुद्रधुनी फक्त कच्चे तेल व नैसर्गिक वायू यासाठी महत्त्वाची आहे हा एक गैरसमज. होर्मुझची सामुद्रधुनी म्हणजे इराणच्या हाती असलेला जागतिक अर्थव्यवस्थेच्या हृदयाचा असा एक व्हॉल्व्ह आहे, जो तो गॅस सिलेंडरचा व्हॉल्व्ह बंद वा खुला करावा अशा सहजतेने बंद वा खुला करू शकतो. याचाच वापर त्याने या युद्धात केला आहे. भारतासह आपल्या मर्जीतील देशाच्या तेलवाहक जहाजांना त्याने होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवेश दिला आहे तर विरोधी देशांना त्याने या सामुद्रधुनीत अद्याप तरी पाय ठेवू दिलेला नाही.

**उद्योग आणि शेतीही :** होर्मुझच्या सामुद्रधुनीतून दर १५ मिनिटांनी एक जहाज जात असते. ते फक्त कच्चे तेल व नैसर्गिक वायू याचे नसते. होर्मुझ बंद झाल्याने जगातील औद्योगिक उत्पादन तर प्रभावित होणार आहेच शिवाय कृषी उत्पादनालाही याचा फटका बसणार आहे. जगाच्या एकूण युरियापैकी ५० टक्के युरियाची वाहतूक या सामुद्रधुनीतून होत असते. ३० टक्के अमोनिया, ५० टक्के सल्फर, २० टक्के फॉस्फेट याचीही वाहतूक होर्मुझमधून होत असते. मार्च महिन्यात ही सामुद्रधुनी बंद असण्याचा अर्थ म्हणजे सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या शेती उत्पादनात घट.



**अरब कालवा? :** पर्सियन आखात आणि ओमान आखात यांना जोडणारी होर्मुझ सामुद्रधुनी हा इराणचा हुकमी एक्का आहे हे अमेरिका, ब्रिटन, खाडी देश यांच्या लक्षात आल्यानंतर त्याला पर्याय शोधण्याचे अनेक प्रयत्न मागील पन्नास वर्षांत झाले. त्यातील एक प्रयत्न होता अरब कालवा तयार करण्याचे. पनामा कालवा, सुएझ कालवा या धर्तीवर एक कालवा तयार करावयाचा व होर्मुझ सामुद्रधुनीचे महत्त्व संपवायचे यासाठी काही विचार करण्यात आला, नकाशे काढण्यात आले. संयुक्त अरब अमिरात व ओमान यांना या कालव्याने जोडण्यात यावे आणि एकप्रकारे इराणचे कंबरडे मोडावे अशी ही योजना होती.

**नकाशा तयार :** एकीकडे इराणची सीमा तर दुसरीकडे संयुक्त अरब अमिरात व ओमान यांचा किनारा. ओमानचा एक भाग इराणच्या सीमेनजीक आला आहे. त्याच्या मधोमध हा कालवा तयार करण्याची योजना कागदावर तर आखण्यात आली, पण ती लागू करणे आजवर कुणालाही शक्य झालेले नाही. कारण त्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी.

**महाकाय योजना :** कॅरेबियन समुद्र व प्रशांत महासागर यांना जोडण्यासाठी ८३ किलोमीटर लांबीचा पनामा कालवा बांधण्यात आला. या दोन समुद्राच्या पाण्याच्या पातळीत फरक होता. यासाठी सहा दरवाजे उभारून पाण्याची पातळी खाली-वर करण्याची सोय करण्यात आली तर लाल समुद्र व भूमध्यसागर यांना जोडणाऱ्या सुएझ कालव्यात असे काहीही करावे लागले नाही. मात्र, प्रस्तावित अरब कालव्यात पाण्याची पातळी साधण्यासाठी शेकडो दरवाजे उभे करावे लागणार होते. आणि हे करणे तंत्रज्ञांसाठी जवळपास अशक्य होते.

**१७५ किलोमीटरची लांबी :** संयुक्त अमिरात व ओमान यांना जोडून थेट अरबी समुद्रात उतरणारा हा कालवा १७५ किलोमीटरचा असेल असे सांगण्यात आले होते. पण, यावर होणारा अफाट खर्च, त्याची सुरक्षा व अतिशय दुर्गम भूभाग या तीन कारणांमुळे कालव्याचे काम सुरू होऊ शकले नाही. या कालव्याच्या रचनेत सर्वांत मोठी अडचण होती इराणची. हा सारा कालवा इराणी प्रक्षेपणास्त्रांच्या टप्प्यात येत होता. कालवा पूर्ण झालाच तर त्यातून जाणाऱ्या जहाजांना कोण व कशी सुरक्षा पुरविणार हा सर्वांत मोठा प्रश्न होता. अरब कालवा हा पृथ्वीतलावरील सर्वांत मोठा प्रकल्प राहणार होता. साऱ्या पृथ्वीतलावर असलेल्या प्रकल्पांमध्ये जेवढ्या खडक-मातीची उलथापालथ झाली, त्याहून अधिक मोठी उलथापालथ या एका प्रकल्पात होणार होती. नवा कालवा तयार करण्यात असणारी सर्वांत मोठी अडचण म्हणजे ज्या भागातून कालवा काढला जाण्याचा प्रस्ताव होता, तो भाग डोंगराळ आहे. हाजर पर्वतीय शृंखला या भागातून जात आहे, काही ठिकाणी या पर्वतांची उंची ३ हजार मीटर एवढी आहे. हा सर्व भाग तोडून कालवा काढणे ही एक अशक्यप्राय अशी बाब आहे असे तज्ज्ञांना वाटते.

**दोन लाख कोटी :** २००८ च्या अंदाजानुसार या प्रकल्पावर दोन लाख कोटी रुपये लागणार होते. आता तर ही राशी अधिक मोठी झाली असणार. शिवाय प्रकल्प पूर्ण होण्यासाठी किमान १५ वर्षांचा कालावधी लागणार होता. त्यासाठी लागणारा पैसा उभा करण्याची ताकद संयुक्त अरब अमिरातीत होती. पण, एवढी मोठी गंतुवणूक केल्यानंतर त्याची सुरक्षा धोक्यात येणार असेल तर या गुंतवणुकीबाबत फेरविचार केलेला बरा असा विचार करून स्थानिक शासकांनी त्यात फारशी रुची घेतली नाही.

**पाईपलाईनचा पर्याय :** नवा कालवा तयार न करता एक मोठी पाईपलाईन टाकून त्यातून कच्च्या तेलाची वाहतूक करावी असाही एक पर्याय सुचविण्यात आला होता. वास्तविक अशी पाईपलाईन अगोदरच टाकण्यात आली आहे. सौदी अरेबियाने टाकलेल्या पाईपलाईनची दररोजची क्षमता ७० लाख बॅरलची आहे तर अबू धाबीने टाकलेल्या पाईपलाईनची क्षमता १५ लाख बॅरल एवढी आहे. मात्र, खाडी संकट सुरू होण्यापूर्वी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज १७० लाख बॅरल तेलाची वाहतुक होत होती. म्हणजे पाईपलाईनची क्षमता किती कमी आहे याचा अंदाज करता येईल. दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे युरिया, अन्य रासायनिक खते, अल्युमिनियम याची वाहतूक कशी करणार?

**होर्मुझची सुरक्षा :** होर्मुझ सामुद्रधुनी हा आपला हुकमी एक्का आहे हे इराणला माहीत असल्याने त्याने होर्मुझच्या सुरक्षेची कडेकोट व्यवस्था केली असल्याचे सांगितले जाते. या भागात पाण्याची पातळी उथळ म्हणजे ३०० मीटरच्या आसपास आहे. तेथे इराणने भूमिगत म्हणजे पाण्याच्या खाली बोगदे बांधून त्यात आपली क्षेपणास्त्रे सज्ज ठेवली आहेत. आखाती भागात युद्ध सुरू होऊन एक महिना लोटला आहे. अद्याप तरी होर्मुझ नावाच्या देवतेने इराणचे रक्षण केलेले दिसते. राष्ट्रपती ट्रम्प या देवतेला कसे पराभूत करणार? सारे जग श्वास रोखून याकडे पाहणार आहे.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# कामधेनूला वाचवा अन् बायोगॅस वाढवा!

सर्व इच्छा पूर्ण करणारी दैवी गाय म्हणजे कामधेनू होय. आज मात्र ही कामधेनू स्वार्थी लोकांमुळे कत्तलखान्यात जात आहे. तिला वाचविल्यास भारतात बायोगॅस प्रकल्प वाढतील. मग जगाच्या पाठीवर कुणाचेही युद्ध होवो, आपल्याला स्वयंपाक करण्यासाठी आवश्यक असलेल्या एलपीजीवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही. एवढी मोठी शक्तियुक्त ऊर्जा या कामधेनूला वाचविल्याने निर्माण होऊ शकते. म्हणूनच की काय ग्रामगीतेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ‘गायी विकोनि पोट भरलें । मग नित्यासाठी खाईल कुठले? पोट बांधोनि गायीस पोषिले । त्यास लाभले सौख्य पुढे ॥ गोरक्षणी स्वरक्षण । ऐसे पूर्वजांचे कथन । म्हणोनीच गायींकरिता प्राण । दिले अनेक शूरांनी ॥ असे म्हणत गाईचे महत्त्व अधोरेखित केले आहे. दूरदृष्टी ठेवत राष्ट्रसंतांनी गाईंचे महत्त्व सांगितल्यावरही आज कामधेनू नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. तसे पाहता गाईच्या शेणापासून आणि मानवी विष्ठेचा उपयोग करून बायोगॅस तयार होतो. यात मिथेन, कार्बन डायऑक्साईडसह अल्प प्रमाणात हायड्रोजन सल्फाईड देखील असतो. यातून स्वच्छ इंधन मिळते. याचा वापर स्वयंपाकासाठी व वीज निर्मितीकरिता केला जातो.



ग्रामीण भागात गॅस टंचाईवर उपाय म्हणून बायोगॅस अत्यंत उपयुक्त ठरत आहे. कोल्हापूर जिल्ह्यात १ लाखांपेक्षा जास्त बायोगॅस युनिट्स कार्यरत आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने गोबरधन प्रकल्प राबविले जात आहेत. त्यातून बायोगॅस व सेंद्रिय खत निर्मिती केली जाते. भारतात ५० लाखांपेक्षा जास्त बायोगॅस प्रकल्प आहेत. त्यात महाराष्ट्रात ३ लाख ३१ हजार एवढे बायोगॅस प्रकल्प आहेत. हा वाटा अजून वाढू शकतो. तेवढी क्षमता आपल्याकडे आहे. महाराष्ट्रात सर्वच कारागृहांत, वसतिगृहांत, सार्वजनिक प्रसाधनगृहांत, जागा असेल त्या मोठ्या इमारतीत, हॉटेलमध्ये बायोगॅस प्रकल्प युद्धपातळीवर सुरू करणे काळाची गरज आहे. नागपुरातील मध्यवर्ती कारागृहात सुमारे ३ हजार कैदी राहतात. त्यांच्या स्वयंपाकासाठी दररोज २५ सिलेंडर्स खर्च होतात. वर्षाला तो आकडा ९१२५ सिलेंडर्स एवढा होतो. समजा कारागृहात बायोगॅस प्रकल्प उभारल्यास सिलेंडर्सची बचत होईल, अशा स्वरूपाचा प्रस्ताव निवृत्त पोलिस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी १० वर्षांपूर्वीच दिला होता. नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील नवेगाव खैरी गावात बायोगॅस प्रकल्प यशस्वी ठरला आहे. याकरिता भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाकडून अनुदानही मिळते. शहरातही मोठ्या इमारतींमध्ये अशा स्वरूपाचे प्रकल्प राबविता येतील. केवळ त्याकरिता दूरदृष्टीची गरज आहे. जे वाया जात आहे, त्यातून स्वयंपाकासाठी गॅस तयार होणार असल्यास आपण नक्कीच आत्मनिर्भर होऊ शकतो. पण यात चिंतातुर जंतूकडून अडचणी निर्माण केल्या जातील. कारण कुठलाही प्रकल्प हा इच्छाशक्तीच्या बळावर यशस्वी होत असतो. तीच इच्छाशक्ती आजच्या घटकेला संपुष्टात आलेली आहे. गावखेड्यात गाईंविषयी प्रचंड अनास्था निर्माण झाली आहे. गाय किंवा बैल अंगणात आल्यास त्यांना काडी मारून हाकलले जाते. तीच काडी मारणारी मंडळी भक्तीचा आव आणत मंदिरात दगडाच्या नंदीसमोर मात्र नतमस्तक होतात. अशा मनोवृत्तीनेच आज कामधेनू चक्रव्यूहात अडकली आहे. तिचा पूर्णपणे अभिमन्यू होऊ नये, असे वाटत असल्यास सरकारकडून राजाश्रय आणि लोकांमार्फत लोकाश्रय मिळायला हवा. तोही राजाश्रय देताना मागेल त्याला या तत्त्वाने योजना राबवायला हवी. शिवाय राज्यातील २८ हजार ग्रामपंचायतीत ‘सरकारी गुराखी’ ही संकल्पनाही राबविणे आवश्यक आहे. त्यातून महाराष्ट्रात सुमारे २८ हजारपेक्षा जास्त युवकांना सरकारी गुराख्यांच्या रूपात रोजगार मिळेल. दरम्यान, प्रती ग्रामपंचायत २०० गाईंचे जतन झाल्यास आपण ५६ लाख गाईंचे प्राण वाचवू शकतो. त्याच बळावर बायोगॅस प्रकल्प वाढतील अन् एलपीजीला पर्याय उपलब्ध होईल. जे गोपालक असतील तेच सरकारी गुराख्यांना प्रति महिना शुल्क देतील, त्यातूनच त्यांचा पगार निघेल. यामुळे शासनावर सरकारी गुराख्यांच्या पगाराचा आर्थिक बोजा येणार नाही. अशा स्वरूपाचे लाभ कामधेनूला वाचविण्यातून होऊ शकतात. मग कशाला थांबता, चला उठा आणि कामधेनू बचाव मोहीम हाती घेत बायोगॅस वाढवा. एकंदरीत, केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे । हे समर्थ रामदास स्वामी यांचे विचार प्रत्यक्ष अंमलात आणायची वेळ आलेली आहे. विशेष म्हणजे कामधेनू वाचविणाऱ्यांना सरकारने प्रोत्साहनही द्यावे. शेवटी, ‘आवळा दिल्याशिवाय कोहळा’ निघत नाही, हेही समजून घ्यायला हवे.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# धर्मांतरणावर सरकारी प्रहार

इसवी सन १५०० मध्ये पोर्तुगीज भारतात आले आणि १६०० च्या सुरुवातीला इंग्रज आले. तेव्हापासून सत्तेसोबत धर्मसुद्धा भारतात आला आणि ठिकठिकाणी त्यांनी धर्मांतरण करण्याचे कार्य केले. त्याच्याही पूर्वीचा इतिहास जर पाहायचा म्हटला, तर इसवी सन ६३७ मध्ये मोहम्मद बिन कासिम भारतामध्ये आला, त्याचे आक्रमण झाले. तेव्हापासून सुद्धा इस्लामद्वारे धर्मपरिवर्तन केले गेले. इस्लाम आणि ख्रिश्चनिटीच्या आक्रमणानंतर भारताने धर्मांतरण पाहिले. दुर्दैवाने शत्रूच्या या आक्रमणाच्या पद्धतीला कसे प्रत्युत्तर द्यावे, याचे उत्तर त्यावेळच्या लोकांजवळ नव्हते; म्हणून गावेच्या गावे धर्मांतरित झाली.

परंतु त्यांना हिंदू धर्मामध्ये परत घेण्याची व्यवस्था नव्हती. वास्तविक पाहता, ज्याचे आक्रमण झाले तो निघून गेल्यानंतर किंवा तो परास्त झाल्यानंतर जे लोक धर्मांतरित झाले होते, त्यांचा हिंदू धर्मामध्ये परत येण्याचा मार्ग मोकळा असायला हवा होता; परंतु तात्कालिक समाज व्यवस्थेमध्ये शुद्धीकरणाची चळवळ फोफावलेली नव्हती. त्यामुळे लाखो विधर्मी तयार झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी नेतोजी पालकर, जो मुसलमान झाला होता, त्याला पुन्हा हिंदू धर्मात परत आणले. ही शुद्धीकरण चळवळीची सुरुवात होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी जसे धर्मांतरणाला उत्तर दिलेले होते, तसेच काहीसे उत्तर देण्याचा प्रयत्न महाराष्ट्र सरकारने आज जवळपास ४०० वर्षांनंतर केलेला आहे. देशातील इतर काही राज्यांमध्ये जबरदस्तीने धर्मांतरण रोखणारा कायदा आहे; महाराष्ट्र सरकारचा कायदाही अशाच पद्धतीचा आहे.

महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ हे बळजबरी, फसवणूक, प्रलोभन किंवा लग्नाद्वारे होणारे अवैध धर्मांतर रोखण्यासाठी आणलेला एक कडक कायदा आहे. १६ मार्च २०२६ रोजी विधानसभेत पारित झालेल्या या विधेयकात दोषींना ७ वर्षांपर्यंत कारावास आणि ५ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. याचा उद्देश धर्मांतराच्या नावाखाली होणारी फसवणूक रोखून नागरिकांच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण करणे आहे. गावांमध्ये सामूहिक धर्मांतरणाचे अनेक प्रयास होत असतात; मात्र आता सामूहिक धर्मांतरण केल्यास ७ वर्षे कारावास आणि ५ लाख रुपये दंड केला जाणार आहे. धर्मांतरण घडवून आणणारा एखादा छांगुर बाबा असो किंवा एखादा बिशप, एकाच व्यक्तीवर काही काळाने जर पुन्हा तशाच पद्धतीचा गुन्हा दाखल करण्यात आला, तर मात्र त्याला १० वर्षांपर्यंतचा कारावास भोगावा लागेल.पूर्वी रातोरात धर्मांतरण केले जायचे; सरकारी कागदपत्रांची पूर्तता सुद्धा केली जायची. परंतु आता धर्मांतरण करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला ६० दिवस आधी सरकारला सूचना देणे अनिवार्य केले जाऊ शकते. याही उपर, ज्यांना इतर धर्म हे हिंदू धर्मापेक्षा अधिक प्रगत आणि उदार वाटत असतील, अशा लोकांनी स्वेच्छेने केलेले धर्मांतर बेकायदेशीर मानले जाणार नाही. लव्ह जिहादच्या नावाखाली केलेले विवाह हे अनेक वेळा धर्मांतराच्या हेतूने किंवा फसवणूक करून केलेले असतात. असे विवाह ‘शून्यवत’ म्हणजे रद्द मानले जातील. लग्नानंतर अनेक वेळा मुलींना तो विवाह तोडण्याची किंवा आपल्या घरी परत जाण्याची इच्छा असली, तरीसुद्धा ज्या विवाहाने त्या बांधल्या गेलेल्या असतात त्या विवाहाची मान्यता कायद्याने रद्द झाल्याने मुलींचा परतीचा मार्ग सोपा होणार आहे. एखाद्या मुलीचा फसवणूक करून परधर्मात विवाह झाला असेल व तिला त्यापासून अपत्यही झालं असेल तर तो विवाह विच्छेद झाल्यानंतर मुलाचा धर्म हा आईचा धर्म मानला जाईल. म्हणजे यापुढे गौरीच्या पोटी अब्दुल जन्माला येणार नाही. खरं पाहिलं, तर महिलांसाठी आणि मुलींसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी ही खूप मोठी भेट महाराष्ट्र सरकारने दिलेली आहे.

दहशतवाद्यांना बिर्याणी खाऊ घालण्याची परंपरा आपल्या देशाने पाहिलेली आहे. अनेक वेळा अशा आरोपींना पोलिस स्थानकामध्ये सुद्धा सन्मानित पाहुण्यांची वागणूक मिळत असते; परंतु आता या कायद्यांतर्गत केलेले सर्व गुन्हे ‘दखलपात्र’ आणि ‘अजामीनपात्र’ असणार आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई ही स्थानिक पोलिसांना करावीच लागणार आहे.

धर्मांतरणाचा व्यवसाय करणाऱ्या अनेक संस्था आहेत, की ज्या विदेशांमध्ये धर्मांतरित लोकांचे छायाचित्र पाठवून प्रत्येक व्यक्तीच्या मागे भरपूर पैसे कमावत असतात. जर एखादी संस्था बेकायदेशीर धर्मांतरात सहभागी आढळली, तर तिची नोंदणी रद्द केली जाऊ शकते आणि सरकारी अनुदानही नाकारले जाऊ शकते.

एका धुणे भांडे करणाऱ्या हिंदू महिलेने एका अहिंदू माणसासोबत लग्न केले. काही वर्षांनी तिला तिची चूक कळून आली. तो माणूस तिला सोडायला तयार होता, परंतु मुलगा द्यायला तयार नव्हता, कारण त्याच्यामते एका अ-हिंदूंची संख्या त्याने वाढविली होती. शेवटी त्या महिलेला मुलाला सोडून आपल्या आई-वडिलांकडे व स्वधर्मात परत यावे लागले. नुकतीच एक महिला तिच्या चार मुलांसोबत हिंदू धर्मात परत आली. आजपर्यंत, जेव्हा हा कायदा अस्तित्वात नव्हता, तेव्हा ती मुले त्या महिलेसोबत राहतात म्हणून ती हिंदू होती; त्यांचा अ-हिंदू बाप त्यांच्यावर केव्हाही हक्क सांगू शकायचा. परंतु सरकारने आई आणि मुलांमधील ताटातूट थांबविण्यासाठी, अशा बेकायदेशीर धर्मांतर करून झालेल्या विवाहातून जन्माला आलेले मूल त्याच्या आईच्या मूळ धर्माचे मानले जाईल, अशी तरतूद केलेली आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, धर्मांतर हे कायदेशीर आणि ऐच्छिक आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीवर किंवा ते आयोजित करणाऱ्या संस्थेवर असेल.

आजही ज्या ठिकाणी अ-हिंदू लोकांची मोठ्या प्रमाणावर संख्या आहे, त्या परिसरातून सर्वसामान्य हिंदू महिलाच काय, पण पुरुष सुद्धा जायला धजत नाहीत ही सत्य परिस्थिती आहे. अशा वस्तीतून जाताना त्यांच्या मनात ‘‘छोटा पाकिस्तान’’ अशा पद्धतीची भावना असते. त्या वस्तीतून जाताना निर्माण होणारी असुरक्षिततेची भावना ही मात्र खरी आहे. लोकसंख्येच्या असंतुलनामुळे आम्ही देशाचा एक मोठा भूभाग गमावलेला आहे; त्यातूनच पाकिस्तान नावाचे एक शत्रू राष्ट्र निर्माण झालेले आहे. त्यामुळे धर्मांतरणाच्या या प्रकरणांना जनतेने राजकीय लोकांच्या भूलथापांना बळी न पडता, आपल्या मुलाबाळांच्या भविष्याला मारक या गोष्टी आहेत, अशा पद्धतीचा विचार करणे गरजेचे आहे. मोठमोठे तथाकथित हिंदू सम्राट ज्यावेळेस इफ्तार पार्टीला हजेरी लावण्यात धन्यता मानतात, अशा काळामध्ये अ-हिंदू मतांचा कुठलाही मोह न ठेवता सरकारने केलेले हे कार्य निश्चितच अभिनंदनीय म्हणावे लागेल. समाज, सरकार, प्रशासन, जागृत जनता या सर्वांनी मिळून राष्ट्रांतरणाची ही पावले ओळखली व रोखली पाहिजेत, असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### धर्मांतरणाचा जुलमी राक्षसही निखंदून काढण्याची वेळ

‘‘खडतर तपश्चर्येची यशस्वी सांगता’’ हा दि. ५ एप्रिलच्या अंकातील वरील मथळ्याचा ‘रोखठोक’मधील लेख वाचला. बारा वर्षांचे अविरत योग्य ते निर्धारित लक्ष्य ठेवून केंद्र व राज्य शासनाच्या आणि पोलिस दलांच्या योजनाबद्ध अथक, युद्ध पातळीवरील प्रयत्नाने व मोहिमेने माओवादी नक्षलवाद संपुष्टात आणण्याचे जे महान कार्य पार पाडले व सामान्य जनांचे, दुर्गम भागातील आदिवासींचे दैनंदिन जगणे या नक्षलवादाच्या भयंकर विळख्यातून मुक्त झाले; हे केंद्र व राज्य शासनाचे मोठो असे समाजाभिमुख विधायक कार्ययश आहे. त्याबद्दल केंद्र व राज्य सरकार धन्यवादास पात्र आहे. समाजाच्या खुशालीबद्दल ज्या आंतरिक तळमळीने केंद्र व राज्य शासनाने हे महान खडतर कार्य पार पाडले त्याच तळमळीने; सांप्रत संपूर्ण भारतात व विशेषतः महाराष्ट्रात चालू असलेला इस्लामी जिहाद्यांचा धुमाकूळ व धर्मांध ख्रिश्चन्यांचा धर्मांतराचा हिंदू समाजातील कमकुवत दुवे हेरून, कायदे झुगारून जो निरंतर सपाटा चालू आहे त्याचाही नक्षलवादाप्रमाणे नायनाट करणे अत्यावश्यक झाले आहे. हिंदू मुलींना आमिष दाखवून त्यांना पळवून नेणे, त्यांच्याशी निकाह करण्याचे खोटे नाटक करून त्यांचे लैंगिक शोषण करून त्यांची हत्या करणे याचे प्रमाण संपूर्ण भारतात व महाराष्ट्रात प्रकर्षाने जाणवत आहे. मुंबई, पुण्यापर्यंतही हे जिहाद्यांचे भयंकर दुष्टचक्र पोहोचले आहे. त्यामुळे, ज्या खडतर तपश्चर्येने नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी योजनाबद्ध कार्यक्रम सतत बारा वर्षे राबविला त्याचप्रमाणे हा जिहादी व धर्मांतरणाचा जुलमी राक्षसही निखंदून काढण्याची वेळ आली आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/पुणे, ७०५८९७५३७६

### जगात इंधन आणिबाणी : देशात अफवांचे पेव

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाला एक महिन्यांहून अधिक काळ लोटला आहे. कुठलेही युद्ध मानवजातीला कलंक म्हटले आहे. या युद्धाचे थेट परिणाम आज संपूर्ण जगाला भोगावे लागत आहे. परिणामी या देशांर्गत युद्ध संघर्षाने इंधनाची पूर्तता होत नसल्यामुळे, जगातील काही देशात इंधनटंचाई लक्षात घेता इंधन आणिबाणी जाहीर झाली आहे. अनेक देशांनी इंधनाचे दर वाढविण्यास सुरुवात केली आहे. शेजारील पाकिस्तानात सरकारी विभागाला इंधन पुरवठा हा पन्नास टक्क्यांनी कमी झाला आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना कामाचे आठवडे चार दिवसाचे केले असून, शाळा, कॉलेज दोन आठवड्यांसाठी बंद ठेवण्यात आले आहे. युद्धाच्या फटक्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यास धोका उद्भवत आहे. हीच परिस्थिती बुधवारपासून श्रीलंकेत लागू झाली आहे. या देशाने पंचवीस टक्के इंधन बचतीचे लक्ष्य ठेवले आहे. श्रीलंकेत खाजगी वाहनांसाठी पेट्रोल मर्यादा ही केवळ पंधरा लिटरवर येऊन ठेवली आहे. तर सार्वजनिक वाहतुकींना दोनशे लिटर एवढी मर्यादा केली आहे. बांगलादेशने ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय स्वीकारला आहे. इंधनटंचाईवर मात करण्यासाठी या देशाने घरगुती व औद्योगिक वीज पुरवठ्यात तब्बल पाच तासांची कपात केली आहे.

एकंदरीत आखातातील युद्धामुळे आशियाई देशातील इंधन पुरवठ्याच्या अभावामुळे जगभरात मोठी आव्हाने उभी झाली असताना, भारतात सकारात्मक स्थिती कायम आहे. नुकतेच सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेलवरच्या उत्पादन शुल्कावर प्रति लिटर दहा रुपये कपात केली आहे तर डिझेलवरील उत्पादन शुल्क शून्य झाले असल्याचे सांगितले जाते. भारत सरकारच्या पेट्रोलियम मंत्रालयाकडून, काही दिवसांपूर्वी स्पष्ट करण्यात आले की, देशात तेल आणि गॅसची कुठलीही कमतरता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसदेत भाषण करताना आखाती देशातील युद्धामुळे निर्माण होत असलेल्या समस्येवर भाष्य केले होते. कोरोना संकटकाळात ज्याप्रमाणे देशातील नागरिकांनी संयम राखला, त्या प्रसंगाची आठवण देत पुन्हा या इंधन टंचाईच्या काळात संयम राखण्याची देशवासीयांकडून अपेक्षा व्यक्त केली होती. एलपीजी घरगुती सिलेंडरवर साठ रुपयांची दरवाढ, तर खाजगी पेट्रोलियम कंपन्यांनी दरवाढीचे संकेत दिल्यामुळे, नागरिकात प्रचंड घबराट निर्माण झाली. व्यावसायिक सिलेंडर मिळणे दुरापास्त झाले होते. पुनश्चः एकदा केरोसीन बाजारात उपलब्ध करणे, घरगुती सिलेंडर बुकिंग करण्याची मुदत दीर्घ ठेवल्यामुळे नागरिकांच्या मनात इंधन संकटाची धाकधूक वाढणे साहजिकच होते. तूर्तास देशांतर्गत इंधनपुरवठा पुरेसा असून, नागरिकांनी अफवांच्या आहारी न जाण्याचे आवाहन शासन व प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्याचबरोबर हे सुद्धा आश्वस्त केले की, इंधन टंचाईबाबत कुठलीही साशंकता बाळगू नये. एकंदरीत सद्यःस्थितीत कुठल्याही अफवांना बळी न पडता देशांतर्गत इंधन टंचाईच्या पृष्ठभूमीवर सत्यता बाळगून कृती करणे शासनाकडून अपेक्षित आहे.

**शशिकांत तोटे**/९९३०८३५४५८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## उद्योजक रामभाऊ जगदाळे मित्र परिवाराच्या वतीने नुतन नगरसेवकांचा सत्कार

**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

रामभाऊ जगदाळे मित्र परिवाराच्या वतीने सोलापुरातील नुतन नगरसेवकांचे सत्कार विशेष सरकारी वकील व राज्यसभेचे खासदार पद्मश्री उज्वलजी निकम यांच्या प्रमुख उपस्थित व उद्योजक रामभाऊ जगदाळे यांच्या हस्ते भाजपा शहर अध्यक्ष व नगरसेवक रोहिणीताई तडवळकर, स्थायी समिती चेअरमन रंजिताताई चाकोते, नगरसेवक प्रथमेश कोठे, किसन जाधव, अश्विनीताई चव्हाण, युवराज सरवदे, अक्षय अंजीखाने, सतीश सिरसूल्ला, सतीश दासरी, बोरामनीकर साहेब, एडवोकेट ऋषिकेश म्हेट्रे, अक्कलकोटचे नगरसेवक अंकुश चौगुले, युवा मोर्चेचे अध्यक्ष विजय कुलथे, विश्वनाथ प्याटी यांचा सत्कार करण्यात आले. आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले.याप्रसंगी गुरुनाथ कोळी, वैभव धोडमिसे, कल्याण करजगी, श्रीनिवास दासरी, श्रीशैल हिरेमठ, सद्दाम कोसगीकर, नितेश कोळी, सोनू कदम, पवन सिंगराल, साई मुनगापाटील, राहुल कोळी, यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होते.

## सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष खासदार प्रणितीताई शिंदे यांना करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**



सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष खासदार प्रणितीताई शिंदे यांना करा, अशी मागणी सुदीप चाकोते यांची मागणी केली आहे. सोलापूर काँग्रेस कमिटी येथे दिल्लीहून आलेले निरीक्षक, ओरिसाचे आमदार देवशेष पटनायक यांच्यासमोर मांडली. त्यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे आहे की, सोलापूर काँग्रेस आज केवळ संघटनात्मक अडचणीत नाही, तर अस्तित्वाच्या निर्णायक टप्प्यावर उभी आहे. अशा वेळी फक्त पद भरण्याची औपचारिकता चालणार नाही तर पक्षाला नवजीवन देणारा, संघर्षातून उभं करणारा आणि जनतेच्या मनात पुन्हा विश्वास निर्माण करणारा नेतृत्व हवा. शहराध्यक्ष पदासाठी अनेक इच्छुक आहेत. त्यांची क्षमता आम्ही नाकारत नाही. ब्लॉक, बूथ, वॉर्ड पातळीवर ते सक्षम असतीलही पण आजची लढाई ही केवळ स्थानिक पातळीवरची नाही. ही काँग्रेसच्या सन्मानाची, अस्तित्वाची आणि भविष्यातील पुनरुत्थानाची लढाई आहे. आणि या लढाईसाठी लागतो तो एक धडाडीचा चेहरा एक जिद्दी नेतृत्व एक जनतेच्या हृदयात स्थान असलेला आवाज प्रणिती शिंदे यांचा आहे.

# 'खेळण्याचा अधिकार' हा मूलभूत अधिकार मानण्याचा प्रस्ताव मंजूर

## देशभरात याची अंमलबजावणी करण्याचा क्रीडा भारतीचा मोठा निर्णय

क्रीड़ा-भारती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास आणि खेळाडूंना अधिक सक्षम करण्यासाठी 'क्रीडा भारती'ने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. कर्णावती येथे २७ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या त्रैवार्षिक अधिवेशनात खेळाला 'मूलभूत अधिकार' म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला आहे.

विकसित भारताचा मार्ग हा खेळाच्या मैदानातून जातो, या उद्देशाने क्रीडा भारतीने देशातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा प्रेमींना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'युवा आणि खेळ' या संकल्पनेला बळकटी देणे हा या प्रस्तावाचा मुख्य उद्देश असल्याचे क्रीडा भारतीचे महामंत्री राज चौधरी यांनी कळविले आहे.

महामंत्री चौधरी यांनी २५ मार्च २०२६ रोजीच्या पत्राने भारतातील सर्व प्रदेश अध्यक्ष, प्रांत अध्यक्ष, प्रदेश मंत्री, प्रांत मंत्री यांना या प्रस्तावाची माहिती कळविली आहे. तसेच याची आपल्या स्तरावर कार्यवाही होण्याचे प्रयत्न करावेत असे कळविले आहे.

### महत्त्वाचे मुद्दे याप्रमाणे

**खेळाचा अधिकार हा मूलभूत अधिकार**

'खेळ' हा केवळ काही निवडक लोकांपुरता मर्यादित न राहता तो प्रत्येक भारतीयाचा मूलभूत अधिकार असावा, अशी आग्रही मागणी क्रीडा भारतीने केली आहे. क्रीडा धोरण हे खेळाडूंना अडथळे निर्माण करणारे नसून त्यांना प्रोत्साहन देणारे असावे.

**सर्वसमावेशक व पारदर्शक निवड प्रक्रिया**

**मुक्त सहभाग:** कोणत्याही खेळाडूला किंवा संघाला केवळ संघटनात्मक सदस्यत्व नाही म्हणून स्पर्धेपासून वंचित ठेवता येणार नाही. खेळाडूंना त्यांचे कौशल्य दाखवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळावे.

राजकारण मुक्त खेळ: खेळाडूंच्या निवडीमध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण किंवा व्यक्तिगत हस्तक्षेप नसावा. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील संघ निवडीसाठी पूर्णपणे पारदर्शक 'सिस्टम' राबवली जावी.

**क्रीडा स्पर्धा आयोजनाचे स्वातंत्र्य**

स्थानिक नागरिक नियम, सुरक्षा आणि संविधानाचे पालन करून कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचे स्वातंत्र्य असावे. जोपर्यंत या स्पर्धांचा हेतू राज्य किंवा देशाचे अधिकृत प्रतिनिधित्व करण्याचा नसतो, तोपर्यंत त्यावर अनावश्यक निर्बंध नसावेत.

**राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणाची स्थापना**

खेळाशी संबंधित वाद किंवा शिस्तभंगाच्या कारवाईसाठी 'राष्ट्रीय खेळ न्यायाधिकरण' (National Sports Tribunal - NST) किंवा सक्षम न्यायाधिकरणाकडेच अधिकार असावेत, जेणेकरून खेळाडूंना न्याय मिळेल.

**पायाभूत सुविधा आणि मैदानांचे संरक्षण**

प्रत्येक खेळाडूला खेळाचे मैदान आणि आवश्यक पायाभूत सुविधा (Infrastructure) मिळणे आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, खेळाची मैदाने ही केवळ खेळाच्या उद्देशासाठीच संरक्षित ठेवली जावीत, त्यांचा वापर इतर कामांसाठी होऊ नये.

### अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील

महामंत्री राज चौधरी यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यांतील विविध क्रीडा संघटनांचे अध्यक्ष, सचिव, जिल्हा क्रीडा अधिकारी, फेडरेशन आणि असोसिएशन यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याशी चर्चा करून या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करणार.

**ज्ञानेश्वर म्यॅकल**, प्रांत मंत्री

### राष्ट्रनिर्मितीचे साधन: 'खेलो इंडिया'

केंद्र सरकारच्या २०२५ च्या 'खेलो इंडिया' धोरणानुसार, खेळ हे सामाजिक विकासाचे आणि राष्ट्रनिर्मितीचे साधन बनावे. यासाठी केंद्र, राज्य सरकारे आणि खासगी क्षेत्रांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.

## श्री क्षेत्र तीर्थ येथे रामलिंगेश्वर यात्रेनिमित्त बुधवारी भव्य कुस्ती स्पर्धा

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

श्री क्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर यात्रेच्या सांगता दिनी बुधवारी ८ एप्रिल रोजी कुस्ती स्पर्धेचे आयोजन यात्रा पंच कमिटीने केले आहे. या स्पर्धेतील शेवटची कुस्ती कै. धानप्पा फताटे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्रीराम केसरी किताबासाठी होणार असून, विजेत्या मल्लास चांदीची ढाल व रोख ३१०० रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. हे पारितोषिक ॲड. राजेंद्र फताटे यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. या कुस्ती मैदानात सोलापूर जिल्हा व परिसरातील नामवंत मल्लांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पंच संतोष वळसंगे, काशिनाथ बिराजदार, सुनील कळशेट्टी, आनंद कुंभार, जावेद मुल्ला आणि प्रा. प्रभुलिंग वळसंगे यांनी केले आहे. या कुस्ती स्पर्धेचा लाभ घेण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विश्वनाथ पावले, अहमद मुल्ला, पाटील, शेळगे, रत्नाकर कुल्ले, रेवणसिद्ध पाटील, कल्याणी मेंथे, कल्याणी फताटे, राम उदंडे आणि ॲड. राजेंद्र फताटे यांनी केले आहे.

## सोलापुरात २९ एप्रिलपासून पुंजाल चषक बास्केटबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**


सोलापूर सोशल अँड स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी १३ वर्षांखालील व १६ वर्षांखालील मुले आणि मुलींसाठी पुंजाल चषक बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा २९ एप्रिल ते ३ मे या कालावधीत संस्थेच्या पुंजाल क्रीडांगणावर पार पडणार आहेत. सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या मान्यतेने या स्पर्धा घेतल्या जाणार असल्याची माहिती व्यंकटेश पुंजाल यांनी दिली आहे. या स्पर्धेतील विजयी व उपविजेत्या संघांना चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच, विजेता संघातील खेळाडूंना सुवर्णपदक, तर उपविजेत्या खेळाडूंना रौप्यपदक व प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. याशिवाय, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूला सहभाग प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात येणार आहे. या स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी राजेंद्र नारायणकर यांच्याशी (मोबाईल क्र. ९९२३६६२८८०) संपर्क साधावा.


# टायगर, व्हीजी ग्रुप, गुलमोहर, अल्फा संघाचे विजय


## इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग : खैराटकर, तांबोळी, सातपुते, जाधव सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**


खैराटकर


तांबोळी


सातपुते


जाधव

अरुणोदय मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी पुरस्कृत इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग सोळाव्या क्रिकेट स्पर्धेत टायगर, व्हीजी ग्रुप, गुलमोहर व अल्फा संघाने शानदार विजय मिळविले.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत टायगर संघाने विशाल संघाचा १४ धावांनी पराभव केला. टायगर संघाने प्रथम फलंदाजी करताना १२ षटकांत १०२ धावांचे डोंगराळ आव्हान उभे केले. प्रत्युत्तरात आयएमएस विशालचा संघ ८८ धावांपर्यंतच मजल मारू शकला. दुसऱ्या सामन्यात व्ही.जी. ग्रुपने टाईम्स संघावर ६ गडी राखून विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना आयएमएस टाइम्स संघाने ८१ धावा केल्या. व्हीजी ग्रुपने हे आव्हान ११ षटकांत ६ गडी गमावित पूर्ण केले. अन्य एका लढतीत गुलमोहर संघाने माऊचा संघावर ३ धावांनी मात केली.

गुलमोहरने ८१ धावा केल्या होत्या. लक्ष्याचा पाठलाग करताना आयएमएस माऊलीचा संघ ७८ धावांवर रोखला गेला. अल्फा संघाने अंबर संघास १७ धावांनी नमविले. अल्फा संघाने प्रथम फलंदाजी करत १२ षटकांत १०२ धावा केल्या. अंबर संघाला ११.४ षटकांत केवळ ८५ धावा करता आल्या.

अनुक्रमे मुक्ताप्पा खैराटकर (४८ धावा आणि ११ धावांत २ बळी), झुबेर तांबोळी (२८ धावा आणि २ बळी), प्रेमनाथ सातपुते (३ बळी) व अनिल जाधव (२१ धावा आणि २ बळी) हे सामन्याचे मानकरी ठरले.

**संक्षिप्त धावफलक**

**टायगर:** १२ षटकांत २ बाद १०२ धावा (मुक्ताप्पा खैराटकर ४८, लक्ष्मण कावळे ३२; उमाशंकर जे. १२/२) **वि. वि. विशाल:** १२ षटकांत ९ बाद ८८ धावा (सागर माळी २६, विनायक काळे १७; मुक्ताप्पा खैराटकर ११/२, विलास कोळी ११/२).

**टाइम्स :** १२ षटकांत ७ बाद ८१ धावा (मकरंद बसवंती २७*, अमित कोबाने १९; सुधीर पेंडसे ९/२) **पराभूत विरुद्ध व्हीजी ग्रुप:** ११ षटकांत ५ बाद ८४ धावा (झुबेर तांबोळी २८, उमेश रवलानी १८*, तात्या भोसले १३; सुधांशू भालेराव १३/२).

**गुलमोहर:** १२ षटकांत ६ बाद ८१ धावा (प्रेम राठोड १८, आनंद बबलेश्वर १५; अतुल परदेशी ९/२, विशाल पाटील १४/२) **विजयी विरुध्द माऊली:** १२ षटकांत ६ बाद ७८ धावा (चेतन वनगंटी २४, विशाल पाटील १०; प्रेमनाथ सातपुते ७/३).

**अल्फा:** १२ षटकांत ६ बाद १०२ धावा (अनिल जाधव २१, मोहसीन शेख २६, गणेश जाधव २५; अनिल जाधव ८/२) **वि.वि. अंबर :** ११.४ षटकांत सर्वबाद ९० (हिरालाल कुंदराम १७, सुरेश नामदेव १३; महेंद्र धवन ९/१, शंकर गुरव २०/१).

# डॉ. आंबेडकरांच्या विचारात जग बदलण्याचे सामर्थ्य : डॉ. महाळंक

### भीम प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचे थाटात वितरण

### दैनिक तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे यांचा गौरव



**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान दिले. संविधानाने सर्वांना ताठ मानेने जगण्याचा अधिकार आणि ताकद दिली. हे ऋण अवघा देश कधीही फेडू शकणार नाही. डॉ. आंबेडकरांच्या विचारात जग बदलण्याचे सामर्थ्य आहे, असे प्रतिपादन मसाप पुण्याच्या मुख्य कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांनी केले.

येथील भीम प्रतिष्ठानच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ सोलापुरातील शिंदे चौकातील शिवस्मारक सभागृह येथे थाटात पार पडला. त्या प्रसंगी त्या बोलत होत्या. मसाप पुण्याच्या मुख्य कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सन्मानचिन्ह ,सन्मानपत्र ,शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे २६ वे वर्ष आहे.

अध्यक्षस्थानी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले हे होते. याप्रसंगी विचारमंचावर उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर , जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख नगरसेवक अमोल शिंदे, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, ज्येष्ठ पत्रकार दिगंबर भगरे, रावजी सखाराम हायस्कूलचे प्राचार्य भारत केत, उद्योजक पदमचंद राका, राजेंद्र शहा (कासवा), डॉ. उदय वैद्य,विठ्ठल शिवशरण, डॉ. शिवाजी पवार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांनी भीम प्रतिष्ठानच्या कार्याचा गौरव करून डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाचे महत्त्व सांगितले. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक अमोल शिंदे यांच्यासह मान्यवरांची भाषणे झाली.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. अंजना गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक संस्थापक बाबा बाबरे यांनी केले. स्वागत कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे यांनी केले. ॲड. विशाल मस्के यांनी आभार मानले. यावेळी संयोजक अमित बाबरे , प्रतिष्ठानचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, उपाध्यक्ष ॲड. विशाल मस्के, सचिव अकबर शेख ,कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे, ॲड. स्वाती मस्के आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

**यांचा झाला सन्मान**

भीमराव मोरे (सामाजिक), सीमा भंडारी (शैक्षणिक ), बलभीम पारखे (कामगार ), किरण बनसोडे (पत्रकारिता), रुक्मिणी लांबतुरे (गौरव पुरस्कार), प्रकाश शेळके( विशेष गौरव), रेणुका हिरेमठ (सन्मानपत्र), प्राजक्ता सोलंकर (सन्मानपत्र ) कृष्णा व रत्नमाला माने (आदर्श पालक पुरस्कार).


## सोयगाव ग्रामपंचायत, सोयगाव

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर**
**E-mail :- npsoegaon@gmail.com**

**जा.क्र./कावि/नपंसो/२०२६-१३९** — **दिनांक : ०६/०४/२०२६**

**ई-निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२६-२७ (ऑनलाईन)**

Portal: https://mahatenders.gov.in

मुख्याधिकारी, सोयगाव नगर पंचायत, सोयगाव यांच्या वतीने एकूण ०२ प्रस्तावित कामासाठी बी-१ प्रमाणे १. नगरपंचायत अंतर्गत नमो उद्यान विकसित करणे. २. नगरपंचायत अंतर्गत नमो उद्यान विकसित करणे (इलेक्ट्रीक). ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग नोंदणीकृत ठेकेदार योग्य त्या वर्गातील यांच्याकडून मागवित आहेत. निविदापुर्व अहर्ता, अटी, वेळापत्रक व सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०६/०४/२०२६ पासून दिनांक १४/०४ /२०२६ पर्यंत पाहता येईल. मुख्याधिकारी सोयगाव नगर पंचायत यांनी कोणतेही अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा हक्क / अधिकार राखून ठेवलेला आहे.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|---|
| नगर अभियंता | मुख्याधिकारी | अध्यक्षा |
| नगरपंचायत, सोयगाव | नगरपंचायत, सोयगाव | नगरपंचायत, सोयगाव |


## जाहीर प्रसिध्दीकरण

नि.नं. ७
दि.कि.अ.नं. १३६/२०२५

### बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो कनिष्ठस्तर यांचे न्यायालयात

१) **आफरीन इकबाल शेख,** वय ३५ वर्ष
धंदा-घरकाम, रा.७१०, फुले प्लॉट,
परांडा रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

२) **जुबेर इकबाल शेख,** वय १४वर्षे, **-- अर्जदार**
धंदा-शिक्षण, रा. सदर-अज्ञान

३) **जुनेद इकबाल शेख,** वय १४ वर्षे,
धंदा-शिक्षण, रा. सदर अज्ञान
(अर्जदार नं.१ स्वतःकरीता व अज्ञान
अर्जदार नं.२.३ ची अ.पा.क. आई म्हणून)

४) **जैबुन कदीर शेख,** वय ६१ वर्षे, धंदा-घरकाम,
रा.सदर

**विरुध्द**

कोणी नाही **-- सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं. २, ३ चे वडिल इकबाल कदीर शेख हे होते ते बार्शी येथे दि.१५/०९/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार नं.४ ही मयत इकबाल कदीर शेख यांची आई आहे तर मयत इकबाल कदीर शेख यांचे वडिल कदीर यासीन शेख हे दि.५/१/२००१ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हेच मयत इकबाल कदीर शेख यांचे कायदेशीर वारस असून अर्जदाराशिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत. यातील अर्जदाराना त्यांचे शासकीय, निमशासकीय व कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता वारस हेअरशिप प्रमाणपत्राची गरज गरज भासलेली आहे सदर वारस / हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदाराकडे नसलेने अर्जदाराना अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करुन अर्जदारानी हेअरशिप/वारस प्रमाणपत्र मिळणे करीताअर्ज या मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने कोणाचे कांही कायदेशीर हक्क आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख १३/०४/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ताः ३१/०३/२०२६

| सही/- | शिक्का | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | | सहा. अधिक्षक |
| दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी | | दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी |

## जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांस विशेषतः ता. उत्तर सोलापूर येथील सर्व रहिवासीयांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि ।। व सब ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील भवानी पेठ येथील टि पी स्कीम नं.२, फा. प्लॉट नं. ८४/१६/१/ब याचे एकुण क्षेत्र ९१४.७४ चौ.मी. इतके असून यावर अरिहंत अपार्टमेंट या नांवाने बांधलेल्या अपार्टमेंट मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.ए-४ याचे सुपर बिल्टअप ५३.९० चौ.मी. इतके असून यात लिव्हींग रूम, किचन, बेडरूम, संडास, बाथरूम, पॅसेज व बाल्कनी असे बांधकाम असून यात संपूर्ण फिटींग फर्निचरसह तसेच यातील पार्कींग, बोअरींग, पाण्याची टाकी, कॉमन लाईट, लाईट मिटर इत्यादींची सोय असून यांसी चतुः सिमा-पूर्वेसः फ्लॅट नं.ए-३, पश्चिमेसः ओपन, दक्षिणेसः ओपन व उत्तरेसः ओपन असलेली फ्लॅटची मिळकत

सदरप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत ही सौ. रेणुका नागनाथ पसमुले, रा.९/१०, एस.टी. स्टॅण्ड समोर, मुरारजी पेठ, सोलापूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून इसारापोटी रक्कम स्विकारून इसारापावतीही लिहून दिलेले आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी त्यांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी वरील मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, वहिवाट, टाच, जप्ती, बोजा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र अगर इतर हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसाच्या आंत कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत व तक्रार न आल्यास ही मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

हे खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली तारीख-०५/०४/२०२६.

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**ॲड. हरिसिंग जा. राजपूत**
**ॲडव्होकेट**
बी.कॉम, एम.एस.डब्ल्यू. एलएल.बी.
रा.ए-३९, शिवगंगा नगर भाग-जुळे सोलापूर,
सोलापूर-४१३००४ मो.नं. ९६२३५२२७८९
(अशिल प्रियंका शितल कांबळे
यांचेतर्फे ॲडव्होकेट)

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे नारी (भांडेवाडी) हद्दीतील व आसपासचे लोकांना कळविण्यात येते की.

डि. सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे नारी (भांडेवाडी) हद्दीतील जमीन गट नं. ३२९ क्षेत्र ०८ हे. ११ आर + पो.ख. ०० हे. ०४ आर एकूण ०८ हे. १५ आर आकार ०७ रु. २५ पैसे पैकी वसंत, रमेश, सुरेश यांचे प्रत्येकी १/१० अविभक्त हिश्श्याची म्हणजेच एकूण ३/१० अविभक्त हिश्श्याची मिळकत म्हणजेच ०२ हे. ४४ आर ही जिरायत जमीन मयत वसंत यांचे वारस व मयत रमेश यांचे वारस व सुरेश यांनी सदरची मिळकत त्यांना वारसाहक्काने आलेली व त्यांचे वडिलार्जीत मालकीची व ७/१२ पत्रकी वारस म्हणून मालकी हक्कात नोंद असलेली समाईक कब्जे वहिवाटीची मिळकत आतील तद्‌ंगभूत वस्तुसह वहिवाटीचे हक्कासह.

सदरची मिळकत हि मयत वसंत यांचे वारस व मयत रमेश यांचे वारस व सुरेश यांच्या वडिलार्जीत मालकीची, समाईक मालकी कब्जे वहिवाटीची मिळकत ही त्यांनी आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करून सदरची मिळकत ही त्यांनी निर्वेध, व निजोखमीची असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलास दिलेली आहे त्यांनी आमचे अशिलांकडून इसारादाखल काही रक्कम त्यांचे प्रापंचिक अडचणीकरीता व इतर कायदेशीर कारणाकरीता स्विकारलेली आहे व त्यांनी सदरची जमीन आमचे अशिलास निर्वेध व निजोखमीची खरेदी आमचे अशिलाचे खर्चाने उर्वरीत रक्कम स्विकारून खरेदी देण्याचे ठरलेले आहे.

याउपरही वर नमूद मिळकती संदर्भाने कोणाची काही तक्रार असल्यास काही हक्क संबंध, बक्षिसपत्र, दानपत्र, कोर्ट आदेश, विक्री, गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र भाडेकरार वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांत खालील नमूद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह समक्ष भेट घेवुन आमचे अशिलाची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस आमचे अशिल वर नमुद मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली. ता. ०५/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. आर. यु. वैद्य**
**(नोटरी भारत सरकार)**
उपळाई रोड, आदित्य कृष्णानगर, वायकुळे प्लॉट, दोन लिंबाजवळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर मोबा.नं. ९८५०२७७९४४
अशिलातर्फे ॲडव्होकेट


Classifieds

**विकणे आहे**

**दुकान गाळा विक्री / भाड्याने देणे आहे. २२० स्क्वेअर फूट, निर्मिती लँडमार्क इंदिरा नगर, पोस्ट ऑफिसजवळ, रामलिंग नगर, विजापूर रोड, संपर्क - ९४२०५४४६४४**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**




## महत्त्वाचे


### एल. गौना स्क्वॅश स्पर्धेत अभय सिंगची आगेकूच



**नवी दिल्ली :** इजिप्तमधील एल गौना येथे सुरू असलेल्या पीएसए प्लॅटिनम दर्जाच्या एल गौना ओपन स्क्वॅश स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत भारताच्या अभय सिंगने जोरदार मुसंडी मारत इजिप्तच्या आणि जागतिक क्रमवारीत १३ व्या स्थानी असलेल्या अली अबू एलेनिनेचा ३-२ असा पराभव केला. जागतिक क्रमवारीत २५ व्या स्थानी असलेल्या अभयने शनिवारी झालेल्या या सामन्यात ९-११, ११-८, ३-११, ११-४, ११-८ अशा गुणांनी निसटता विजय मिळवला. पुढील फेरीत त्याचा सामना इजिप्तच्याच, स्पर्धेतील सहावा मानांकित आणि जागतिक क्रमवारीत ७ व्या स्थानी असलेल्या युसूफ इब्राहिमशी होईल. दरम्यान, महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत २० व्या स्थानी असलेल्या अनाहत सिंगला जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या हानिया अल हम्मामीकडून पराभव पत्करावा लागला. इजिप्तच्या हानियाने ११-८, ११-५, ९-११, ११-८ अशा गुणांनी विजय मिळवत स्पर्धेत आपली आगेकूच कायम राखली.

### मीनाक्षी, जस्मिन उपांत्य फेरीत

**उलानबातर (मंगोलिया) :** आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियुद्ध संघाने आपली प्रभावी कामगिरी कायम राखली असून, विद्यमान जागतिक विजेत्या



मीनाक्षी हुडा व जस्मिन लंबोरियाने रविवारी येथे झालेल्या लढतींमध्ये दणदणीत विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली. या दोघींच्या विजयामुळे संपूर्ण भारतीय महिला संघ स्पर्धेत पदक मिळवणार असल्याचे निश्चित झाले आहे. पुरुषांच्या गटातही लोकेश, आकाश आणि हर्ष चौधरीने आपापल्या लढती जिंकत स्पर्धेच्या अंतिम चारच्या टप्प्यात प्रवेश केला. मीनाक्षीने जपानच्या युका सादामत्सूचा ५-० असा पराभव केला. महिलांच्या ४८ किलो वजनी गटातील या लढतीवर मीनाक्षीने पूर्णपणे नियंत्रण मिळवले होते.५७ किलो वजनी गटात जॅस्मिनने चीनच्या झियी चेनवर ५-० अशाच एकतर्फी निकालाने मात करत उपांत्य फेरीत आपले स्थान पक्के केले. पुरुषांच्या गटात, लोकेशने (८५ किलो) कोरियाच्या गिचाई किमवर ५-० असा निर्विवाद विजय मिळविला,तर आकाशनेही (७५ किलो) तुर्कमेनिस्तानच्या य्हलास बाग्टियारॉव्हवर ५-० असा विजय मिळवला. हर्ष चौधरीने (९० किलो) किर्गिझ प्रजासत्ताकच्या टिनिस्तान अलिबायेव्हचा पराभव केला आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला.

### भारतीय महिला फुटबॉल संघाचा ऑस्ट्रेलियाकडून ०-५ ने पराभव

**पाथुम थानी :** थायलंड येथे पाथुम थानी स्टेडियमवर रविवारी झालेल्या २० वर्षांखालील महिला आशियाई चषक फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाकडून ०-५ अशा पराभवाला सामोरे जावे लागले. स्काय हॅल्मरिकच्या (३८, ३९, ४८) हॅट्ट्रिकमुळे ऑस्ट्रेलियाने सामन्यावर पूर्ण वर्चस्व गाजवले; त्यानंतर डॅनेला ब्रूटस (५४) आणि डेझी ब्राउनने (९०+४) ऑस्ट्रेलियाच्या खात्यात आणखी दोन गोलची भर घातली. या निकालासह, भारत सध्या क गटात तळाच्या स्थानावर असून, दोन सामन्यांतून त्यांच्या खात्यावर शून्य गुण जमा आहेत. बुधवारी चीन तैपेईविरुद्ध होणाऱ्या गटातील शेवटच्या सामन्यात विजय मिळवल्यास, जोआकिम अलेक्झांडरसन यांच्या मार्गदर्शनाखालील भारतीय संघाला स्पर्धेच्या नॉकआउट फेरीत प्रवेश मिळवणे अजूनही शक्य आहे. भारतीय संघाने सामन्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात सकारात्मक सुरुवात केली होती.

### अदिती अव्वल २० मध्ये

**लास वेगास :** येथील अरामको गोल्फ स्पर्धेत भारताच्या अदिती अशोकला तिसऱ्या फेरीत निराशाजनक कामगिरीचा सामना करावा लागला. तिने फोर-ओव्हर ७६ चा स्कोअर नोंदविला, त्यामुळे स्पर्धेची एक फेरी शिल्लक असताना ती संयुक्तपणे २० व्या स्थानावर घसरली आहे. अदितीचा (७४-७१-७६) या आठवड्यातील एकूण स्कोअर आता फाइव्ह-ओव्हर पार इतका झाला आहे. या स्पर्धेत सहभागी असलेल्या इतर भारतीय खेळाडू, प्रणवी उर्स (७८) आणि अवनी प्रशांत (८१), यांना मात्र संघर्ष करावा लागत आहे. प्रणवीचा स्कोअर आता १३-ओव्हर पार आहे, तर अवनीचा स्कोअर १६-ओव्हर पार आहे. स्पर्धेचा एक दिवस बाकी असताना, या दोघी अनुक्रमे संयुक्तपणे ६९ व्या व ७३ व्या स्थानावर आहेत. दीक्षा डागरला या आठवड्याच्या सुरुवातीलाच पुढच्या फेरीसाठी पात्र होण्याचा निकष गाठण्यात अपयश आले होते.

# लखनौचा हैदराबादवर ५ गड्यांनी विजय

### ऋषभ पंतची नाबाद अर्धशतकी विजयी खेळी



| ऋषभ पंत | नाबाद | चेंडू | चौकार |
|---|---|---|---|
| | ६८ | ५० | ९ |

♦ **हैदराबाद, ५ एप्रिल**

राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम येथे खेळल्या गेलेल्या आयपीएल सामन्यात कर्णधार ऋषभ पंतच्या नाबाद अर्धशतकी खेळीच्या बळावर लखनौ सुपर जायंट्सने सनरायझर्स हैदराबादवर एक चेंडू शिल्लक ठेवित ५ गड्यांनी विजय नोंदविला. पंतने ५० चेंडूंत ९ चौकारांच्या मदतीने नाबाद ६८ धावांची विजयी खेळी केली.

लखनौचा हा या हंगामातील पहिल्या पराभवानंतर हा पहिलाच विजय ठरला. विजयी सुरुवात केल्यानंतर हैदराबादला पहिला पराभव पत्करावा लागला. या दोन्ही संघांचे प्रत्येकी २ गुण झाले आहेत.

लखनौ सुपर जायंट्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. सनरायझर्स हैदराबादने २० षटकांत ९ बाद १५६ धावा केल्या आणि लखनौ संघासमोर विजयासाठी १५७ धावांचे लक्ष्य ठेवले. लखनौने १९.५ षटकांत ५ गडी गमावित १६० धावा काढून आपला विजय साकार केला. लखनौ कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने हैदराबादला डावाच्या प्रारंभीच दोन हादरे दिले. पहिल्या षटकाच्या अखेरीस शमीने ट्रॅव्हिस हेडला (७) मार्करामकडून झेलबाद केले, तर तिसऱ्या षटकांतील पहिल्याच चेंडूवर अभिषेक शर्माला भोपळा फोडण्याआधीच सिद्धार्थकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. यात भर म्हणजे चौथ्या षटकांत प्रिन्स यादवने कर्णधार ईशान किशनचा (१) त्रिफळा उडविला. याबरोबरच सनरायझर्स हैदराबादची पहिली फळी कोसळली. पुढे लियाम लिव्हिंगस्टोन (१४) दिग्वेश राठीच्या फिरकीला बळी पडला. त्यामुळे हैदराबादची ७.१ षटकांत ४ बाद २६ धावा अशी अवस्था झाली. त्यानंतर मात्र हेनरिक क्लासेन व नितीश कुमार रेड्डीने तडाखेबंद फलंदाजी करत हैदराबादचा डाव सावरला. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी ११३ धावांची भागीदारी केली. संघाला १४२ धावांवर पोहोचवले असताना नितीश कुमार रेड्डी मणिमारन सिद्धार्थच्या चेंडूवर प्रिन्स यादवकडून झेलबाद झाला. नितीश कुमारने ३३ चेंडूंत ३ चौकार व ५ षट्कारांसह ५६ धावांची खेळी केली. पुढे संघाच्या खात्यात दोन धावांची भर पडत नाही तोच, हेनरिक क्लासेनने आवेश खानच्या चेंडूवर यष्टिमागे पंतकडे झेल सोपविला. क्लासेनने ४१ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह ६२ धावांचे योगदान दिले. नंतर अनिकेत वर्मने एक बाजू सांभाळीत हर्ष दुबे (०), शिवांग कुमार (५) व हर्षल पटेल (४) यांच्या साथीने हैदराबादला २० षटकांत ९ बाद १५६ धावांचा टप्पा गाठून दिला.

लखनौकडून मोहम्मद शमी, प्रिन्स यादव व आवेश खानने प्रत्येकी २ बळी, तर दिग्वेश राठी व मणीमारन सिद्धार्थने प्रत्येकी १ बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना एडन मार्कराम व मिचेल मार्श या सलामी जोडीने ३७ धावांची भागीदारी करून लखनौला चांगली सुरुवात करून दिली. ईशान मलिंगाने बाद करण्यापूर्वी मार्शने १२ चेंडूंत १४ धावा केल्या. पुढे मार्कराम व कर्णधार ऋषभ पंतने दुसऱ्या गड्यासाठी ४० धावांची भागीदारी केली. शिवांग कुमारने रोखल्यामुळे मार्करामचे थोडक्यात अर्धशतक हुकले, मात्र यादरम्यान पंतने आपले अर्धशतक पूर्ण केले. एडन मार्करामने २७ चेंडूंत ६ चौकार व २ षट्कारांच्या मदीतने ४५ धावा केल्या. पुढे पंतने कर्णधारपदाला साजेशी कामगिरी करीत आपल्या संघाला विजयाच्या दिशेने नेले, मात्र दुसऱ्या टोकावरून त्याचे सहकारी- आयुष ब दोनी (१२), निकोलस पूरन (१) व अब्दुल सामद (१६) नियमित अंतराने तंबूत परतले. मात्र पंतने खंबीरपणे किल्ला लढवित मुकुल चौधरीच्या साथीने नाबाद खेळी करीत लखनौ सुपर जायंट्सच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. पंतने नाबाद ६८ धावांची, तर चौधरीने नाबाद २ धावांची खेळी केली. हैदराबादकडून हर्ष दुबेला २ बळी, तर ईशान मलिंगा व शिवांग कुमारला प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश आले. ◂(वृत्तसंस्था)

# देवदत्त, रजत, डेव्हिडची दमदार खेळी

### सीएसकेविरुद्ध आरसीबी ३ बाद २५०



फटका मारताना आरसीबीचा देवदत्त पडिक्कल



फटका मारल्यानंतर धाव घेताना रजत पाटीदार

♦ **बंगळुरू, ५ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर चेन्नी सुपर किंग्स (सीएसके) विरुद्धच्या सामन्यात आपल्या घरच्या मैदानाचा पुरेपूर फायदा घेत देवदत्त पडिक्कलसह (५०) सलामीवीर फिल सॉल्ट (४६) , कर्णधार रजत पाटीदार (नाबाद ४८) आणि टिम डेव्हिडने (नाबाद ७०) तडाखेबंद फलंदाजी करत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला (आरसीबी) २० षटकांत ३ बाद २५० धावा उभारून दिल्या. या बरोबरच आरसीबीने सीएसकेला विजयासाठी २५१ धावांचे आव्हान दिले.

सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून यजमान आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले.

फिल सॉल्ट व विराट कोहली या सलामीवीरांनी आपल्या घरच्या मैदानावर स्वैर फलंदाजी करत ३७ धावांची भागीदारी करून आरसीबीच्या डावाला चांगली सुरुवात केली. कोहलीकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, परंतु अंशुल कम्बोजच्या आखुड टप्प्याच्या चेंडूवर त्याचा झेल उडाला व दुबेने तो पकडला. कोहलीने १८ चेंडूंत २ चौकार व एका षट्कारसह २८ धावा केल्या. पुढे फिल सॉल्ट व देवदत्त पडिक्कलची जोडी खेळपट्टीवर रमली. या दोघांनी सीएसकेच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत दुसऱ्या गड्यासाठी ५६ धावांची भागीदारी करून संघाला शंभर धावांच्या जवळपास आणले. फिल सॉल्ट वैयक्तिक अर्धशतकाच्या उंबरठ्यावर होता, परंतु त्याचवेळी शिवम दुबेने त्याला नूर अहमदकडून झेलबाद केले. फिल सॉल्टने ३० चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ४६ धावांची खेळी केली. नंतर देवदत्तने कर्णधार रजत पाटीदारच्या साथीने आपले अर्धशतक पूर्ण केले असताना जेमी ओव्हर्टनने देवदत्तचा त्रिफळा उडविला. ओव्हर्टनने पूर्ण लांबीचा आणि वेगवान चेंडू टाकत पडिक्कलला रोखले व आपल्या पाचव्याच सामन्यातील हा पहिला आयपीएल बळी मिळविला. तोपर्यंत आरसीबीने १४.१ षटकांत ३ बाद १५१ धावांचा टप्पा गाठला. देवदत्त पडिक्कलने अवघ्या २९ चेंडूंत ५० धावांची खेळी केली, यात त्याने ५ चौकार व २ षट्कार हाणलेत.

**पाटीदार-डेव्हिडची नाबाद ९९ धावांची भागीदारी**

पुढे रजत पाटीदार व टिम डेव्हिडनेही जबरदस्त फलंदाजी करत आरसीबीच्या धावसंख्येला आकार दिला. या दोघांनीही डावाच्या अखेरपर्यंत सीएसकेच्या गोलंदाजांना चांगलेच झोडपून काढले. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी नाबाद ९९ धावांची भागीदारी करत आरसीबीला मर्यादित २० षटकांत ३ बाद २५० धावांचा रचून दिल्या. रजत पाटीदारने अवघ्या १९ चेंडूंत १ चौकार व ६ षट्कार ठोकून नाबाद ४८ धावांची खेळी केली, तर टिम डेव्हिडने अवघ्या २५ चेंडूंत नाबाद ७० धावांची खेळी केली, यात त्याने ३ चौकार व तब्बल ८ षट्कार ठोकले. ◂(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र खो-खो संघटनेच्या अध्यक्षपदी सुनेत्राताई पवार यांची अविरोध निवड

### राज्याच्या खो-खो इतिहासात पहिल्यांदाच महिला अध्यक्ष

♦ **पुणे, ५ एप्रिल**

'खेळ बदलेल, दिशा बदलेल!' अशा उत्साहात महाराष्ट्र खो-खो विश्वात आज ऐतिहासिक क्षण घडला, जेव्हा



उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांची महाराष्ट्र खो-खो संघटनेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड जाहीर झाली.

खो-खो, कबड्डी, कुस्ती आणि मल्लखांबसारख्या परंपरागत खेळांमध्ये राज्य संघटनेच्या अध्यक्षपदी पहिल्यांदाच महिला विराजमान झाल्याने हा क्षण सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणार आहे. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या या पदावर सुनेत्राताईंनी एकहाती बाजी मारत नवा अध्याय सुरू केला आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

**एकच अर्ज, थेट बिनविरोध विजय**

५ एप्रिल रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध झाली. निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. धीरज कोल्हे यांनी अधिकृत घोषणा करताच सभागृहात उत्साहाची लाट उसळली. या वेळी लोकेश्वरा (उपाध्यक्ष, भारतीय खो-खो महासंघ व कर्नाटक संघटना) व प्रदीप खांडरे (महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना) निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

**टाळ्यांचा कडकडाट: अभिनंदनांचा वर्षाव!**

सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुनेत्राताई अजित पवार यांचे अभिनंदन केले. सुनेत्राताई अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील खेळाडूंना अधिक संधी, उत्तम सुविधा आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे यश मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# केकेआरला मुसंडी मारण्याची गरज

### पंजाब किंग्स सलग तिसऱ्या विजयास उत्सुक



श्रेयस अय्यर



अजिंक्य रहाणे

♦ **कोलकाता, ५ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि पंजाब किंग्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. संकटात सापडलेल्या केकेआरला पराभवाची मालिका खंडित करण्यासाठी मरगळ झटकून जोरदार मुसंडी मारण्याची गरज असेल, तिकडे, फॉर्मात असलेला पंजाब किंग्स संघ सलग तिसरा विजय नोंदविण्यास उत्सुक असेल.

या हंगामात आपले पहिले दोन्ही साखळी सामने जिंकून पंजाब किंग्स ४ गुणांसह दहा संघाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे, तर केकेआरने आपले पहिले दोन्ही सामने गमावले असून ते भोपळ्यासह नवव्या स्थानावर आहे. तीन वेळा विजेतेपद पटकावलेल्या केकेआर संघाची मोठी समस्या त्यांच्या सदोष संघ रणनीतीमध्ये दडलेली आहे, त्यामुळे त्यांना आता सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागत आहे.

श्रेयस अय्यरने केकेआरला २०२४ चे विजेतेपद मिळवून दिले होते, त्याला संघात कायम न ठेवण्याचा निर्णय अनेकांच्या भुवया उंचावणारा ठरला होता.

अय्यरने २०२५ मध्ये पंजाब किंग्सला उपविजेतेपदापर्यंत नेऊन स्वतःला सिद्ध केले. या कामगिरीसह, तीन वेगवेगळ्या फ्रॅन्चायझींना - दिल्ली कॅपिटल्स (२०२०), केकेआर (विजेते २०२४) व पंजाब किंग्स (२०२५) - अंतिम फेरीपर्यंत पोहोचवणारा तो पहिला कर्णधार ठरला.

याउलट, केकेआरसाठी गत हंगामातील कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरली, २००९ नंतर पहिल्यांदाच त्यांना गुणतालिकेत आठव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. कर्णधार अजिंक्य रहाणेने, संघाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होऊन टीकाकारांची तोंडे काही प्रमाणात बंद केली. मात्र, चंद्रकांत पंडित यांच्या जागी अभिषेक नायर यांची मुख्य प्रशिक्षकपदी केलेली नियुक्ती यासह, संघाच्या एकूणच विचारसरणीवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

केकेआरसाठी कार्तिक त्यागी व अंगकृश रघुवंशीचे प्रयत्न सकारात्मक बाब आहे, परंतु त्यांचे प्रयत्न पुरेसे नाही.

याउलट, पंजाब किंग्सच्या बाजूने सर्व काही अनुकूल घडत आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली पंजाब किंग्स संघ दोन सामन्यांत दोन विजय मिळवून या सामन्यात उतरत आहे.

कूपर कॉनोलीने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना दोन सामन्यांत १०८ धावा करून सर्वांना चकित केले आहे, तर प्रियांश आर्य व प्रभसिमरन सिंगनेही झंझावाती सुरुवात करून दिली आहे. अय्यरने मधल्या षटकांमध्ये आत्मविश्वासाने फलंदाजी सांभाळली आहे.

अर्शदीप सिंग, मार्को जानसेन व विजयकुमार विशाक व अनुभवी लेग-स्पिनर युझवेंद्र चहलचा समावेश असलेली त्यांची गोलंदाजी संतुलित दिसते. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**कोलकाता नाईट रायडर्स वि. पंजाब किंग्स**
**स्थळ :** ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# ग्रनाडा विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत वर्चस्व गाजविण्याचे भारताचे लक्ष्य

♦ **ग्रनाडा (स्पेन), ५ एप्रिल**

स्पेनच्या ग्रनाडा येथे सोमवारपासून आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेला सुरूवात होत आहे. भारतीय पिस्तूल व रायफल नेमबाज या हंगामाची




सुरुवात करणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत मोठ्या आत्मविश्वासाने आणि दृढ निश्चयाने उतरतील. गेल्या वर्षी त्यांनी गाजवलेले वर्चस्व कायम राखण्याचा त्यांचा निर्धार आहे.

मोरोक्को येथे झालेल्या शॉटगन विश्वचषक स्पर्धेतील निराशाजनक सुरुवातीनंतर भारताची कामगिरी अत्यंत विसरण्याजोगी ठरली होती. आता सर्वांचे लक्ष पिस्तूल आणि रायफल स्पर्धांकडे वळले आहे. या स्पर्धेत भारतीय संघ नव्या जोमाने आणि जिंकण्याच्या प्रबळ मानसिकतेने उतरण्यास उत्सुक असेल.

ऑलिम्पियन रिदम सांगवान, अंजुम मौदगिल आणि मेहुली घोष यांसारख्या देशातील काही सर्वोत्तम नेमबाजांच्या उपस्थितीमुळे संघाचा आत्मविश्वास अधिकच दुणावला आहे.

तथापि, या संघात दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर आणि विश्वविजेता सम्राट राणा यांचा समावेश नसल्यामुळे, संघाला त्यांच्या अनुभवाची उणीव नक्कीच भासेल. ◂(वृत्तसंस्था)

# तुषार देशपांडेच्या कामगिरीमुळे निवड समितीचे लक्ष वेधले जाणार : डेल स्टेन

♦ **नवी दिल्ली, ५ एप्रिल**

राजस्थान रॉयल्सचा वेगवान गोलंदाज तुषार देशपांडेने गुजरात टायटन्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात अखेरच्या षटकांत दाखवलेला संयम व गोलंदाजीची अचूक अंमलबजावणी यामुळे राष्ट्रीय निवड समितीचे लक्ष नक्कीच वेधले जाईल, असे दक्षिण आफ्रिकेचा महान वेगवान गोलंदाज डेल स्टेन म्हणाला. स्टेन हा तुषार देशपांडेच्या या आयपीएल हंगामातील कामगिरीने प्रभावित झाला आहे.

देशपांडेने राजस्थान रॉयल्ससाठी २०२६ च्या आयपीएल हंगामाची सुरुवात अत्यंत दमदारपणे केली आहे. शनिवारी अहमदाबाद येथे गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात, अखेरच्या षटकांत केवळ १० धावा रोखून धरत



त्याने संघाला विजय मिळवून देणारी कामगिरी केली. अखेरच्या षटकांत देशपांडेने रशीद खानला आपल्या चातुर्याने कसे निष्प्रभ केले.

तुषार देशपांडेने टाकलेले अखेरचे षटक अप्रतिम होते. दबावाखाली असतानाही त्याने यॉर्कर्सची अचूक अंमलबजावणी केली. रशीद खानसारख्या खेळाडूला चौकार-षट्कार मारण्याची कोणतीही संधी त्याने दिली नाही. तसेच, २०० हून अधिक धावांचा पाठलाग करताना सामन्याच्या अखेरच्या षटकांत आपल्या संघाला कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागणार नाही, याची त्याने खात्री केली, असे स्टेन म्हणाला.

अशा प्रचंड दबावाच्या परिस्थितीत गोलंदाजासाठी शांत राहणे खूप कठीण असते, कारण त्यावेळी मनात अनेक विचार येत असतात. परंतु, दबावाचा कोणताही परिणाम स्वतःवर होऊ न देता, आपल्या योजनांची अचूक अंमलबजावणी करणे हे एक दुर्मिळ कौशल्य आहे, असेही तो म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

# मेस्सीचा गोल, पण इंटर मियामीची लढत बरोबरीत



ऑस्टीन संघाच्या ॲलेक्झांडर स्वोतेकला हुलकावणी देत आगेकूच करताना लियोनेल मेस्सी

♦ **मियामी, ५ एप्रिल**

मेजर लीग फुटबॉल स्पर्धेत स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने आपल्या नवीन घरच्या मैदानावर उत्स्फूर्त खेळाचे प्रदर्शन केले, परंतु आपल्या इंटर मियामी संघाला ऑस्टीन एफसीविरुद्ध विजय मिळवून देता आला नाही व ही लढत बरोबरीत राहिली.

अजूनही बांधकाम सुरू असलेल्या आपल्या स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्याच सामन्यात, गतविजेत्या इंटर मियामीने ऑस्टिन एफसीविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधत कशीबशी सुटका करून घेतली. या सामन्यात मेस्सीने १० व्या मिनिटाला हेडरद्वारे (डोक्याने चेंडू मारून) गोल केला, तर लुईस सुआरेझने ८२ व्या मिनिटाला जोरदार व्हॉली मारत गोलजाळीचा वेध घेतला व सामना बरोबरीत राखला. इंटर मियामी (३-१-२) आता आपल्या मागील पाच सामन्यांमध्ये अपराजित राहिली आहे, तर ऑस्टिन (१-२-३) आपल्या मागील चार सामन्यांमध्ये विजयाविना राहिली आहे.

इंटर मियामीचा हा सातवा हंगाम आहे (आणि मेस्सीसोबतचा तिसरा), परंतु आतापर्यंत त्यांनी आपले घरचे सामने फोर्ट लॉडरडेल येथे खेळले होते. ◂(वृत्तसंस्था)


# विजयकुमारला ताशी १५० किमी वेगाचा टप्पा गाठायचाय्

♦ **कोलकाता, ५ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये पंजाब किंग्सचा वेगवान गोलंदाज विजयकुमार वैशाक सातत्याने १५० किमी प्रति तास वेगाचा टप्पा गाठू इच्छित आहे.

विजयकुमारने आपल्या गोलंदाजीतील विविधतेत भर घालण्यासोबतच, दोन सामन्यांत पाच बळी मिळवून या हंगामात आतापर्यंतच गत हंगामातील कामगिरीला मागे टाकले आहे. गत हंगामात त्याने पाच सामन्यांत केवळ चार बळी मिळविले होते. त्याने आपल्या कारकिर्दीची सुरुवात २०२३ मध्ये आरसीबीकडून केली होती आणि त्यानंतर तो पंजाब किंग्ज संघात दाखल झाला.

कर्नाटकचा रहिवासी असलेल्या या २९ वर्षीय गोलंदाजाने या हंगामात आपल्या वाईड यॉर्कर्स आणि स्लो बाऊन्सर्सने सर्वांना प्रभावित केले आहे. चेन्नई येथे सीएसकेविरुद्ध झालेल्या मागील सामन्यात, त्याने उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या आयुष म्हात्रे आणि सरफराज खानला बाद करीत प्रतिस्पर्धी संघाला ५ बाद २०९ धावांवर रोखले; ही धावसंख्या त्याच्या संघाने सहजपणे गाठली.



पंजाब किंग्ज संघ विजयकुमारचा वापर सामन्याच्या तिन्ही टप्प्यांमध्ये करीत आहे आणि हा वेगवान गोलंदाज या आव्हानाचा मनमुराद आनंद घेत आहे.

आपल्या कौशल्यात सातत्याने सुधारणा करण्याव्यतिरिक्त यशस्वी होण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही.

सध्या इतर गोलंदाज ज्या वेगाने गोलंदाजी करत आहेत, तितका वेग माझ्याकडे नाही. काही गोलंदाज १५४, १५५ किमी प्रति तास वेगाने गोलंदाजी करत आहेत. मी मात्र १४०, १४३, १४४ किमी प्रति तास वेगाने गोलंदाजी करू शकतो. पण हो, मला आव्हाने स्वीकारायला आवडतात, असे तो म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# राष्ट्रवादीच्या अल्पसंख्याक कार्यकर्त्यावर अन्याय ?

## कारवाई तात्काळ थांबवली नाही तर आत्मदहनाचा इशारा



**टेंभुर्णी, दि. ५ एप्रिल-**
टेंभुर्णी (ता. माढा) भाजपच्या सत्ताकाळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यावर अन्याय होत असल्याची चर्चा रंगत असतानाच, उजनी धरण व्यवस्थापन, भिमानगर येथील अधिकाऱ्यांनी राजकीय दबावापोटी केवळ अल्पसंख्याक असल्याने दुजाभाव करत शेतपीकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचा आरोप करत टेंभुर्णी येथील शेतकरी तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश महासचिव शब्बीर बाबासाहेब जहागीरदार (वय ६९) यांनी दि. ७ एप्रिल रोजी आत्मदहनाचा इशारा दिल्याने संपूर्ण माढा तालुक्यात खळबळ उडाली आहे. प्रशासनाच्या कारवाईला वैतागून त्यांनी हा टोकाचा इशारा दिला आहे. जहागीरदार यांच्या म्हणण्यानुसार, मौजे कंदर (ता. करमाळा) येथील गट क्रमांक ४१२/२ मधील त्यांच्या जमिनीवर दि. ८ जानेवारी २०२६ रोजी शाखा अधिकारी योगेश मोरे व उपविभागीय अभियंता नागेश जडे यांनी अतिक्रमणाचा ठपका ठेवत नोटीस बजावली. त्याच दिवशी करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर दि. २३ फेब्रुवारी रोजी कोणतीही पूर्वसूचना न देता पोकलेनच्या सहाय्याने उभे मका पीक नष्ट करण्यात आल्याचा आरोप असून, यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले.विशेष म्हणजे, या प्रकरणात एकूण ६५ शेतकऱ्यांना केवळ नोटिसा देण्यात आल्या असून प्रत्यक्ष कारवाई मात्र फक्त जहागीरदार यांच्यावरच करण्यात आली आहे. यामागे राजकीय सुडापोटी त्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात असल्याचे समजते, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, दि. १७ मार्च रोजी संबंधित अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस पाठवूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. उलट दि. २ एप्रिल रोजी पुन्हा उभ्या पिकांच्या विनाशाची नोटीस देण्यात आली असून दि. ७ एप्रिल रोजी कारवाई निश्चित करण्यात आली आहे. अत्यल्प कालावधीत नोटीस देऊन नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा भंग करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या सर्व प्रकारामुळे मानसिक, शारीरिक व आर्थिक छळ होत असल्याचा दावा करत, "दि. ७ एप्रिल रोजीची कारवाई तात्काळ थांबवली नाही, तर त्याच दिवशी आत्मदहन करणार," असा इशारा जहागीरदार यांनी प्रशासनाला दिला आहे.

## महत्वाचे...

### माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**
विवाहितेला पती व सासऱ्याने घालून पाडून बोलून, अपमानित करत अर्वाची शिवीगाळ करून नवीन घर खरेदी करण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये असे म्हणत हाताने मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. याची हकीकत अशी की, दि. १ ऑगस्ट २०२३ ते ७ जानेवारी २०२६ पर्यंतच्या दरम्यान शशिकांत पती, चिदानंद सासरे, दोघे रा. भूतनाथ तांडा, सोलापूर बायपास रोड, सोलापूर यांनी संसार उपयोगी सामान दिले नाही, सोने पैसे दिले नाही, योग्य तो मानपान केला नाही. घरातील किरकोळ कारणावरून भाग्यश्री शशिकांत हिरेमठ, वय २१, रा. प्लॉट नंबर ६ प्रियदर्शन नगर, जुनावीडी घरकुल, सोलापूर यांना घालून पाडून बोलून, अपमानित करत अर्वाची शिवीगाळ करून नवीन घर खरेदी करण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये असे म्हणून हाताने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. वेळोवेळी शिवीगाळ शारीरिक व मानसिक त्रास दिला आहे. याबाबत दि. ४ एप्रिल रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास कटके करत आहेत.



### दुचाकी वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**
सिविल हॉस्पिटल येथे गेट जवळ आला असता अज्ञात दुचाकी वाहनावरील चालकाने धडक दिली. त्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. त्याबाबत अज्ञात वाहनचालका विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या हकीकत अशी की, दि. २८ मार्च रोजी कल्पना महादेव खजिनदार, वय ४१, रा. भगवान नगर झोपडपट्टी, सोलापूर यांचा भाऊ गणेश खजिनदार हा सिविल हॉस्पिटल येथे ए ब्लॉकच्या गेट जवळ आला असता त्याला अज्ञात दुचाकी वाहनावरील चालकाने धडक दिल्याने त्याला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले होते. गणेश खजिनदार, वय ४० यांचा दि. ४ एप्रिल रोजी अज्ञात दुचाकी वाहन चालका विरोधात सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास साखरे करत आहेत.

## निधन वृत्त...

### विमल हंचे



**मोहोळ, दि. ५ एप्रिल -**
येथील चौमुखी मारुती चौकातील जेष्ठ नागरिक श्रीमती विमल दत्तात्रय हंचे (वय ८६वर्षे ) यांचे वृद्धापकाळाने रविवारी सोलापूर येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात रा.स्व. संघाचे कार्यकर्ते संतोष हंचे, मुलगी, सूना दुर्गा,गीता,सुनिता,नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून त्यांच्या पार्थिवावर सोलापूरात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अंबादास उर्फ बाबण्णा मिठ्ठा



**सोलापूर, दि.५ एप्रिल-**
जुना विडी घरकुल येथील रहिवासी अंबादास उर्फ बाबण्णा रामचंद्र मिठ्ठा यांचे हृदयविकाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रिक्षाचालक बाबण्णा या नावाने ते सर्वदूर परिचित होते.

# मंद्रूप ग्रामपंचायतीच्या कर वसुलीत भ्रष्टाचार ?

## कर भरलेल्या करदात्यांची चावडीवाचन करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ५ एप्रिल-**
शासनाच्या मिशन स्वाभिमान कर संकलन मोहीमेत थकीत घरपट्टी व पाणीपट्टी वसूलीसाठी धडक मोहीम राबविण्यात आली. १४ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर दरम्यान ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी मंद्रूप ग्रामपंचायतीने साठ लाखापेक्षा अधिक कर संकलन केले . मात्र यावेळी ग्रामपंचायत सदस्य व कर्मचार्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे कर भरलेल्या करदात्यांची चावडीवाचन करण्याची मागणी होत आहे.

मिशन स्वाभिमान कर संकलन मोहीमेद्वारे कोट्यावधी रूपयांची कर वसूली करण्यात आली. मंद्रूपसारख्या ग्रामपंचायतीचे थकित कर दोन कोटीपेक्षा अधिक आहे. यावेळी ग्रामपंचायत कर्मचार्यांनी जनजागृती करून साठ लाखापेक्षा अधिक कर संकलने केले. यावेळी अनेक ग्रामपंचायत सदस्य व कर्मचार्यांनी करदात्यांकडून कर घेऊनही पावती दिली नाही. तसेच दप्तरात बिल जमा नोंद केल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे लाखो रूपयांचे कर कार्यालयाकडे जमा न होता परस्पर हडप करण्यात आल्याने गावाच्या विकासाला खीळ बसत आहे. मंद्रूप ग्रामपंचायत व ग्रामसेवकांकडे याबाबत विचारले असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहेत. दक्षिणच्या बीडीओकडे तक्रार केल्यानंतरही दखल घेण्यात येत नाही. त्यामुळे तक्रारदारांचा संशय बळावला आहे. करदात्यांनी विविध प्रापंचिक अडचणी असताना ग्रामपंचायतीकडे कर भरले. मात्र दप्तरी कर भरल्याची नोंदच नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कर भरलेल्या करदात्यांचे चावडीवाचन करण्याचे आदेश देण्याची मागणी होत आहे.

### करसंकलन माहीती देण्यास टाळाटाळ

शासनाच्या मिशन स्वाभिमान कर संकलन मोहीमेत मंद्रूपच्या नागरीकांनी साठ लाखापेक्षा अधिक कर भरून मंद्रूपच्या विकासास प्राधान्य दिले. मात्र कर संकलन मोहीमे अंतर्गत जमा झालेली रक्कम व खर्चाचा हिशोब देण्यास ग्रामसेवक नागेश जोडमोटे टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे करदात्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

### दक्षिणच्या बीडीओंकडून दुर्लक्ष

मंद्रूप ग्रामपंचायतीत घरपट्टी व पाणीपट्टी कर भरणामध्ये घोटाळा झाला आहे. त्यामुळे मंद्रूपमधिल कर भरलेल्या करदात्यांचे चावडीवाचन करण्याचे निवेदन दक्षिणचे बीडीओ मनोज राऊत यांच्याकडे दिला आहे. मात्र बीडीओंकडून जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने भ्रष्टाचाराबद्दल संशय निर्माण होत आहे. चावडीवाचन न झाल्यास आंदोलन करणार आहे.

- **लक्ष्मण रणखांबे,** तक्रारदार मंद्रूप

### संकलित कर रक्कमेचा गैरवापर

शासनाच्या मिशन स्वाभिमान कर संकलनात मंद्रूप ग्रामपंचायतमध्ये साठ लाखापेक्षा अधिक कर जमा झाला आहे. यावेळी अनेक ग्रामपंचायत सदस्य व कर्मचार्यांनी कर भरणा करताना भ्रष्टाचार केला आहे. तसेच जमा झालेल्या कर रक्कमेचाही गेरवापर झाल्याने चावडीवाचन करून नागरीकांना हिशोब द्यावे.

**-जावीद आवटे,** तालुकाध्यक्ष,
अखिल भारतीय किसान सभा, दक्षिण सोलापूर

# विणकर बगीचा येथे स्वच्छता अभियान



### १८० जणांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सोलापूर शहर दयानंद नगर सेवा विभागाच्यावतीने पूर्व विभाग विणकर बगीचा कन्ना चौक येथे रविवारी ५ एप्रिल रोजी सकाळी ७.३० ते ९ या वेळेत स्वच्छता अभियान उपक्रम उत्साहात पार पडला.

या स्वच्छता अभियानात १८० जणांचा सहभाग होता. या उपक्रमात हरिओम संस्था, विणकर प्रभात मंडळ, संजीवनी फाऊंडेशन, विणकर वॉकिंग समूह, भूमकर वॉकिंग समूह, योगा समूह, बरेच संस्था सुद्धा सहभागी झाल्या तसेच परिसरातील नागरिक, महिला, पुरुष व बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे प्रदीपसिंग रजपूत सोलापूर जिल्हा सरकारी वकील यांच्या हस्ते भारतमाता पूजनाने करण्यात आली. यावेळी सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनचे सीईओ प्रविण तळे, सोलापूर जिल्हा सेवा विभागाचेंकरपे आदी उपस्थित होते.



# बागेवाडी ते मंगळवेढा बसवज्योत सायकल यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### स्मारकाच्या मागणीला बळ

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.४ एप्रिल-**
संत बसवेश्वर महाराजांच्या जन्मभूमी बागेवाडी येथून निघालेली 'बसवज्योत' सायकल यात्रा रविवारी सायंकाळी सहा वाजता मंगळवेढा येथील संत दामाजी चौकात दाखल होताच बसवप्रेमींनी तिचे उत्स्फूर्त स्वागत केले. घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि संपूर्ण शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

संत बसवेश्वर महाराजांनी तब्बल तेरा वर्षे मंगळवेढा परिसरात कार्य केले. त्यांच्या कार्याचा इतिहास सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा आणि येथे राष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक उभारले जावे, या प्रमुख मागणीसाठी ही सायकल यात्रा काढण्यात आली. यात्रेदरम्यान वाटेत येणाऱ्या प्रत्येक गावात स्मारकाच्या गरजेबाबत जनजागृती करण्यात आली. या 'बसवज्योत'चा प्रारंभ बागेवाडी येथील संत बसवेश्वर मंदिरातून करण्यात आला. रविवारी पहाटे मंदिराच्या मठाधिपती सिंध्यलिंग स्वामीजी उपस्थितीत व डॉ.महंतेश जालगिरे,राष्ट्रीय बसव सैनिक संघटनेचे संघटक अध्यक्ष,शरणगौडा एस. बिरादार, राष्ट्रीय बसव सैनिक संघटनेचे

संचालक श्रीकांत कोटप्पा आदी मान्यवरांच्या हस्ते ज्योत पूजन करून सायकलस्वार मंगळवेढ्याकडे रवाना झाले. या दोन दिवसीय प्रबोधन यात्रेत एकूण ३० जणांनी सहभाग नोंदवला. विजापूर सायकल क्लबच्या सदस्यांनीही यात्रेत सहभाग घेत कर्नाटक सरकार व प्रशासनाच्या मदतीने स्मारकाचा प्रश्न मार्गी लावण्यास सहकार्य करण्याचे आश्वासनदिले.बागेवाडी-मंगळवेढा मार्गावरील उमदी,हुलजंती, शिवणगी,मरवडे परिसरात शेकडो नागरिकांनी ज्योतीचे दर्शन घेतले. घोषणांनी आणि स्वागताने संपूर्ण परिसर भारावून गेला. ग्रामीण भागातही या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून गावोगावी डिजिटल बोर्ड, दुचाकींवरील स्टिकर्स आणि घरपोच पत्रकांद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली आहे.

या पहिल्याच उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादामुळे पुढील पाच दिवसांच्या कार्यक्रमांनाही नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळेल, असे स्पष्ट चित्र निर्माण झाले आहे. संत बसवेश्वर स्मारकासाठीची ही चळवळ आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत

# भगवान महावीरांचे सिद्धांत विश्वाला प्रेरणादायी






### आचार्य विनम्र सागरजी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ एप्रिल-**
अहिंसा, सत्य व अपरिहग्रह हे भगवान महावीरांचे सिद्धांत संपूर्ण विश्वाला प्रेरणादायी आहेत. धर्मप्रभावनेसाठी कार्य करणाऱ्या सन्मती सेवा दलाचे कार्य हे समाजभिमूख व कौतुकास्पद असल्याचे मत उच्चरणाचार्य विनम्र सागरजी महाराज यांनी व्यक्त केले.

श्री सन्मती सेवा दल बहुउद्देशीय अल्पसंख्यांक संस्था व सकल जैन समाज यांच्या वतीने सोलापूर, पुणे, सातारा, धाराशिव, नगर, बीड, मुंबई या सात जिल्ह्यांचा सामूहिक भगवान महावीरांचा २६२५ वा जन्म कल्याणक प्रभावना महोत्सव मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना आचार्य विनम्र सागरजी बोलत होते.

कार्यक्रमासाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, शितलदेवी मोहिते पाटील, ईश्वरीदेवी मोहिते पाटील, नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, उपनगराध्यक्ष शिवतेसिंह मोहिते पाटील, भारत वर्ष दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष व सेवा दलाचे संस्थापक मिहीर गांधी, समाजातील मान्यवर, दातार, सेवा दलाचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

प्रस्ताविकात आयोजक मिहीर गांधी म्हणाले, जैन धर्मप्रभावने बरोबरच ग्रामीण व शहरी भागातील जैन बांधवांच्या वैचारिक धार्मिकतेची दरी कमी व्हावी, समस्या, अडचणी यावर विचार मंथन व्हावे यासाठी सेवादल गेली १३ वर्ष एकाच ठिकाणी महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांतील जैन समाजाची एकत्रित सामूहिक भगवान महावीर जन्म कल्याणक प्रभावना महोस्तव आयोजित करते. उपस्थितांचे स्वागत अध्यक्ष इंद्रराज दोशी यांनी केले. प्रारंभी सकाळी परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत ५१ घोडे, ढोल पथक, चित्ररथ, धर्मरथ, गजरथ, हलगी लेझीम पथकाचाही सहभाग होता. कार्यात सहभागी असणारे विविध महिला मंडळे, सामाजिक संस्था, पथके, विविध स्पर्धेतील विजेते यांचा सन्मान उपस्थितांच्या हस्ते करण्यात आला.

### मार्गाला आचार्य शांतीसागर महाराजांचे नाव

आ. रणजीतसिंह मोहिते पाटील म्हणाले, भगवान महावीरांचे विचार व त्यांनी दाखवलेल्या मार्गावरच आपण सर्वांनी आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. नवीन मंदिर उभारणी बरोबरच हजारो वर्षांपूर्वीच्या जुन्या वास्तू व मंदिराचे जतन व संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे. महावीर स्तंभ ते नवीन स्टॅन्ड पर्यंतच्या मार्गाला आचार्य शांतीसागर महाराजांचे नाव देण्याची समाजाने केलेल्या मागणीला नगरपरिषदेने मंजुरी दिली असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

# शासकीय निवास स्थानातून रोख रक्कम व सोन्याचे दागिने गेले चोरीला

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**
शासकीय निवासस्थान येथून रोख रक्कम, दोन सोन्याच्या साखळ्या, कानातले टॉप, मंगळसूत्र एकूण ४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहेत. या हकीकत अशी की, दि. ३१ मार्च रोजी अज्ञात चोरट्याने शासकीय निवासस्थान, समृद्धी रूम नंबर ४ आयकर भवन, सोलापूर मधून २४ हजार रुपये रोख रक्कम व पर्समध्ये असलेल्या डबी मध्ये दोन सोन्याच्या साखळ्या, कानातले टॉप, मंगळसूत्र एकूण ४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घराच्या उघड्या दरवाज्यातून प्रवेश करून कुसुम अविनाश वाडेगावकर वय ७७ राहणार शासकीय निवासस्थान समृद्धी रूम नंबर चार आयकर भवन सोलापूर चोरून नेले आहे. याबाबत दि. ४ एप्रिल रोजी विजापूर नाका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास शिर्के करत आहेत.




# ४६ वर्षे समर्पणाची, ४६ वर्षे भाजपाची !

**६ एप्रिल १९८० भारतात सगळीकडे भाजप स्थापनेची चर्चा ! त्या काळात आम्ही सोलापुरातही भाजपा शाखा उघडण्याची वाट बघत असता, महाराष्ट्र भाजपाचे संघटन सचिव स्वर्गीय वसंतरावजी भागवत यांच्यासमवेत बसवंती मंगल कार्यालयात एकदाचे भाजपा शाखेस सुरवात झाली.**

-------------------------------


प्रभारी अध्यक्ष म्हणून रेवणसिध्द तथा बाबुरावजी भोगडे यांची नियुक्ती झाल्याचे स्व. वसंतराव भागवतानी जाहीर केले ! तद्नंतर सदस्य नोंदणीस सुरवात झाली आणि ऑक्टोबर १९८० रोजी लोकशाही मार्गाने शहर भाजपा अध्यक्षपदाची घोषणा झाली. ॲड. गजानन बसय्या हंपी आणि रविंद्र रामकृष्ण राळेरासकर या दोघांनी अध्यक्षपदासाठी अधिकृत अर्ज दाखल केले. ॲड. राचेटी वकिलांच्या मध्यस्थीनंतर रविंद्र राळेरासकर यांनी आपला अर्ज मागे घेतला. ॲड. गजानन हंपी यांची अधिकृतपणे भाजपा शहराध्यक्षपदी निवड जाहीर झाली.

शहराध्यक्षपदी निवडीची प्रक्रिया पार पडल्यानंतर सोलापूर शहराची - पदाधिकारी व कार्यकारणी ॲड. हंपी वकिलानी जाहीर केली. त्यामध्ये शामलालजी त्रिपाठी उपाध्यक्ष, गोवर्धनदासजी भुतडा, कोषाध्यक्ष बालकृष्ण शिंपाळे गुरुजी, सराचटणीस तर लिंगराज वल्याळ, सोमेश्वर पसारे, बाशाभाई शेख यांची शहर चिटणीसपदी नियुक्ती जाहीर केली. सन १९८० भाजपा स्थापनेपासून शहर कार्यालय मिळेपर्यंत म्हणजेच दुसरे अध्यक्ष नानासाहेब आराध्ये हे १९८४ साली अध्यक्ष झाले. त्यावेळी सरस्वती चौकाजवळ ३ ऱ्या मजल्यावर कार्यालय मिळाले. नानासाहेब आराध्ये यांच्या अध्यक्ष काळात १९८५ साली म.न.पा.मध्ये पुलोद म्हणून लढविलेल्या निवडणुकीत ११ नगरसेवक निवडून येऊन लिंगराज वल्याळ यांच्या रुपाने मनपा सत्तेत सहभाग मिळाला. त्यानंतर या वर्षात १९८६ साली किशोरजी देशपांडे यांच्या रुपाने शहराचे महापौरपदही मिळाले. तर १९८५ सालीच पुलोदच्या सहाय्याने शहर उत्तरची विधानसभेत रविंद राळेरासकर यांना उमेदवारी देऊन जिद्दीने विजयाच्याजवळ पोहचलो पण, अपयश आले.

इथपर्यंतचा प्रवासही सहज नव्हताच । १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत अख्ख्या भारतातून केवळ २ खासदारच निवडून आले. आमच्या गळ्याचे ताईत असलेले आमचे खरे हिरो अटलबिहारी वाजपेयी यांचा पराजय पचवणे आम्हास अतिशय अवघड झाले. असे असूनही क्या हार में क्या जीत में ही अटलजींचे प्रेरणा देणाऱ्या भाषणाने आम्ही परत जिद्दीने पेटून उठलो आणि परत काँग्रेस सत्तेच्या विरोधात संघर्ष करीत पुढे चाललो न थकता.

सन १९८० ते १९९० पर्यंत शहा चिटणीसपदासह कार्यालयाची जबाबदारीही माझ्याकडेच होती. सन १९९० पासून श्रीहरी मॅकल हे कार्यालय प्रमुख झाले.

सन १९८४ ची लोकसभा (उमेदवार ॲड. राचेटी वकील) सन १९८५ म. न.पा. निवडणूक असो १९८५ विधानसभा (उमेदवार रविंद्र राळेरासकर) सन १९८९ (उमेदवार लिंगराजजी वल्याळ) सन १९९१ लोकसभा (उमेदवार गोपीकिसन भुतडा) या सर्व निवडणुकीच्या कार्यालयाची जबाबदारीही माझ्याकडेच होती. सन १९९० पासूनची शहर भाजपाची वाटचाल ही फारच कठीण होती. ॲड. हंपी, ॲड. राचेटी, बाबूराव भोगडे, गोवर्धनदास भुतडा, डॉ.प.गो. वळसंगकर, जनसंघाचे माजी नगरसेवक वाढवण्यासाठी अथक प्रयत्न केले. माझे भाग्य म्हणजे मला राज्यातील अनेक नेत्याबरोबर तसेच सन १९८० ते २०२६ पर्यंतच्या सर्व अध्यक्षाबरोबर म्हणजेच ॲड. हंपी, नानासाहेब आराध्ये, लिंगराज वल्याळ, किशोर देशपांडे, नरसिंग मेंगजी, कर्नल प्रभाकर लांडगे, गोपी किसन भुतडा, रामचंद्र जन्नू, विजयकुमार देशमुख, अशोक निंबर्गी, विलास देशमुख, नरेंद्र काळे ते विद्यमान अध्यक्षा रोहिणीताई देशमुख यांसमवेत भाजपाचा कार्यकर्ता म्हणून संधी मिळाली. त्यातही मी भाजपा संस्थापक चिटणीस म्हणून जो मान-सन्मान मिळाला यामध्येच मी माझे भाग्य समजतो!' आज पक्षाचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. काही व्यवस्था बदलत असल्या तरी भारतीय जनता पक्षाचा मूलभूत विचार राष्ट्रहित, सर्वसमावेशक विकास आणि जनसेवा यावर आमचा ठाम विश्वास आहे. आम्ही सर्वजण वैचारिकदृष्ट्या बांधील आहोत आणि त्या विचारांचा अभिमान बाळगतो.



**- बाशाभाई शेख**
ज्येष्ठ भाजपा कार्यकर्ता

# जय पवार यांनी व्यक्त केलेल्या भावना योग्य : सुनील तटकरे



### गरज पडल्यास खा. राहुल गांधी यांची भेट

बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासह इतर पक्षांनी पाठिंबा दिला आहे काँग्रेसनेही तो पाठिंबा द्यावा अशी आमची भूमिका आहे यासाठी गरज पडली तर लोकसभेतील विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची भेट घेऊ.

### मी जोरदारपणे उत्तर देणार

सध्या आमचे लक्ष बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीवर आहे. सध्याचे काही महाराष्ट्रामध्ये जे काही सुरु आहे त्याविषयी मी आत्ताच काही बोलणार नाही. येत्या चार-पाच दिवसांमध्ये पत्रकार परिषद घेऊन या सगळ्या प्रश्नांना मी जोरदारपणे उत्तर देणार आहे, असे सांगायलाही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष सुनील तटकरे हे विसरले नाहीत.

### बारामती पोटनिवडणूकसंदर्भात सर्वपक्षीय सहमतीचे प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मार्च-**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी जय पवार यांनी व्हीएसआर कंपनीच्या मालकाला अटक करण्याची मागणी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचीही तीच भूमिका आहे. जय पवार हे पक्षाचे युवा नेतृत्व असून, त्यांनी व्यक्त केलेल्या भावना योग्य आहेत. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी त्यांचे विधान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केले.

रविवार, दि.५ एप्रिल २०२६ रोजी सुनील तटकरे हे अक्कलकोट येथील स्वामी समर्थ, तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिर, पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर येथे दर्शन घेतल्यानंतर सोलापुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना पुढे म्हणाले, बारामती पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ह्या ५ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. पक्षासाठी भावनिक आणि महत्त्वाचा क्षण आहे.

भोंदू अशोक खरात याच्या कृष्णकृत्याबद्दल समाजातून आणि विविध पक्षसंघटनांकडून संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत. त्याच्या 'त्या' वर्तनाबद्दल कठोर भूमिका घेतली पाहिजे. भोंदू अशोक खरात याला फासावर लटकावे. बारामती पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून सर्वपक्षीय सहमती घडवून आणण्याचा प्रयत्न सुरु आहेत, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पक्षाने उमेदवार न देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शिवसेना उबाठाचे उध्दव ठाकरे यांच्याकडूनही उमेदवार न देण्याची भूमिका अपेक्षित आहे. काँग्रेससोबतही आमचा संपर्क सुरु आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याकामी मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे यांनाही निमंत्रण देण्यात आले होते. मात्र, पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे ते प्रत्यक्ष उपस्थित राहू शकणार नाहीत, असेही त्यांनी सांगितले.




# भाजपा स्थापना दिनानिमित्त सोलापुरात विविध कार्यक्रम

### भाजपा कार्यालयावर विद्युत रोषणाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

भारतीय जनता पक्षाचा म्हणजेच भाजपचा आज ४६ वा स्थापना दिवस आहे. ६ एप्रिल १९८० रोजी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली जनसंघातून बाहेर पडलेल्या लोकांनी भाजपची स्थापना केली. स्थापना दिनानिमित्त सोलापूर शहर-जिल्हा भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तर शहर-जिल्हा भाजपा कार्यालयही विद्युत रोषणाईने नटविले आहे.




तीन राज्यांपुरता मर्यादित असणारा पक्ष आज बघता बघता केवळ देशच नाहीतर संपूर्ण जगभरातील मोठा पक्ष म्हणून ओळखला जात आहे. स्थापनादिनानिमित्त शहर-जिल्हा कार्यालयात आज सकाळी ८.३० वाजता शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण, भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे, असे प्रसिध्दीप्रमुख विठ्ठल बडगंची यांनी सांगितले. देशातील सध्याचा सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेला भाजपच्या स्थापना दिनानिमित्त भाजपकडून जोरात तयारी सुरू आहे. स्थापना दिनाच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजप कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. भाजपाच्या सोलापूर शहर-जिल्हा कार्यालय कार्यालयावर विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट केली आहे.

# चिरंजीवी फॅन्सचे आर. स्वामीनायडू यांची जनसेना कार्यालयास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

ऑल इंडिया मेगा फॅन्सचे प्रेसिडेंट तथा हैदराबाद येथील मेगास्टार चिरंजीवी ब्लड बँकेचे इन्चार्ज आर. स्वामीनायडू यांनी रविवारी सोलापुरातील दत्तनगर येथील जनसेना पक्षाच्या कार्यालयास भेट दिली. आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री तथा तेलुगू चित्रपटसृष्टीचे पॉवरस्टार पवनकल्याण यांनी काही वर्षांपूर्वी जनसेना या पक्षाची स्थापना केली आहे. सोलापुरात पवनकल्याण यांचे मोठ्या संख्येने चाहते आहेत. या चाहत्यांच्या पुढाकारातून अलीकडेच जनसेना पक्षाची सोलापुरात शाखा स्थापन करण्यात आली आहे. या पक्षाच्या माध्यमातून सोलापुरात अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.



रविवारी ऑल इंडिया मेगा फॅन्सचे प्रेसिडेंट तथा हैदराबाद येथील मेगास्टार चिरंजीवी ब्लड बँकेचे इन्चार्ज आर. स्वामीनायडू यांनी जनसेना पक्षाच्या सोलापुरातील कार्यालयास भेट दिली.

यावेळी पक्षाचे श्रीनिवास बिटला, आनंद कोंडा, गणेश पोतन, श्रीनिवास कनकी, आनंद अवधूत, बालराज दोंतूल, बसवराज कटारी, नागेश पासकंटी आदींनी त्यांचे स्वागत करुन सत्कार केले. सोलापुरात जनसेना पक्षाच्या माध्यमातून मोठे सामाजिक कार्य उभारल्याबद्दल स्वामीनायडू यांनी कौतुक केले. भावी काळात या पक्षासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे अभिवचनदेखील त्यांनी दिले.

# भक्ती उतारवयात नाही तर चढत्या वयापासून करावी : ह.भ.प.जयवंत बोधले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

फलदायी जीवन जगायचं असेल तर अंतःकरण शुध्द असावे. भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. भक्ती 'साध्य' नाही तर 'साधन' हवं. भक्ती उतारवयात नाही तर चढत्या वयापासून करावी, असे प्रतिपादन ह.भ.प.जयवंत बोधले यांनी केले.



सद्गुरु बोधराज सेवा प्रतिष्ठानच्या वतीने फडकुले सभागृह येथे आयोजित केलेल्या तीन दिवसीय निरुपण कार्यक्रमात भक्तीयोग या विषयावर बोलताना ते पुढे म्हणाले, आत्म दर्शनाने जीवनात तरुन जाल. म्हणजे जीवनाच पीठ होणार नाही.

अहंकाररहित ज्ञान महणजे सर्वश्रेष्ठ भक्ती होय. भगवंताला स्मरून जे कार्य कराल ते यशस्वी होईल. स्थितरता आली की जाताभक्ति राहिल असे संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज सांगून ठेवले, असेही ते म्हणाले. प्रारंभी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

# स्वामी भक्तांची रविवार ठरली अविस्मरणीय




**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ५ एप्रिल-**

राजेंद्र अहिरराव अंबरनाथ व सहकाऱ्यानी सादर केलेली मन लागोरे लागोरे गुरु चरणी ' तुझ्या पायरीशी आज चालुनी आलो स्वामी रंगी न्हाऊनिया स्वामीमय झालो ! अशी भक्ती गीतातून आर्त हाक घालीत अनेक अवीट गीते अभंग गवळण सादर केल्याने स्वामी भक्ताची रविवारची सांज अविस्मरणीय ठरली.

वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे समर्थांच्या १४८ पुण्यतिथी निमित्य आयोजित धर्म संकीर्तन महोत्सवात तिसरे पुष्प गुंकताना रविवारी भक्ती संगीत सेवेत अभंग गौळण भक्ती गीत स्वामी भक्त नाहुन निघाले.

रसिक श्रोत्याच्या ओठावरील व भक्ती रंगाचा ठावा घेणारे ' मन लागोरे लागोरे गुरु चरणी, वेदानाही नाही कळला अंत पार कानडा राजा पंढरीचा, सर्व मांगल्य मांगल्ये , दिंगबरा दिंगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा निघालो घेऊनी दत्ताची पालखी', तुझ्या पायरीशी आज चालुनी आलो स्वामी रंगी न्हाऊनीया स्वामीमय झालो, अवघाची संसार सुखाचा करीन आनंदे भरीन तिन्ही लोक, हे भोळ्या शंकरा आवड तुला बेलाची 'दत्त दिंगबर दैवत माझे ऋदयी माझ्या नित्य विराजे, अभिर गुलाल उधळीत रंग नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग' माझे माहेर पढिरी' धाव पाव स्वामी समर्था मला बघायची जेजुरी 'यमुनेच्या तिरी पाहिला हरी .. जिंकण्याचा मोह नाही हारण्याचे भय नाही' स्वामी कृपा कधी करणार तव चरणाचे दर्शन आता अशी भाविकांच्या ओठावरील अभंग भक्ती गीत गौळण सादर केले.

भक्ती संगीत कार्यर्यक्रमाचे आयोजक रविद्र भास्कर झोपे 'संयोजक राजेंद्र आहिरराव' गायक निवेदक प्रणव थोरात अभिजित काटे, गायक मृणाल ठाकुर देसाई, तबला निवेदक निखिल फडके, ढोलकी गुरुप्रसाद कुंभार आदिनी भक्ती संगीता मध्ये स्वामीचरणी सेवा रुजु केली सर्व कलाकारांचा वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान चे चेअरमन माजी नगराध्यक्ष नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते कृपावस्त्र प्रसाद देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, प्रा.शिवशरण अचलेर, अमर पाटील, संजय पाठक, स्वामीनाथ लोणारी, गिरीश पवार, सागर गोंडाळ, नागनाथ गुंजले, श्रीशैल गवंडी, संजय पवार, प्रसाद सोनार, ज्ञानेश्वर भोसले प्रसाद पाटील राजु भोसले बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर मनोज जाधव लोणारी अशोक कडगंची उपस्थित होते.

# दौंड-वाडी लोहमार्गाचे चौपदरीकरण भूसंपादन सुरू; 'अमृत'मधून होणार ११ स्थानकांचा कायापालट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

मध्य रेल्वेकडून प्रवाशांना अधिक जलद व आरामदायी सेवा देण्यासाठी अमृत योजनेअंतर्गत सोलापूरसह ११ रेल्वे स्थानकांवर विविध विकासकामे सुरू आहेत. सोलापूर, बेलापूर, गाणगापूर, कुडुवाडी, पंढरपूर, दुधनी, धाराशिव, लातूर, कलबुर्गी, शहाबाद व वाडी या स्थानकांचा यात समावेश आहे. दौंड ते वाडी दरम्यान तिसरी व चौथी मार्गिका टाकण्याचे काम हाती घेण्यात आले असून, त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू असल्याची माहिती विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा यांनी दिली.

ही मार्गिका २०३१ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा असून, त्यानंतर रेल्वे गाड्यांचा वेग ताशी १६० किलोमीटरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. सोलापूर, कलबुर्गी, कुर्जुवाडी व जेऊर स्थानकांवर 'डिजिटल ॲक्सेस मॅप बोर्ड' बसवण्यात आले आहेत. तसेच सोलापूर स्थानकावर रेल कोच रेस्टॉरंट' सुरू करण्यात आले आहे. तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांसाठी



बायोमेट्रिक साइन-ऑन / ऑफ प्रणालीही सुरू करण्यात आली असून, मध्य रेल्वेत असा उपक्रम राबवणारा हा पहिलाच विभाग ठरला आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील स्थानकांसाठी मंजूर निधी (कोटी रुपयांत)**


सोलापूर ५५.८५, पंढरपूर ३९.५२, कुर्डुवाडी २९.७४, दुधनी २१.६८

**अमृत योजनेत झालेली प्रमुख कामे**

* वंदे भारत गाडीला अतिरिक्त डबे * सोलापूर व कलबुर्गी स्थानकांवर ब्रेल लिपीतील फलक * कुर्डुवाडीसह अनेक स्थानकांवर लिफ्ट सुविधा माल वाहतुकीसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम * आपत्कालीन प्रसंगी प्रवाशांसाठी अखंडित मदत * पंढरपूर स्थानकावर अतिरिक्त पादचारी पूल व प्रवेशद्वार * सोलापूर विभागात १७० नवे सीसीटीव्ही कॅमेरे व ३० सौरऊर्जा प्रकल्प

### मुदतीत कामे पूर्ण करण्याची गरज

टिकेकरवाडी येथे चार नव्या मार्गिका उभारण्याचे काम सुरू असून, दौंड-वाडी मार्गावरील तिसरी व चौथी मार्गिका २०३१ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. धाराशिव-सोलापूर मार्गाचे सुमारे ६० टक्के काम पूर्ण झाले असून, त्यासाठी २०३० पर्यंत मुदत देण्यात आली आहे. दमाणीनगर येथील रेल्वे पुलाचे बांधकाम एमएसआरडीसीकडून सुरू असून, त्यासाठी डिसेंबर २०२६ पर्यंत मुदत आहे. या सर्व प्रकल्पांची मुदत लक्षात घेता कामाचा वेग वाढविण्याची गरज व्यक्त होत आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | सोमवार, ६ एप्रिल २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## लहान मुलांच्या वादातून पालकांमध्ये झाले भांडण

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-** लहान मुलांच्या खेळण्यावरुन झालेल्या वादातून पालकांमध्ये भांडण झाल्याची घटना रविवार पेठ परिसरातील भुलाभाई चौक येथे घडली. याप्रकरणी अरुण विश्वनाथ चौगुले (वय-३२, रा.भुलाभाई चौक, सोलापूर) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्यादीत म्हटले आहे की, माझा ८ वर्षांचा मुलगा संजय आणि त्याचे मित्र नरेश शिंदे (वय-१२), शुभम पवार (वय-१४) यांना दगड आणि बॅटने मारहाण करण्यात आली. याबाबत जाब विचारण्यासाठी अकबर कासिम मशीद परिसरातील एका बोळात गेले असता तेथील दोन अज्ञात इसमांनी शिवीगाळ व मारहाण केली.

## जन्म देऊन २४ तास उलटले नाही; बाळ झाले आईविना पोरके



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मार्च-**
मुलाला जन्म देऊन २४ तासही उलटली नव्हते अन् ते बाळ आईविना पोरके झाल्याची घटना घडली. या मृत्यूस किल्ला बाग परिसरातील दबडे हॉस्पिटलमधील स्टाफ, कर्मचारी व डॉक्टर दोषी आहेत, असे मृताचे नातेवाईक रुपाली हजारे यांनी सांगितले. दरम्यान, याप्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल करण्यात यावी, असे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने फौजदार चावडी पोलिस ठाण्याकडे सादर केले.

अनुजा बावळे (वय-२५, रा.निराळे वस्ती, सोलापूर) यांना शनिवारी मुलगा झाला. यादिवशी रात्री ११.३० ते १२ वाजण्याच्या सुमारास अनुजा बावळे हिला त्रास व्हायला लागले होते. ही बाब तेथील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना सांगून देखील दोन ते तीन तास कोणीही लक्ष दिले नाही. तिला जास्तच त्रास होत असल्याने अश्विनी हॉस्पिटल येथे नेण्यास सांगण्यात आले. परंतु तेथे नेण्या अगोदरच अनुजाचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांच्या बहिणीने केला आहे.

माझ्या पत्नी बरोबर जे घडले आहे ते इतरांबरोबर घडू नये. आम्हाला न्याय मिळावा, अशी आर्त हाक अनुजाचे पती विनायक बावळे यांनी पोलिस प्रशासनाकडे केली. ज्ञानेश्वर सपाटे, बाबा मिस्त्री, बसवराज कोळी, वैभव गंगणे, रवी गंगणे, भुजंग गंगणे, विवेक हजारे, सौरभ कन्हेरी यांनी घटनास्थळी भेट देऊन बाळाच्या आईला न्याय देण्याबाबत पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

## थोडक्यात...



### साउंडचा आवाज कमी करण्यास सांगितल्याने तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**
साऊंड सिस्टिमचे टेस्टिंग करुन आणि आवाज वाढवू नका, असे वारंवार सांगितल्याचा राग मनात चरुन चौघा जणांनी एका तरुणाला लाथाबुक्क्यांनी व लोखंडी पट्टीने मारहाण करण्यात आल्याची घटना देसाई नगर परिसरात घडली. यातील जखमीचे नाव प्रणय संजय अलकुंटे (वय-१८, रा.भारतीय नगर) असे आहे. याप्रकरणी अनिल कांबळे, जयभीम वाघमारे, विरेश पटणे आणि सुरज (पूर्ण नाव माहीत नाही) या चौघा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### यमाई तलावात हजारो मासे मृतावस्थेत तातडीने करण्यात आली विल्हेवाट

**पंढरपूर, दि. ५ एप्रिल-**
सुमारे १५० एकरांवर पसरलेल्या येथील यमाई तलावातील हजारो मासे मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, नगरपालिका प्रशासनाने मृत मासे तातडीने गोळा करुन त्यांची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया सुरु केली होती.शनिवारी सकाळी तलावात मोठ्या प्रमाणावर मासे मृतावस्थेत तरंगताना दिसून आले. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली होती. सकाळी फिरण्यासाठी आलेल्या नागरिकांना त्रास सहन करावा लागला. माशांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? याचा शोध नगरपालिका व महसूल प्रशासनाने घ्यावा, अशी मागणी नागरिक व पर्यावरणप्रेमींकडून करण्यात येत आहे. दरम्यान, मागील काही दिवसांपासून झालेल्या पावसामुळे टाकळी परिसरातील फळबागांवर फवारलेली कीटकनाशके ओढ्यातून वाहत येऊन तलावात मिसळली असावीत; त्यामुळे माशांचा मृत्यू झाला असण्याची शक्यता आहे, असे पर्यावरण अभ्यासक बंडोपंत सबनीस यांनी सांगितले.

### सोलापूर जिल्हा नोटरी असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड.हेमंतकुमार माळी

**सोलापूर, दि.५ एप्रिल-**
सोलापूरचे प्रसिध्द संमोहन तज्ज्ञ ॲड. हेमंतकुमार माळी यांची सोलापूर शहर नोटरी असोसिएशनच्या अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असोसिएशनचे प्रेसिडेंट ॲड.सय्यद सिकंदर अली, वर्किंग प्रेसिडेंट ॲड.यशवंतराव खराडे यांनी ही निवड जाहीर केली. सोलापूर शहर नोटरी असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. कमरुनिस्सा बागवान, सचिव ॲड.राजशेखर कोरे, सहसचिव ॲड.उमा पारसेकर, खजिनदार ॲड. शिवानंद फटाटे आदींनी ॲड.हेमंतकुमार माळी यांचे अभिनंदन केले.



## 'पवित्र पोर्टल'ला बगल; शिक्षक भरती संशयाच्या भोवऱ्यात!

### सोलापुरातील ५६० शिक्षक तपासाच्या रडारवर




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मार्च-**
शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या 'पवित्र पोर्टल'लाच बगल देत राज्यभरात सुमारे ८ हजार शिक्षकांची भरती झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील तब्बल ५६० शिक्षकांचा समावेश असल्याचे प्राथमिक तपासातून उघड झाले असून, हे सर्व प्रकरण आता चौकशीच्या केंद्रस्थानी आले आहे.

खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमध्ये ही भरती करण्यात आल्याचे समोर आले आहे. शासनाने २२ जून २०१७ पासून शिक्षक भरतीसाठी 'पवित्र पोर्टल' ही संगणकीय प्रणाली बंधनकारक केली होती. या प्रणालीद्वारेच भरती प्रक्रिया पार पाडणे अपेक्षित असताना अनेक शिक्षण संस्थांनी नियम धाब्यावर बसवत थेट भरती केल्याचे स्पष्ट झाले आहे.

या संशयित भरतींची सखोल चौकशी करण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. ही समिती संबंधित शिक्षकांची मान्यता, नियुक्ती प्रक्रिया आणि कागदपत्रांची पडताळणी करणार आहे. त्यामुळे अनेक शिक्षकांच्या सेवाभाग्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. विशेषतः 'शालार्थ आयडी' संदर्भातील अनियमितता उघड झाल्यानंतर शासनाने ही बाब गंभीरतेने घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यातील सुमारे १७ हजार माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील ३ लाख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची व्यापक पडताळणी करण्यासाठी पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे.

## अंगणवाडी सेविकांकडे योजनाबाह्य काम नको

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**
एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यावर योजनाबाह्य कामांचा बोजा टाकू नये तसेच त्यांची मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून सक्तीची नेमणूक करू नये, असे स्पष्ट निर्देश शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी हा आदेश काढला आहे. अंगणवाडी कर्मचारी ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांच्या पोषण, आरोग्य आणि पूर्व-प्राथमिक अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पाडत आहेत. कुपोषण निर्मूलनासारख्या संवेदनशील कार्यात त्यांचा मोठा असून, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजावणीच्या माध्यमातून होते. मात्र, अनेक जिल्ह्यात अंगणवाडी सेविकांची बीएलओ म्हणून नेमणूक करून त्यांच्यावर निवडणूक कामकाजाची सक्ती केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

## काँग्रेस पदाधिकाऱ्यांची निवड वातानुकुलित दालनातून नव्हे कार्यकर्त्यांच्या संवादातून होणार

### देवाशीष पटनायक, मोहन जोशी यांचे प्रतिपादन

### 'संघटन सृजन अभियानाला' सुरुवात




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**
काँग्रेस पदाधिकाऱ्यांची निवड ही पुर्वीप्रमाणे वातानुकुलित दालनातून नव्हे कार्यकर्त्यांच्या संवादातून केले जाणार आहे. यापुढे शहर व जिल्हाध्यक्षांना अधिक अधिकार देण्यात येणार आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे निरीक्षक देवाशीष पटनायक, प्रदेश निरीक्षक मोहन जोशी यांनी केले. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या 'संघटन सृजन अभियान'च्या अनुषंगाने पटनायक व जोशी हे रविवारी सोलापूरच्या दौऱ्यावर आले असता प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते.

काँग्रेस पक्ष हा कार्यकर्त्यांच्या बळावर उभा असून पक्षाची दिशा ही जनतेच्या प्रश्नांवर काम करण्याची आहे. एकाच पदासाठी इच्छुक असलेल्या इतरांना संघटनेत अन्य ठिकाणी संधी दिली जाईल. ब्लॉक आणि फ्रंटल संघटनांच्या निवडीही याच पारदर्शक पध्दतीने केल्या जाणार आहेत. पूर्वी पदाधिकारी निवडीसाठी नेत्यांच्या शिफारसीला महत्त्व दिले जात होते, मात्र आता संघटन सृजन अभियानामुळे ही पध्दत बदलली असून, सर्वांचे मत जाणून घेऊन, इच्छुकांचे अर्ज स्वीकारुन आणि सखोल चर्चा करूनच निर्णय घेतला जाणार आहे.

या संवाद उपक्रमात कार्यकर्त्यांशी 'वन-टू-वन' चर्चा करून त्यांच्या भावना, अनुभव आणि सूचनांची थेट नोंद घेण्यात आली. यावेळी झालेल्या चर्चेत संघटनात्मक रचना अधिक प्रभावी, सक्रिय आणि सर्वसमावेशक करण्यावर विशेष भर देण्यात आला. विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निरीक्षकांसमोर आपले विचार मांडत संघटन बळकटीसाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. यावेळी यशराज पारखी, भाऊसाहेब आसबे, प्रदेश सरचिटणीस दिनेश नवगीरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी सत्कार केले.

## दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान; वैचारिक अधिष्ठान, सोशल मीडिया, एआय आदींविषयी प्रशिक्षण

### सोलापुरातील ८ मंडलांमध्ये वर्ग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**
भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दीनदयाळ अध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत वैचारिक अधिष्ठान, इतिहास आणि विकास, कार्यविस्तार, कार्यपध्दती, आपले सरकार आणि यश, सोशल मीडिया, एआय, नमो, सरल ॲप, बूथ व्यवस्थापन या बाबींचे प्रशिक्षण दिले जात आहे. कार्यकर्त्यांची वैचारिक फळी तयार करण्याच्या दृष्टिकोनातून विषयांची रचना करण्यात आली आहे, असे सांगण्यात आले.

पंडित दीनदयाळ अध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत जिल्ह्याच्या ग्रामीण भागांसह राज्यातील अन्य जिल्ह्यांत प्रशिक्षणे सुरु आहेत. १४ एप्रिलपर्यंत प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या सूचना प्रदेश भारतीय जनता पक्षाने दिल्या आहेत. त्यानुसार सोलापूर शहरातील आठही मंडल प्रस्तरांवरील एकदिवसीय प्रशिक्षणाचे शहर भारतीय जनता पक्षाने नियोजन केले आहे.

भाजपने यंदाचे वर्ष प्रशिक्षण वर्ष जाहीर केले असून, पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानाची योजना आखली आहे. कार्यकर्ता भाव जागरण व साचा विचार समजून घेणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. राज्यात २० फेब्रुवारीपासून या महाअभियानाची सुरवात झाली आहे. सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही



प्रशिक्षण वर्ग होत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात 'इनकमिंग' झाले आहे. मूळ भाजपच्या कार्यकर्त्यांसह नेते व अशा बाहेरून आलेल्या सगळ्यांना प्रशिक्षण सक्तीचे आहे. त्यामुळे नगरसेवक, बूथप्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख यांच्यासह सर्व आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे, असे 'भाजपा'च्या शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनी सांगितले.

## 'तिरुपती'साठी पुणे विमानतळावर स्लॉट

### सोलापूर-हैदराबाद तिकीट 3,८०० रुपये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**
स्टार एअर या विमान कंपनीकडून पुणे-सोलापूर-तिरुपती या मार्गावर विमानसेवा याच महिन्यात सुरु होणार आहे. त्यासाठी पुणे विमानतळावर स्लॉटही उपलब्ध झाला आहे. येत्या आठवडाभरात त्यासाठी प्रत्यक्षात तिकीट बुकिंग सुरु होण्याची शक्यता आहे. स्टार एअरच्या अधिकाऱ्यांनी शहरातील यात्रा सुविधा केंद्र चालकांची भेट घेऊन तिकीट बुकिंगबद्दल चर्चाही केल्याचे सांगण्यात आले.

गोवा, मुंबईनंतर आता सोलापूर-हैदराबादसाठी विमानसेवा निश्चित झाली आहे. १७ एप्रलला हैदराबादसाठी पहिले प्रवासी विमान उड्डाण करेल. त्याचे तिकीट बुकिंग सुरू असून त्याचे दर ३८०० रुपयांपासून आहे. बुकिंग सुरू झाल्याच्या पहिल्याच दिवशी १० सोलापूरकरांनी तिकिटे घेतल्याचे सांगण्यात आले.

शुक्रवारी रात्री १०:३० वाजता विमान कंपनीने संकेतस्थळावर बुकिंग सुरू केले. शनिवारी सकाळी १० वाजेपासून प्रत्यक्ष तिकीट बुकिंग सुरु झाले. पहिल्याच दिवशी सोलापूरमधील तब्बल १० प्रवाशांनी ऑनलाइन पद्धतीने तिकीट खरेदी करून या सुविधेचा लाभ घेतला आहे.

सोलापूर-हैदराबाद आणि सोलापूर-गोव्याच्या विमानसेवेचे नवीन वेळापत्रक याप्रमाणे; सोलापूर-हैदराबाद : दुपारी ३.३० वाजता निघेल. ४.२० वाजता पोहोचेल. हैदराबाद-सोलापूर ४.५० ला निघेल. ५.५० ला पोहचेल.(ही सेवा सोमवार, मंगळवार, बुधवार,




गुरुवार, शुक्रवार अशी ५ दिवस राहील).

**गोव्यासाठी नवीन वेळापत्रक याप्रमाणे;**
सोलापूर-गोवा: सायंकाळी ६.१० वाजता निघेल. ७.३५ ला पोहचेल. (सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार या दिवसांसाठी हे वेळापत्रक असेल) रविवारी : ३.३० वाजता निघेल ४.४५ वाजता पोहचेल.गोवा-सोलापूर : दुपारी १.४५ वाजता निघेल ३.३० ला पोहोचेल. (आठवडाभर)

## मजुरांची टंचाई, यांत्रिकीकरणाचा अभाव; शेतीमालांच्या भावात तेजी

### आंब्याच्या दरातील तोरा कायम

### वांगी, कोबीसह फळभाज्यांचे दर उतरले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**
मजुरांची टंचाई, यांत्रिकीकरणाचा अभाव, अवकाळी पाऊस यांसह अन्य कारणांमुळे शेती व्यवसायावर संकट ओढावले आहे. तर दुसरीकडे शेतीमालांच्या भावात तेजी आल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, गहूऐवजी ज्वारी पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे यंदा बाजारात ज्वारीची आवक मोठ्या प्रमाणात झाली आहे. प्रति क्विंटल ज्वारीचे दर किमान ४ हजार रुपये तर जुन्या ज्वारीचे दर प्रति क्विंटलला ४ हजार ५०० रुपये तर पिशवीबंद गव्हाचे दर प्रति क्विंटल ३ हजार ५०० असे होते.

आंब्याच्या दरातील तोरा कायम आहे. हापूस आंब्याची पेटी १ हजार रुपयांपासून ३ हजार






रुपयांपर्यंत विकली जात आहे. वांगी, कारले, कोबीसह फळभाज्यांचे दर उतरले आहे. फळभाज्यांचे प्रती १० किलो कमाल व सरासरी दर याप्रमाणे; बीट ९०-१००, कारले १८०-२७०, वांगी १२०-२००, कोबी ५०-७०, ढोबळी मिरची ३००-४००, गाजर १६०-४००, गवार ३५०-६००, भेंडी ३००-४००, दोडका २००-३००, टोमॅटो ७०-१००, बटाटा १००-१३०, मुळ्याची शेंग ३५०-४००, वाटाणा १००-१३०, बिन्स २००-२२०, शेवग्याची शेंग ४००-५००.

भाजीपाल्यांचे किमाल व कमाल शेकडा दर याप्रमाणे; कोथिंबीर ४००-५००, मेथी ५००-७००, राजगिरा ३००-५००, पालक ४००-५००, तांदूळसा २००-४००, अंबाडी ४००-५००, कांदापात ४००-६००, चुका ३००-३००. फळांचे प्रती दहा किलो दर याप्रमाणे; सफरचंद १०००-११५०, बोर ४००-४३०, चिकू ८०-१२०, पेरु १२०-२५०, मोसंबी ३००-४००, पपई २००-२००, अननस २००-३००, डाळिंब ७००-१५००, संत्रा ६००-७५०, खरबूज १५०-२२०, कलिंगड - ९०- १२०, द्राक्ष (पेटी) १६०-२४०, आंबा ७००-१००० (पेटी).

### भुसार मालांचे प्रतिक्विंटल दर याप्रमाणे

गूळ ४३००-४५५०, तूर ६८००-७७००, हरभरा ५१५०-५२५०, ज्वारी ४०५०-४२००, सोयाबीन ५५००-५५५०, लसूण ७३००-११०००



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४०४

**अहो तान्हयाची लागतां झटे । तरी अधिकचि पान्हा फुटे ।**
**रोषें प्रेम दुणवटे । पढियंतयाचेनि ।।**

संस्कृत भाषेतील गीताख्य मराठी भाषेत सांगण्याचे अवघड काम आपण श्रोत्यांच्या कृपेमुळे सहजतेने करीत असल्याचे प्रतिपादन माऊली करीत आहेत. ज्ञानवंत श्रोत्यापुढे बोलण्याची आपली पात्रता नसतांनाही आपण का व कसे बोलत आहोत याचे स्पष्टीकरण ते करीत आहेत. जगाला प्रकाशमान करणा-या सुर्याची हातातल्या वातीने आरती करु नये काय? समुद्राला चुळकाभर पाण्याने अर्ध्य देऊ नये काय?



अर्थात, सुर्याकडून सुर्याचा प्रकाश घेऊन केलेली आरती जशी सुर्याला आवडेल, तसेच समुद्रातील चुळकाभर पाणी घेऊन तेच पाणी अर्ध्य म्हणून समुद्राला दिलेले जसे समुद्राला आवडेल. अगदी त्याच प्रमाणे तुमच्याकडुनच घेतलेले ज्ञान तुम्हाला अर्पण केले तर तुम्हाला आवडेलच कारण माझा तुमच्यावर तेवढा भक्तिभाव व अधिकार आहे असे माऊली श्रोत्यांना म्हणतात. या श्रोत्यांमध्ये निवृतीनाथ म्हणजे माऊलीचे सद्गुरुही आहेत. म्हणून माऊली म्हणतात, प्रभु तुम्ही प्रत्यक्ष भगवान शंकराचे अवतार आहात आणि दुबळा असलेला मी भक्तिभावे आपली पूजा करीत आहे. म्हणून माझे बोल अस्पष्ट, त्रोटक असले तरीही आपण ते स्विकारणार आहात याची मला खात्री वाटते. आपल्या सद्गुरुबद्यलचा, वडीलबंधू बद्यलचा भाव व आदर कसा असावा हे माऊलीकडून शिकावे. हा भाव, आदर शिकला तर भावा-भावात होणारी भांडणे आपोआप संपुष्टात येतील.

आई-बापाला बालकाने घास भरवला तर जसे आई-वडील तो घास आनंदाने स्विकारतात. तसे मी तुमच्याशी बालबुध्दीने बाष्फळपणा करीत असलो तरी तुम्ही समाधानाने माझे बोबडे, त्रोटक बोल स्विकारणार आहात. कारण तुमच्या प्रेमाची रीतच तशी आहे, असे माऊली म्हणतात. अशा या प्रेमाच्या अतिमोहाने तुम्ही संतजन भारावून गेला आहात, त्यामुळे माझ्या लडिवाळपणाचे ओझे तुम्हाला वाटणार नाही. माऊली असेही म्हणतात की, **अहो तान्हयाची लागतां झटे । तरी अधिकचि पान्हा फुटे । रोषें प्रेम दुणवटे । पढियंतयाचेनि ।।** अर्थात, गाईचे वासरु गाईच्या स्तनाला ढुसनी देते, त्यामुळे गाय वासराला लाथाडात नाही तर उलट तिला अधिकच पान्हा फुटतो. कारण वासरु हे तिचे आवडते असते. आपल्यावर प्रेम करणा-या किंवा आपणाला स्नेह, आनंद देणा-या वासराला तिची आई लाथाडणे शक्यच नसते. वासराच्या ढुसनेने उलट ती आपला पान्हा जास्त देत असते. आपल्या आवडत्या व्यक्तिच्या रागावण्यानेही प्रेम दुप्पट वाढत असते. कारण तो राग निस्वार्थ प्रेमापोटी असतो. याप्रमाणे मी तुमचे लेकरु, वासरु आहे. माझ्या शब्दाने मी तुम्हाला ढुसण्या देत आहे. तेव्हा आपणाला एकाग्र चित्ताने ऐकण्याचा पान्हा फुटणारच आहे. प्रेममध्ये काय ताकद असते याचे स्पष्टीकरण माऊलींनी अनेक ओव्याच्या माध्यमातून केले आहे. आज जागाला शांततेसाठी प्रेमाचीच गरज आहे. ही गरज आपण आपल्या माध्यमातून होईल तेवढी पुर्ण करायला हवी. आवडत्या व्यक्तिच्या रागाचे रुपांतरही प्रेमात होते. हे माऊलींचे वाक्य ऐकल्यास माऊली किती सकारात्मक विचाराचे आहेत हे लक्षात येते. प्रत्येकांनी माऊली सारखी सकरात्मक दृष्टी बाळगली तर आनंदाला सीमाच राहणार नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. ६ एप्रिल २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - फाल्गुन कृ चर्तुथी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- अनुराधा (२६.०७)**
**योग - सिद्धी (१५.२४)**
**करण - कौलव (२७.२१)**
**राहू काल : सोमवार**
**स. ७.३० ते ९.००**

**दिनविशेष : ✻ आंतराष्ट्रीय क्रिडा दिवस.**
**१८९०: प्रसिद्ध उर्दू कवी जिगर मुरादाबादी यांचा जन्म.**
**१९३०: महात्मा गांधींनी दांडी यात्रेनंतर मिठाचा कायदा मोडून मिठाचा सत्याग्रह.**
**१९८०: भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली आणि अटलबिहारी वाजपेयी हे पहिले अध्यक्ष बनले.**
**१९५६: भारतीय क्रिकेटपटू आणि माजी निवड समिती अध्यक्ष दिलीप वेंगसरकर यांचा जन्मदिन.**

# उन्हाळी सुट्यातही 'ड्युटी' कायम; शिक्षकांमध्ये नाराजी

## २ मे ते १४ जून सुट्या जाहीर, पण १६ मे पासून जनगणनेचे काम

### शिक्षकांवर जनगणनेची जबाबदारी; सुट्टीचा बोजवारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

राज्यातील शाळांना २ मे ते १४ जूनदरम्यान उन्हाळी सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या असल्या, तरी शिक्षकांना या काळात प्रत्यक्ष विश्रांती मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषद, महापालिका तसेच खासगी अनुदानित शाळांतील शिक्षकांना १६ मे ते १४ जून या कालावधीत जनगणनेची जबाबदारी सोपविण्यात आल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.



विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी सुट्टीचा आणि विश्रांतीचा असला, तरी शिक्षकांना मात्र घराघरांत जाऊन माहिती संकलनाचे काम करावे लागणार आहे. प्रशासनाच्या सूचनांनुसार शिक्षकांना मुख्यालय न सोडण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यामुळे त्यांना आपल्या कार्यक्षेत्रातच राहणे बंधनकारक ठरणार आहे. जनगणना मोहिमेंतर्गत शिक्षकांना संबंधित कुटुंबांची माहिती संकलित करून ती प्रशासनाकडे सादर करावी लागणार आहे. ही प्रक्रिया जवळपास महिनाभर चालणार असल्याने उन्हाळी सुट्ट्यांचे नियोजन केलेल्या अनेक शिक्षकांचे नियोजन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, अनेक शिक्षकांनी सुट्टीत कुटुंबासोबत प्रवास, वैयक्तिक कामे किंवा विश्रांतीचे नियोजन केले होते. मात्र अचानक आलेल्या आदेशामुळे ते रद्द करावे लागल्याचे शिक्षकांनी सांगितले. मुख्यालय न सोडण्याच्या अटीमुळे गावाला जाणे किंवा इतर कामे करणे कठीण झाल्याची भावना व्यक्त होत आहे.सुट्ट्यांच्या काळातच वाढलेल्या जबाबदाऱ्यांमुळे शिक्षक वर्गावर अतिरिक्त ताण येत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

> जनगणना हे राष्ट्रीय कर्तव्य आहे आणि शिक्षक ते प्रामाणिकपणे पार पाडतील. मात्र टीईटीची तयारी व इतर शासकीय कामांमुळे अडचणी निर्माण होत आहेत. सुशिक्षित बेरोजगारांना मानधनावर नियुक्त केल्यास शिक्षकांवरील ताण कमी होईल, त्यांना रोजगारही मिळेल आणि शैक्षणिक कामकाज वेळेत पूर्ण होऊ शकेल.
> – **प्रशांत शिरगुर,** पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटनेचे राज्य उपाध्यक्ष

# महापालिकेच्या वतीने माजी उपपंतप्रधान बाबू जगजीवनराम यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**


सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारताचे माजी उपपंतप्रधान कै. बाबू जगजीवनराम यांच्या जयंती निमित्त कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात भारताचे माजी उपपंतप्रधान कै.बाबू जगजीवनराम यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी नगरसेवक नरसींग असादे, नगरसेवक विजय चिप्पा, नगरसेविका निर्मला जगंम, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसुळे, हरीश जगंम डॉ. नागनाथ जिद्दीमणी, डॉ. अभिजित पुजारी, सचिन बोगरगे, भोजराज पवार, शेखर सकट उपस्थित होते.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### चुकीला चूक म्हणण्याचे धाडस ठेवा



मोक्ष मार्ग दाखविणाऱ्या निर्ग्रंथ गुरूंचे अनुयायी होणे ही काळाची गरज आहे. आपल्या आचरणात काही कमतरता किंवा शिथिलता असू शकते. परंतु चुकीच्या मार्गाला योग्य म्हणणे कदापि योग्य नाही. जे चूक आहे, त्याला चूक म्हणण्याची आणि स्वत:तील कमतरता स्वीकारण्याची प्रांजळ वृत्ती श्रावकांकडे असायला हवी,असा मौलिक उपदेश परमपूज्य जैन मुनिश्री वीरसागर महाराज यांनी श्रावकांना दिला.

येथील श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट यांच्या वतीने माणिक चौक येथील महावीर सांस्कृतिक भवन येथे आयोजित प्रवचनमालेत मुनिश्री श्रावकांना मार्गदर्शन करताना बोलत होते. आचार्य कुंदकुंद स्वामी यांच्या 'कुंदकुंद का कुंदन' या ग्रंथावर आधारित 'व्यवहार सम्यक दर्शन' या विषयावर त्यांनी अत्यंत मार्मिक विवेचन केले.

मुनिश्री म्हणाले की, हिंसारहित धर्म, अठरा दोषरहित देव आणि निर्ग्रंथ गुरु यांच्यावर दृढ श्रद्धा ठेवणे म्हणजेच श्रावकाला व्यवहार सम्यक दर्शन प्राप्त होणे होय. जैन सिद्धांतानुसार, भगवान अरिहंत हेच खरे तीर्थंकर देव आहेत, कारण ते अठरा दोषांपासून पूर्णतः मुक्त आहेत. ज्यांच्यात हे दोष आढळतात, त्यांना खरे देव मानणे उचित ठरणार नाही. त्याचप्रमाणे, सर्वज्ञ देवांनी सांगितलेल्या 'जिनवाणी' व्यतिरिक्त कोणताही उपदेश शास्त्र होऊ शकत नाही आणि परिग्रहाचा त्याग केलेले निर्ग्रंथ साधूच खरे गुरु होत. भय आणि परिग्रह यांचा संबंध जोडताना मुनिश्री म्हणाले की, ज्याच्याकडे पैशाचा संचय, मोह आणि परिग्रह असतो, तो व्यक्ती नेहमी भयभीत असतो. याउलट, जैन मुनींना पद, पैसा किंवा प्रसिद्धीची कोणतीही आसक्ती नसल्यामुळे ते पूर्णतः निर्भय असतात. भगवंतांच्या अंतर्मनात क्षुधा, तृष्णा किंवा भीती असे कोणतेही विकार नसतात. शेवटी, राग आणि क्रोध हे मानवासाठी अत्यंत घातक असल्याचे सांगून, जीवनात 'अलर्टनेस' (जागृती) आणि स्वत:वर नियंत्रण मिळवणे किती आवश्यक आहे, याचा मौलिक संदेश मुनिश्री वीरसागर महाराज यांनी यावेळी उपस्थित भाविकांना दिला.

# संभाजी आरमार संघटनेचे एकदिवसीय मार्गदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

संभाजी आरमार संघटनेच्या विविध शाखांतील नूतन पदाधिकारी निवड, पदोन्नती तसेच पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व कामकाज याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी एक दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरामध्ये संघटनेच्या विस्तार आणि बळकटीकरणावर विशेष भर देण्यात आला. विविध घटकांमध्ये नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये जिल्हा व शहर स्तरावर महिला संघटना, शिक्षक संघटना यांसह शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये एक प्रभाग प्रमुख निवडण्यात आला. यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांनी संघटनेच्या स्थापनेपासूनचा १७ वर्षांचा इतिहास उपस्थितांसमोर मांडला व संघटनेच्या वाटचालीचा आढावा घेतला. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी अध्यक्षीय भाषणात संघटनेची विचारधारा, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि समाजहिताचे उद्दिष्ट यावर विशेष भर दिला. प्रास्ताविक संघटनेचे उपाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन अजिंक्य पाटील यांनी केले. यावेळी आरमारचे सरचिटणीस गजानन जमदाडे, जिल्हा संघटक अमित कदम, दक्षिण तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर डोंबाळे, शहर प्रमुख सागर ढगे, प्रमोद जगताप, अविनाश विटकर अर्जुन शिवसिंगवाले, उमा रजपूत, रेखा व्हनखडे, ज्ञानेश्वरी गायकवाड उपस्थित होते.



# ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत राज मेमोरियल स्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

जूनी मिल कंपाऊंड मुरारजी पेठ येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूल ने सिल्व्हर झोन फाऊंडेशन आयोजित इंटरनॅशनल ऑलिम्पियाड नवी दिल्ली इंडिया यांच्या अतंर्गत घेण्यात आलेल्या राष्ट्रीयस्तर इंग्रजी ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत राज मेमोरियल इंग्लिश स्कूल मधील इयत्ता पहिली ते सातवीतील २० विद्यार्थ्यानी आपला सहभाग नोंदवला होता. त्या पैकी अनुक्रमे प्रथम द्वितीय, तृतीय यशश्री हजारे ७५.०३ टक्के, (सुवर्ण पदक) अथर्व कवचाळे ७०.४ टक्के (सुवर्ण पदक), काव्या जवळकर ६६.०२ टक्के (सुवर्ण पदक) प्रथमेश जगदाळे ६६.०२ टक्के (सुवर्ण पदक), त्रिशा शिंदे ६६.०२ टक्के (सुवर्ण पदक) प्रणव दणाणे ६४.०२ टक्के (रौप्य पदक) श्लोक पवार ६२.५३ टक्के (रौप्य पदक), समीक्षा आमणे ६१.०२ टक्के (कास्य पदक), वेणू सिरसाट ५७.५३ टक्के (कास्य पदक), तर बाकीच्या विद्यार्थ्यांना सहभगा प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना सहशिशिका अनुराधा केकडे, व रोहिणी सुरवसे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्था अध्यक्ष माननीय श्री. डॉ .सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष आमदार देवेंद्र कोठे, सचिव प्रथमेश कोठे, राधिका चिलका, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांनी अभिनंदन केले आहे.

# 'मायक्रोप्लॅनिंग' @ आऊटपूट!



कुमार आशीर्वाद यांनी आपल्या २ वर्षे ९ महिन्याच्या कारकीर्दीत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या नवनव्या योजनांमध्ये, उत्सवांमध्ये आषाढी वारीत व इतर लहान-मोठ्या कार्यक्रमात त्यांच्या सहकारी टीमला घेवून मायक्रोप्लॅनिंग केला; यामुळेच त्यांची एकही योजना फसली नाही आणि त्यांच्या हातून लक्षवेधी कामगिरी घडत जावून आऊटपूटही चांगले निघत होते. याच धर्तीवर आता नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनीही जिल्ह्याच्या प्रत्येक विकासकामांत, शासकीय योजनांत सहकारी टीमला, राजकीय नेत्यांना घेवून मायक्रोप्लॅनिंग केला की त्यांच्याकडूनही नक्कीच ठळक कामगिरी घडेल. यात शंका घेण्याचे कारणच नाही.

आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांनी त्यांच्या आयुष्यात प्रचंड अभ्यास केलेला असतो. जमिनीवरील अगदी सुक्ष्म असलेल्या अणू-रेणू ते अवकाशातील तारे-तारकांपर्यंतचे त्यांना पुस्तकी ज्ञान असते. मात्र समोर येणारी माणसं हाताळण्याचं तंत्रज्ञान त्यांना अगदी अनुभवातूनच घ्यावे लागते. मागील जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हाधिकारी पदाची जबाबदारी घेतल्यावर काही महिने तेही थोडे गोंधळले होते. मात्र त्यांनी अत्यल्प काळात स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव, सोबतचे सहकारी बांधव यांच्याकडून जिल्ह्यातील लोकांच्या मानसिकतेचा सखोल, अगदी खडान्खडा अभ्यास केला. याचबरोबर त्यांच्या सहकारी टीमकडून जिल्ह्याचे भौगोलिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांकृतिक आदी घडामोडीही त्यांनी चोखंदळपणे अभ्यासल्या होत्या. नव्याने आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी पत्रकारांच्या पहिल्याच भेटीत आशीर्वाद साहेबांच्या अनुभवाचे बोल काही दिवस समजून घेणार असल्याचे सांगितले; इतकेच नाहीतर आशीर्वाद यांनी पावणेतीन वर्षात सोलापूरसाठी दिलेले योगदान समजून घेणार आहे आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचे कामकाज पाहणार असल्याचे सांगत जिल्हाधिकारी पदाची सुत्रे कार्तिकेयन यांनी हाती घेतल्याने सोलापूरकरांच्या आता कार्तिकेयन यांच्याकडूनही जिल्हा विकासाच्या अपेक्षा रूंदावणार आहेत.

कुमार आशीर्वाद यांचे होटगी रोड विमानतळ, आयटी पार्क, पंढरीच्या आषाढी-कार्तिकी वारीसाठी केलेले काम कौतुकास्पद होते. थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांच्या नियोजनबध्द कामाचे कौतुक करून त्यांना आपल्याच होमग्राऊंड असलेल्या नागपूर जिल्ह्याची आता नव्याने जबाबदारी दिली आहे. त्याठिकाणीही आशीर्वाद हे चमकणार यात शंका वाटत नाही! येथील सीना नदीला गतवर्षी आलेल्या महापुरावरही आशीर्वाद यांनी जोखमेचे काम केले होते; त्यांनी या महापुरावेळी वेळीच काही धाडसी निर्णय घेतल्याने ६ तालुक्यात कोणतीही मनुष्यहानी झाली नाही.

सोलापूर शहर व जिल्ह्यातील विकासाचे विषय मार्गी लावताना, सोलापूर विमानतळ, पंढरपूर वारी, पालखी मार्ग, पंढरपूर कॉरिडॉर, आयटी पार्क, शहरातील उड्डाणपूल, सोलापूर-धाराशिव रेल्वेमार्गाच्या कामासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनाही विश्वासात घेत विकासकामाचा रेटा पुढे नेला होता. भीमा-सीना नदीला आलेल्या महापुरातील त्यांचे काम जिल्ह्यातील नागरिकांसाठी तसे संस्मरणीय ठरले असले तरी उजनी जलपर्यटनाचे त्यांचे मोठे स्वप्न अधुरे राहिले. या उजनी जलपर्यटनासाठी त्यांनी २८२ कोटीचा आराखडा शासनाकडून मंजूर करून घेतला होता मात्र मंत्रालय पातळीवरील काही निर्णयामुळे हे काम त्यांच्या हातून राहून गेल्याची त्यांना खंत आहे. जलपर्यटनाबरोबर त्यांना कृषी पर्यनालाही जोड देवून जिल्ह्याची एक वेगळी ओळख करून द्यायची होती; अनेकांना रोजगार मिळवून द्यायचा होता. आता हे






**कलेक्टर कचेरीतून**
**अविनाश गायकवाड**
**मो. 9421876340**

काम नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी तडीस घेवून जाण्याची गरज आहे. याचबरोबर बोरामणी विमानतळाचाही आशीर्वाद यांनी शासन दरबारी चांगलाच पाठपुरावा केला असून, तेही अर्धवट काम नूतन जिल्हाधिकाऱ्यांनी पूर्ण करण्याची गरज आहे. कुमार आशीर्वाद यांनी त्यांच्या कार्यकाळात प्रशासकीय कुशलतेने काही धाडसी निर्णय घेतले. कडक शिस्त आणि कामातील तत्परतेमुळे त्यांची प्रशासकीय कारकीर्द सोलापूरकरांसाठी लक्षवेधी ठरली. शहर जिल्ह्यात त्यांनी आपल्या कामाचा चांगला ठसा उमटविला होता. युवा कलेक्टर म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जायचे. जिल्हाधिकारी पदाच्या कार्यकाळात आशीर्वाद यांनी जीव तोडून काम केल्याने काही मोठे प्रकल्प मार्गी लागले आहेत. त्यांच्या हातून काही कामे अर्धवटही राहिल्याचे समजते. यासाठी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली काम करून त्यांची अर्धवट राहिलेली सर्व कामे पूर्णत्वास घेवून जाणार असल्याचा निर्वाळाही नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिला आहे, यामुळे या युवा कलेक्टरकडूनही जिल्हावासियांना अनेक अपेक्षा आहेत.

# वाचन छंद नव्हे जीवनशैली असली पाहिजे

## प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत 'वाचून उरणारी पुस्तके'चे प्रकाशन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

प्रिसिजन फाऊंडेशनच्या वतीने डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे आयोजित प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात लेखक नीतिन वैद्य लिखित 'वाचून उरणारी पुस्तके' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते लेखक नीतिन वैद्य, मुलाखतकार शिरीष देखणे आणि अभिवाचक विद्या लिमये यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन पार पडले.

मुख्य कार्यक्रमाची सुरुवात विद्या लिमये यांच्या मंजुळ गायनाने झाली. त्यानंतर 'वाचून उरणारी पुस्तके' या पुस्तकातील निवडक लेखांचे प्रभावी अभिवाचन शिरीष देखणे आणि विद्या लिमये यांनी सादर केले. या अभिवाचनाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मुलाखतीदरम्यान लेखक नीतिन वैद्य यांनी आपल्या वाचनप्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. वाचनाची आवड मला आईकडून मिळाली. लहानपणी शेजाऱ्यांकडे जाऊन वर्तमानपत्र वाचायचो. शालेय जीवनातच पत्रलेखनाची सवय लागली आणि माझी जवळपास १०० पत्रे दैनिकांत प्रसिद्ध झाली, असे त्यांनी सांगितले. मर्यादित साधनसंपत्तीमध्ये वाढ झाल्याचे सांगत त्यांनी पुस्तकांच्या सहवासाचे महत्त्व अधोरेखित केले. पुस्तके ही माणसांपेक्षा अधिक चांगले मित्र ठरू शकतात, असे मत व्यक्त करत त्यांनी वाचन ही जीवनशैली असली पाहिजे, छंद नव्हे असा संदेश दिला. तसेच, पुस्तके वाचल्यानंतर ती आपल्या मनात रुजतात आणि आयुष्याचा भाग बनतात, म्हणूनच या पुस्तकाला 'वाचून उरणारी पुस्तके' असे नाव दिले, असेही त्यांनी स्पष्ट केले. वाचनामुळे माणसामध्ये मौलिक बदल होतात, उत्तम वाचक हा संभाव्य लेखक असतो, तसेच एक पुस्तक अनेक नव्या विचारांचे दरवाजे उघडते, असेही त्यांनी नमूद केले. विद्या लिमये यांनी वाचनावरील कविता सादर करत कार्यक्रमाची रंगत वाढवली. सूत्रसंचालन व आभार प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी नितीन फलटणकर यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## शिवा संघटना महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव अध्यक्षपदी नगरसेवक राजशेखर पाटील

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**



शिवा संघटना सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने महात्मा बसवेश्वर उत्सव २०२६ साठी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड आज उत्साहात पार पडली.या निवड प्रक्रियेत उत्सव अध्यक्ष म्हणून नगरसेवक मा. श्री. राजशेखर पाटील यांची निवड करण्यात आली असून कार्याध्यक्षपदी अंगद बहिरवाडे यांची निवड झाली. तसेच उपाध्यक्ष म्हणून बाबुराव रामपुरे, सचिव म्हणून सौरभ पाटील आणि खजिनदार म्हणून धर्मराज नाशी यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी शिवा संघटना महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सातलिंग स्वामी, जिल्हा अध्यक्ष राजकुमार सारणे, शहर अध्यक्ष परमेश्वर माळगे, जिल्हा सोशल मीडिया प्रमुख नागेश कोप्पा, शहर उपाध्यक्ष अजिंक्य उप्पीन, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश तोरणगी, महेश इचगे, मोहोळ तालुका प्रमुख ऋषिकेश पाटील, अक्कलकोट तालुका प्रमुख संगमेश्वर कांबळे, अप्पू यलशेट्टी, लक्ष्मीकांत पुजारी, गोरख सेठ चौधरी, महांतेश झेंडेकर, काशिनाथ भद्गुनकी, रामचंद्र सुतार, डॉ. सुरेश पाटील, कौस्थुभ स्वामी, गिरीश किलजे, अविष्कार बाळशेट्टी, प्रदीप मांडीवाळ, राहुल पाटील, प्रथमेश माळगे उपस्थित होते. यावेळी नूतन उत्सव अध्यक्ष नगरसेवक राजशेखर पाटील यांनी बसव जयंती मोठ्या उत्साहात व जोरदार पद्धतीने साजरी करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. सूत्रसंचालन नागेश कोप्पा यांनी केले, तर आभार लक्ष्मीकांत पुजारी यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जिल्हा परिषद शाळा, आरोग्य केंद्रे होणार वीजबिल मुक्त

## सौरऊर्जेकडे झेप; ऑन-ग्रिड सोलर योजनेची अंमलबजावणी

**२२ कोटींच्या प्रकल्पातून ४०० शाळा, ५८ आरोग्य केंद्रांसह शासकीय इमारतींवर सोलार पॅनल बसविण्याचा वेग**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ एप्रिल-**

जिल्ह्यातील शासकीय यंत्रणा आता हरित ऊर्जेकडे निर्णायक पाऊल टाकत असून, जिल्हा परिषद शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्रांवर सोलार पॅनल बसविण्याचे काम वेगाने सुरू आहे. या उपक्रमामुळे शाळा व आरोग्य केंद्रांचे वीजबिल जवळपास शून्यावर येणार असून, प्रशासनाच्या खर्चात मोठी बचत होणार आहे.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अपारंपरिक ऊर्जा विकास कार्यक्रमातून हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी सातत्याने पाठपुरावा करून या योजनेला गती दिली आहे.

दरम्यान, या प्रकल्पासाठी सुमारे २२ कोटींच्या निविदेला मंजुरी देण्यात आली असून, त्याअंतर्गत जिल्ह्यातील ४०० शाळा, १३२ ग्रामपंचायत इमारती, ५८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ९ पंचायत समित्या तसेच ४ विश्रामगृहांवर सोलार पॅनल बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. अनेक ठिकाणी कामाची सुरुवात झाली असून, लवकरच ही कामे पूर्णत्वास जाणार आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून 'ऑन-ग्रिड' सोलर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सोलार पॅनलद्वारे निर्माण होणारी वीज महावितरणच्या जाळ्याशी (एमएससीबी) जोडली जाणार असल्यामुळे अतिरिक्त वीजेचा योग्य वापर होणार आहे.

### 'ग्रीन जिल्हा' संकल्पनेला बळ

क्षमतानुसार सोलार पॅनल बसविण्याचे नियोजन करण्यात आले असून, लहान शाळांवर दोन किलोवॅट, मोठ्या शाळांवर ५ किलोवॅट, ग्रामपंचायत इमारतींवर ३ किलोवॅट, तर प्राथमिक आरोग्य केंद्रांवर सुमारे २५ किलोवॅट क्षमतेची यंत्रणा बसविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे केवळ वीजबिलात बचतच होणार नाही, तर पर्यावरणपूरक ऊर्जा वापराला चालना मिळणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाचा हा निर्णय 'ग्रीन जिल्हा' संकल्पनेला बळ देणारा ठरत आहे.

# ग्रामरोजगार सेवकांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरु

**विविध कामे प्रलंबित**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर,दि. ५ एप्रिल-**

जिल्ह्यातील ९८० ग्रामरोजगार सेवकांना १७ वर्षांपासून अत्यल्प मानधन मिळत असल्याने त्यांनी १ एप्रिलपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे. केंद्र व राज्य शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत बदल केले, तरी ग्रामरोजगार सेवकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याची नाराजी व्यक्त होत आहे. ३ ऑक्टोबर २०२४ चा शासन निर्णय लागू करा, ८००० रूपये हजार मानधन लागू करा व २००० हजार रूपये टीएडीए भत्ता व डेटा पॅक या मागण्यांसाठी कामबंद आंदोलन करण्यात येत आहे. अद्यापपर्यंत कोणत्याच लोकप्रतिनीधी व राजकीय नेत्यांनी मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने कामबंद आंदोलन सुरू आहे. यामुळे तालुक्यातील घरकुल, सिंचन विहिर, पाणंद रस्ते, गायगोटा आदीसह विविध कामे प्रलंबित आहेत. तरी प्रशासनाने सर्व मागण्या पूर्ण करण्याची मागणी ग्रामरोजगार संघटनेचे जिल्हा सचिव मल्लिनाथ खोकले यांनी केली आहे.

राज्य शासनाच्या २ मे २०११च्या आदेशानुसार ग्राम रोजगार सेवकांची सेवा अद्यापही अर्धवेळ मानली जाते. मात्र, प्रत्यक्षात त्यांना कामाच्या ठिकाणी जाऊन फेस रीडिंग, ई-केवायसी, दप्तर नोंदणी, सामाजिक अंकेक्षण आदी विविध शासकीय कामे करावी लागत आहेत. ही कामे करताना कोणताही अतिरिक्त मोबदला मिळत नसल्याने आर्थिक अडचणी वाढत असल्याचे सेवकांचे म्हणणे आहे. ग्राम विकासमंत्री जयकुमार गोरे यांनी वाढीव मानधन देऊन ग्रामरोजगार सेवकांना नियमित सेवेत सामावून घेण्याचा निर्णय घ्यावा अशी मागणी दक्षिण सोलापूर ग्रामरोजगार सहायक संघटना तालुकाध्यक्ष अशोक होटकर यांनी दिला आहे.

## महत्वाचे...



### रानमळा चोपडी येथे श्री भोजलिंग यात्रा सोहळा उत्साहात

**सांगोला,दि.५ एप्रिल -**

रानमळा चोपडी (ता.सांगोला) येथे श्री भोजलिंग यात्रा सोहळा सासनकाठीची गावातून मिरवणूक काढून मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यात्रेनिमित्त संदीप मोहिते महाराज व अतुल हातेकर महाराज यांचा भारुडाची जुगलबंदी तसेच महिलांसाठी व पुरुषांसाठी संगीत खुर्ची, महिलांसाठी होम मिनिस्टर, सिद्धेश्वर संगीत भजनी भारुड मंडळ, दहिवडी यांचा कार्यक्रम संपन्न झाला. यात्रेनिमित्त घेण्यात आलेल्या धावण्याच्या स्पर्धेत अनिकेत देशमुख (कोळा), चेतन रूपनर (निमज), सुशांत सरगर (कोळा), विशाल वाघमोडे (कोळा), खुल्या रेकॉर्ड डान्स स्पर्धेत लहान गटात परी शेंडगे (सातारा), वैभवलक्ष्मी सुर्यवंशी (आष्टा), राजल सावंत (आटपाडी), कार्तिकी उपासे (कोल्हापूर), आस्था चोरगे (सातारा), रेणुका ग्रुप (आदमापुर), मोठ्या गटात सृष्टी जाधव, सानिका भागवत (सातारा), सुरज डान्स अकॅडमी (जत), अनुष्का भंडारी (इचलकरंजी), पायल पाटील (वाळवा), एस आर्ट ग्रुप (वडूज), मास्टर ग्रुप (जयसिंगपूर), आदित्य मोरे (सातारा) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकाविले. रस्सीखेच स्पर्धेत माडगुळकर ग्रुप, माडगुळे हा गट विजेता तर जय शिवराय ग्रुप, चोपडी हा गट उप विजेता ठरला. याप्रसंगी प्रतिक बाबर यांची भारतीय सैन्य दलात व मयूर बाबर यांची युको बँकेत लिपिक पदावरती निवड झाल्याबद्दल यात्रा कमिटीच्यावतीने सन्मान करण्यात आला. यात्रेनिमित्त दररोज सायंकाळी आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला.

### बार्शीतील हॉटेलसमोर अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला; पोलिसांची चौकशी सुरु

**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

शहरातील भवानी पेठ परिसरात एका हॉटेलसमोर अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली असून, या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.याबाबत मिळालेली माहिती अशी की, प्रकाश गोडोबा जाधव (वय ४५, रा. बारबोले प्लॉट, बार्शी) हे भवानी पेठ येथील रामकृष्णा हॉटेलमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. दि. ५ एप्रिल रोजी सकाळी ८ ते ४ या वेळेत ते आपल्या नेहमीच्या ड्युटीवर होते.




दरम्यान, दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास हॉटेलच्या गेटबाहेर लोकांची गर्दी दिसून आल्याने त्यांनी बाहेर जाऊन पाहणी केली असता, गेटसमोरील जागेत अंदाजे ४५ वर्षे वयोगटातील एक अनोळखी पुरुष इसम बेशुद्ध अवस्थेत पडलेला आढळला. सदर इसम अंगाने मध्यम असून, त्याने जांभळ्या रंगाचा अर्ध्या बाह्यांचा शर्ट व नेव्ही ब्ल्यू रंगाची पॅन्ट परिधान केली होती तसेच डोक्यावर टक्कल केलेले होते. घटनेची माहिती हॉटेलचे व्यवस्थापक विजय लड्डा यांना देण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार तत्काळ डायल ११२ वरुन पोलिसांना कळविण्यात आले. त्यानंतर बार्शी शहर पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.पोलिसांनी संबंधित इसमाला उठवण्याचा प्रयत्न केला असता त्याने कोणतीही हालचाल केली नाही. त्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याची खात्री झाल्यानंतर त्यास तात्काळ अॅम्ब्युलन्सच्या सहाय्याने ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे पुढील तपासणी व कार्यवाहीसाठी हलविण्यात आले. सदर इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून, मृत्यूचे नेमके कारण समजण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### गुळपोळीची कन्या विद्या काळेची 'महाराष्ट्र पोलीस' दलात निवड

**बार्शी, दि.५ एप्रिल -**

जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर अशक्य गोष्टही शक्य करता येते, हे बार्शी तालुक्यातील गुळपोळी गावच्या कन्येने सिद्ध करुन दाखवले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत विद्या दत्तात्रय काळे हिची सोलापूर शहर महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली आहे. एका



सामान्य कुटुंबातील लेकीने खाकी वर्दी परिधान करण्याचे स्वप्न पूर्ण केल्याने संपूर्ण गुळपोळी गावात आनंदाचे वातावरण असून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. विद्याचा हा संघर्षमय प्रवास आज ग्रामीण भागातील अनेक तरुणींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, हे विद्याने दाखवून दिले आहे. विद्याच्या या निवडीबद्दल गुळपोळी ग्रामस्थांकडून तिचे विशेष कौतुक होत असून, शेतीकरी, एका सामान्य कुटुंबातील लेकीने खाकी वर्दी मिळवून गावाचा नावलौकिक वाढवल्याबद्दल सर्वत्र अभिमान व्यक्त केला जात आहे. तिच्या या यशाबद्दल महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने संस्थापक अध्यक्ष भैरवनाथ चौधरी तिचे अभिनंदन केले.

### सुटा संघटना अध्यक्षपदी डॉ.पवार; प्रा. संतोष लोंढे सचिव

**सांगोला,दि. ५ एप्रिल-**



सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ तथा सुटा या प्राध्यापक संघटनेच्या महाविद्यालयीन पातळीवरील पदाधिकारी निवडणुका सांगोला महाविद्यालयामध्ये पार पडल्या. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.रामचंद्र पवार यांची अध्यक्ष, मराठी विभागातील प्रा.संतोष लोंढे यांची सचिव तर रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे यांची खजिनदार म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रा.डॉ.बबन गायकवाड यांनी कामकाज पाहिले. ही निवड २०२६ ते २०२८ अशी तीन वर्षासाठी असेल. विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध राहू, अशी प्रतिक्रिया नूतन पदाधिकारी यांनी याप्रसंगी दिली.

**बार्शी अपघात प्राधिकरणाचा महत्वपूर्ण निर्णय**

# वारसांना ८.१८ लाखांची नुकसान भरपाई मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या वारसांना नुकसानभरपाई देण्याबाबत बार्शी येथील अपघात प्राधिकरण न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायालयाने अर्ज मंजूर करत वारसांना एकूण ८ लाख १८हजार ३०० रुपये इतकी नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले.

न्यायालयाच्या आदेशानुसार, प्रतिसादक क्रमांक १ व २ यांनी संयुक्तपणे व स्वतंत्रपणे ही रक्कम अर्जदारांना अदा करावयची आहे. या रकमेवर अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून प्रत्यक्ष वसुलीपर्यंत दरवर्षी ६% दराने साधे व्याज देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. तसेच नुकसान भरपाईची रक्कम जमा झाल्यानंतर तिचे वाटप पुढीलप्रमाणे करण्यात येणार आहे. एकूण रकमेपैकी ५०% रक्कम अर्जदार क्रमांक १ ला देण्यात येणार असून त्यापैकी ३०% रक्कम तिला त्वरित धनादेशाद्वारे देण्यात येईल, तर उर्वरित २०% रक्कम तिच्या नावाने दोन वर्षांसाठी राष्ट्रीयीकृत बँकेत मुदत ठेवीत ठेवण्यात येईल.

उर्वरित ५०% रक्कम अर्जदार क्रमांक २ ते ५ यांना समसमान वाटप करुन धनादेशाद्वारे देण्यात येणार आहे. या प्रकरणात वारसांच्यावतीने ऍड. शिवाजी क्षीरसागर, ऍड. पवन क्षीरसागर व ऍड. अक्षय बिडबाग यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांच्या युक्तिवादामुळे वारसांना न्याय मिळाल्याचे मानले जात आहे. या निर्णयामुळे अपघातग्रस्तांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये निर्भया पथकाचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ एप्रिल-**



श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथे शनिवारी (दि.४ ) निर्भया पथकाच्या वतीने विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. महिलांच्या सुरक्षा बाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला होता.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी.पाटील हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

निर्भया पथकातील पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया रावण यांनी विद्यार्थिनींना त्यांच्या हक्कांविषयी, स्वसंरक्षणाच्या उपाययोजना, तसेच आपत्कालीन मदत कशी मिळवावी याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने मुलींना त्रास देणे, छेडछाड करणे यांसारख्या प्रकारांमधून बचाव करण्याचे मार्गही यावेळी समजावून सांगण्यात आले.

यावेळी पोलीस कॉन्स्टेबल निर्मला वाघमारे यांनी निर्भया पथकाचा मोबाईल नंबर देऊन कुठेही छेडछाड अथवा गैरप्रकार आढळल्यास विद्यार्थ्यांना कोणत्याही दबावाला बळी न पडता संपर्क करण्याचे आवाहन केले. निर्भया पथकाच्या या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागून पुढील अनेक गैरप्रकार रोखण्यास मदत होणार आहे असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. पाटील यांनी व्यक्त केले.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी या उपक्रमाचे कौतुक करून या विषयीचे महत्त्व अधोरेखित केले. महिला व बालविकास मंत्रालय भारत सरकार व महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशाप्रमाणे डक्ष्-इजद व कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम झजडक्ळढ २०१३ अन्वये जनजागृती होण्यासाठी महाविद्यालय स्तरावर सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


यावेळी समुपदेशक डॉ. संगीता पाटील, निर्भया पथकातील कॉन्स्टेबल शशिकांत सावंत, लक्ष्मण कुचेकर, महाविद्यालयातील विभागाचे विभागप्रमुख डॉ.एस.एम. लंबे, डॉ.एस.व्ही.एकलारकर, डॉ.अनिल बाबर, प्रा. दीपक भोसले सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपप्राचार्य प्रा.जगदीश मुडेगावकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रा.गायत्री सरदेशमुख यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# नेवरे जिल्हा परिषद शाळेत वातानुकूलित आयडियल लॅब

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ५ एप्रिल-**

नेवरे (ता. माळशिरस) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या आधुनिक शिक्षणासाठी उभारण्यात आलेल्या नूतन वातानुकूलित आयडियल सेंटर लॅबचे उद्घाटन शनिवारी, (४ एप्रिल) रोजी करण्यात आले.

शिक्षणाधिकारी कादर शेख यांचे हस्ते प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी जि.प.सदस्य नागेश भोसले, पं.स. सदस्य आप्पासो पाटील, गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, विस्तारअधिकारी असलम इनामदार, भक्ति नाचणे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दयानंद पाटील, सरपंच राजाभाऊ



झुरुळे उपस्थित होते. या आधुनिक 'आयडियल सेंटर लॅब'मुळे विद्यार्थ्यांना डिजिटल युगातील शिक्षण अधिक प्रभावीपणे मिळणार असून, जिल्ह्यातील ही पहिली अद्ययावत वातानुकूलित प्रयोगशाळा असल्याचे कादर शेख यांनी सांगितले. तर हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सुषमा महामुनी यांनी सांगितले. यावेळी आयडियल सेंटरसाठी देणगी दिलेल्या सर्व देणगीदारांचाकादर शेख यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शिक्षणाच्या आधुनिक वाटचालीकडे टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल असल्याची भावना मुख्याध्यापक नाथसिंह देशमुख यांनी व्यक्त करत या शाळेस नुकतेच गुणवत्तेच्या आधावर मानांकन मिळवणारी तालुक्यातील एकमेव शाळा असल्याचे सांगत ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हे कार्य होत असल्याचे सांगितले.

# मंगळवेढा पालिकेचा थकबाकीदारांना दणका

## अवघ्या ३ दिवसांत 'इतक्या' लाखांची वसुली; नळतोडणीसह धडक कारवाई

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि.५ एप्रिल**




'सुविधा हव्या, पण कर नको' म्हणणाऱ्या थकबाकीदारांविरुद्ध मंगळवेढा नगरपालिकेने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. तब्बल २.२४ कोटींच्या थकबाकीसाठी पालिकेने राबवलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश आले असून, पहिल्या तीन दिवसांतच २९ लाख ४३ हजार ९९६ रुपयांची विक्रमी वसुली करण्यात आली आहे.

गेल्या चार वर्षांत प्रशासकराज आणि अपुऱ्या मनुष्यबळामुळे कर वसुलीचे काम अक्षरशः रखडले होते. परिणामी थकवाकीचा आकडा कोट्यवधींवर जाऊन पोहोचला. मात्र नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर लोकप्रतिनिधी सत्तेत आल्यानंतर प्रशासनाने 'आता कोणतीही सवलत नाही' अशी भूमिका घेत थेट मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. पाणीपट्टी थकवणाऱ्यांवर पालिकेने थेट नळतोडणीची मोहीम सुरू केली आहे.

थकबाकीदारांच्या घरांवर धडक देत पथकांनी पाणी कनेक्शन तोडण्याची कारवाई केली. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून, अनेकांनी तातडीने थकचाकी भरण्यास सुरुवात केली आहे. घरपट्टीची थकबाकी १ कोटी २३ लाख ६५ हजार ६१६ रुपये, तर पाणीपट्टीची थकबाकी १ कोटी १ लाख ४ हजार ४३८ रुपये इतकी प्रचंड आहे.

या थकबाकीमुळे पालिकेच्या विकासकामांवर मोठा परिणाम होत असून, अनेक प्रकल्प निधीअभावी रखडण्याची वेळ आली आहे. उन्हाळ्यात ग्रामीण भागात पाण्याची तीव्र टंचाई असतानाही मंगळवेढा शहरवासीयांना त्या झळा बसू नयेत, म्हणून पालिकेने एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरळीत ठेवला.

मात्र सुविधा मिळूनही कर भरण्याकडे नागरिकांनी पाठ फिरवल्याने प्रशासनात नाराजी व्यक्त होत आहे. करनिरीक्षक महानंदा धुमाळ यांच्या नेतृत्वाखाली गोरख काकडे, सागर गडेकर, युनूस मोगल, हरीप्रसाद देवकर, अजय माने, अशोक डोके, वसंत वाघमोडे यांच्या पथकांनी शहरात धडक मोहीम राबवली.

काही ठिकाणी थकबाकीदारांकडून कर्मचाऱ्यांशी अरेरावी करण्यात आली. तरीही कर्मचाऱ्यांनी संयम राखत आपली कारवाई सुरू ठेवली. नगरपालिकेकडून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी निधी आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपला कर वेळेत भरणे ही जबाबदारी आहे, असे आवाहन करनिरीक्षक महानंदा धुमाळ यांनी केले आहे.

पालिकेच्या या आक्रमक मोहिमेमुळे शहरात आता 'कर भरा नाहीतर कारवाईला सामोरे जा' असा स्पष्ट संदेश गेला असून, पुढील काही दिवसांत वसुलीचा वेग आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

घरपट्टीची थकबाकी १ कोटी २३ लाख ६५ हजार ६१६ रुपये, तर पाणीपट्टीची थकबाकी १ कोटी १ लाख ४ हजार ४३८ रुपये इतकी प्रचंड आहे. नगरपालिकेने आता स्पष्ट भूमिका घेतली आहे. कर भरा, अन्यथा सुविधा बंद। थकबाकीदारांवर नळतोडणी, दंडात्मक कारवाई यांसारख्या उपाययोजना आणखी तीव्र केल्या जाणार आहेत.

# आगळगावांत विजेच्या कडकडाटात म्हैस व रेडी ठार

**वादळी वारे, अवकाळी पावसामुळे शेतकरी पुन्हा संकटात**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ एप्रिल**

तालुक्यातील आगळगांव परिसरात शनिवार दि. ४ एप्रिलच्या पहाटे पावसाने अक्षरशः थैमान घालत मोठे नुकसान घडवले. पहाटेच्या सुमारास अचानक वातावरणात मोठा बदल होऊन जोरदार वादळी वारे, मुसळधार अवकाळी पाऊस आणि विजांचा कडकडाट यामुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला. काही काळासाठी विजांच्या चमकांमुळे आणि गडगडाटामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

याच दरम्यान, शेतकरी गणेश प्रकाश डमरे यांच्या शेतात अचानक विज कोसळून मोठी दुर्घटना घडली. गट क्रमांक २९६/४ मध्ये बांधून ठेवलेली त्यांची म्हैस आणि रेडीच्या अंगावर वीज पडून जागीच मृत्युमुखी पडली. या दुर्घटनेत सुमारे ७५ हजार रुपये किंमतीची म्हैस आणि २५ हजार रुपये किंमतीची रेडी असे एकूण अंदाजे एक लाख रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतीसोबतच जनावरांवर उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यासाठी ही मोठी आर्थिक व मानसिक धक्का देणारी घटना ठरली आहे.

घटनेची माहिती मिळताच महसूल व पशुसंवर्धन विभागाची यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. तलाठी साहील पठाण, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. राहूल गोसावी, डॉ. मधुकर जाधवर तसेच पशुसेवक प्रदीप विष्णू गरड यांनी घटनास्थळी पाहणी करुन पंचनामा केला व नुकसानाची नोंद घेतली. सध्या अवकाळी पावसाचे प्रमाण वाढले असून, त्यासोबतच वादळी वारे व विजांच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. अचानक बदलणाऱ्या हवामानामुळे शेतकऱ्यांचे जनजीवन विस्कळीत होत असून, शेती व पशुधन या दोन्ही क्षेत्रांवर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. विशेषतः विजेच्या घटनांमुळे जनावरांचे तसेच मनुष्यहानीचे धोके वाढले आहेत. दरम्यान, बाधित शेतकरी गणेश डमरे यांना शासनाकडून तात्काळ आर्थिक मदत मिळावी अशी मागणी होत आहे.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मार्केट यार्डातील मुनीमाची लेक बनली पोलिस; पहिल्याच प्रयत्नात यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

तालुक्यातील फफाळवाडी गावची कन्या नेहा रामचंद्र घाडगे हिने पुणे शहर पोलीस भरतीत यश संपादन करत आपल्या कुटुंबासह गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या नेहाला अखेर पहिल्याच प्रयत्नात मेहनतीचे गोड फळ मिळाले. तिचे वडील मार्केट यार्डात मुनीम म्हणून काम करीत आहेत. नेहाने बी.कॉम पर्यंत शिक्षण पूर्ण केले असून सध्या ती बी.एड.चे शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच पोलीस भरतीसाठी आवश्यक असलेल्या शारीरिक चाचण्यांची तयारी, नियमित सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तिने हे यश मिळवले. तिच्या जिद्दीमुळे आणि कठोर परिश्रमांमुळे आज ती अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरली आहे. नेहाचे वडील बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीत मुनीम म्हणून कार्यरत आहेत. साध्या कुटुंबातून आलेल्या नेहाने मिळवलेल्या या यशाचे फफाळवाडी गावासह परिसरात मोठ्या प्रमाणावर कौतुक होत असून, यार्डातील मुनीमाची लेक पोलीस झाली या बातमीने गावकऱ्यांमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तिचे सर्व स्तरांमधून कौतुक व अभिनंदन होत आहे.



## महत्त्वाचे



### वेळापूरच्या प्रा.भारत गायकवाड यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**अकलूज, दि. ५ एप्रिल-**

वेळापूर येथील प्रख्यात कवी व साहित्य अभ्यासक प्रा. भारत कृष्णा गायकवाड यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. तथागत भगवान बुद्धांची जन्मभूमी लुंबिनी येथे भारत-नेपाळ सामाजिक समानता या विषयावर बारावी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेत देश-विदेशातील सुमारे ३६ ते ३७ मान्यवरांना पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रा. गायकवाड आरोग्य कारणामुळे परिषदेला उपस्थित राहू शकले नसल्याने ४ एप्रिल रोजी प्रा. गोरख साठे यांनी वेळापूर येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना पुरस्कार प्रदान केला. परिषदेला अध्यक्ष म्हणून प्रा. वैशाली देठे उपस्थित होत्या. दरम्यान, प्रा. गायकवाड यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक योगदानाबद्दल येत्या २३ मे रोजी दिल्ली येथे मानद पीएचडी जाहीर झाली आहे. मात्र प्रकृतीमुळे ते उपस्थित राहू शकत नसल्याने, ही पदवी १ जून २०२६ रोजी त्यांच्या निवासस्थानी आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



### रणजितसिंह वाचनालयाच्यावतीने सभापती दत्ता मगर यांचा सन्मान

**माळशिरस, दि.५ एप्रिल-**

माळशिरस पंचायत समितिच्या सभापती पदाची संधी निम गाव गावाला प्रथम मिळाली याबद्दल रणजितसिंह सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने नुतन सभापती दत्ता मगर यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी मगर म्हणाले, रणजितसिंह सार्वजनिक वाचनालयानाच्या पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण भागात वाचन संस्कृती रूजविली. मोबाईलच्या जमान्यात आजही वाचनालयात वाचक पुस्तकांचे व दैनिकाचे वाचन करतात, ही आभिमानस्पद बाब आहे. भविष्यात वाचनालयाच्या सामाजिक आर्थिक कामाला पुर्णपणे सहकार्य करणार. यावेळी रामभाऊ मगर, प्रतापराव मगर, शांतिलाल काटकर, संजय मगर, राज मगर, प्रशांत कस्तुरे, चांगदेव साठे यासह बहुसंख्य वाचक उपस्थित होते.



### नाझरे येथील मारुती मंदिरात महाआरती

**सांगोला, दि.५ एप्रिल-**

नाझरे (ता.सांगोला) येथील हिंदू संमेलनात डॉ.नीलकंठ शिवाचार्य धारेश्वर महास्वामी यांनी हनुमानाचे महत्त्व सांगत ज्या मंदिरात आपण जातो त्या देवाची प्रथम आरती व नंतर हनुमंताची घ्या असे सांगितले होते. त्याप्रमाणे नाझरे येथील मारुती मंदिरात सध्या तुकाराम चरित्र या पोथीचे वाचन सुरू असून त्याची महाआरती लक्ष्मी पाटील यांच्या हस्ते तर महाबली हनुमानाची महाआरती रविराज शेटे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी भारत शेलके, पोपटराव स्वामी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. हरिश्चंद्र सोनवणे यांनी महाप्रसादाचे वाटप केले. दर शनिवारी सायंकाळी आठ वाजता महाआरती कायमस्वरूपी होईल, असे हनुमान भक्तांतर्फे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी युवक वर्ग उपस्थित होता.

### टास्क फोर्स सक्रीयतेची महूद ग्रामस्थांना आशा

**सांगोला, दि. ५ एप्रिल-**

चला जाणूया नदीला अभियानात सोलापूर जिल्ह्यातील चंद्रभागा, माणगंगा, कासाळगंगा, आदिला, दुबदुबी, कोरडा या नद्यांचा समावेश करण्यात आला आहे. नदी संवाद मधून नदी बारमाही आणि निर्मल वाहत राहण्यासाठीचा लोकअभ्यास करण्यात आला आहे. सांगोला, पंढरपूर, माळशिरस तालुक्यातील २३ गावे व वाड्यांची जीवनदायिनी ठरलेली कासाळगंगा बारमाही आणि निर्मल वाहत राहण्यासाठीचा लोकअभ्यास व कृती अहवाल करण्यात आला आहे. हा अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर करण्यात आला. त्याआधारे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली असून सांगोला तालुक्यातील महूद ग्रामस्थांनी हा टास्क फोर्स लवकर सक्रीय व्हावा, अशी आशा व्यक्त केली आहे.

## ‘झेडपी’च्या सत्तेतून राष्ट्रवादीचा ‘एक्झिट प्लॅन’?

### राष्ट्रवादी सदस्यांत असंतोष, पदवाटपावरून नाराजी शिगेला

### १२ एप्रिलला निर्णायक बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

जिल्हा परिषदेत भाजपने एकहाती सत्ता प्रस्थापित केल्यानंतर सत्तासमीकरणात सहभागी झालेल्या अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सत्तेत सहभागी होऊनही कोणतेही महत्त्वाचे पद न मिळाल्याने राष्ट्रवादी आता झेडपी सत्तेतून बाहेर पडण्याच्या तयारीत असून, याबाबतचा अंतिम निर्णय १२ एप्रिल रोजी होणाऱ्या बैठकीत घेतला जाणार आहे.

जिल्हा परिषदेत भाजपने अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि चारही विषय समित्यांचे सभापतीपद स्वतःकडेच ठेवत पूर्ण सत्ता आपल्या ताब्यात घेतली आहे. त्यामुळे सहयोगी पक्ष म्हणून सत्तेत सहभागी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांची अपेक्षा भंग झाली आहे. विशेषतः, विषय समित्यांमध्ये तरी संधी मिळेल, अशी आशा व्यक्त करणाऱ्या सदस्यांना देखील डावलण्यात आल्याने नाराजी उफाळून आली आहे.



पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झालेल्या पदवाटपात भाजपच्या सदस्यांनाच सर्व प्रमुख पदे देण्यात आली. यामुळे राष्ट्रवादीतील सदस्यांमध्ये असंतोषाची भावना अधिक तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षातील पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा सुरू केली असून, सत्तेत राहायचे की विरोधात बसायचे, यावर गंभीर विचार सुरू असल्याचे समजते.

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत असताना तीनही पक्षांतील आमदारांना मंत्रिपदे मिळाली आहेत. त्याच धर्तीवर जिल्हा परिषदेतही सत्तेतील घटक पक्षांना समप्रमाणात संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात भाजपने एकहाती सत्ता वापरत इतर सहयोगी पक्षांना दुय्यम स्थान दिल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्ष झेडपीत विरोधी पक्षाची भूमिका स्वीकारण्याच्या दिशेने पावले टाकत आहे.

दरम्यान, १५ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेत विषय समित्यांवरील सदस्यांची निवड होणार आहे. यानिवडीत तरी राष्ट्रवादीच्या सदस्यांना संधी द्यावी, अशी मागणी पक्षाकडून करण्यात येत आहे. अन्यथा, सत्तेतून बाहेर पडून विरोधात बसण्याचा निर्णय निश्चित असल्याचा इशारा राष्ट्रवादीच्या एका सदस्याने दिला आहे. झेडपीतील सत्तासमीकरणावर पदवाटपाचा परिणाम स्पष्ट दिसत असून, राष्ट्रवादीच्या संभाव्य ‘एक्झिट’मुळे स्थानिक राजकारणात नव्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



## श्रीपूरमध्ये सायकल रायडर यात्रेचे उत्साहात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.५ एप्रिल-**

हिंदू धर्माचे अधिष्ठान असलेला भागवत धर्म व आपल्या संतानी सांगितलेल्या शांतता, बंधूता व समता याच्या प्रचार व प्रसार होण्यासाठी निघत असलेल्या घुमान सायकल रायडर यात्रेची माहिती व्हावी या उद्देशाने माळशिरस तालुक्यात फेरी काढण्यात आली होती.

याप्रसंगी श्रीपुरमध्ये सतीश यादव बोलत होते. ते म्हणाले, पंढरपूर ते घुमान अशी दरवर्षी सायकल रायडर यात्रा निघत असते या यात्रेची सर्वांना माहिती व्हावी व जास्तीत जास्त नागरिकांनी यात सहभागी व्हावे. यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

पत्रकार सुर्यकांत भिसे यांच्या नेतृवाखाली सुमारे १५० सायकल रायडर यामध्ये सामील झाले आहेत. श्रीपूर नगरीत आगमन झाल्यावर कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्यावतीने कारखान्याचे वैदयकीय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे, डिस्टलरी मॅनेजर आर. एस. पाटील, कंप्यूटर इन्चार्ज तानाजी भोसले, कॅन सुपरवायझर राहुल साठे, कामगार प्रतिनिधी विजय पाटील, अनंत जाधव यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. पोफळे यांनी कारखान्याचे संस्थापक कै. सुधाकरपंत परिचारक तसेच विद्यमान चेअरमन प्रशांतराव परिचारक, उपाध्यक्ष कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी सामाजिक उपकमास पाठिंबा दिला आहे.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समस्यांबाबत माजी नगरसेवक शिरसट यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ एप्रिल-**



येथील माजी नगरसेवक विक्रम शिरसाट (पापरकर) यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरा संदर्भातील विविध समस्या तसेच अडचणीं संदर्भातील मागण्यांचे निवेदन विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती प्रशासनाला दिले आहे.

मंदिर समितीच्या वतीने समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले यांनी हे निवेदन स्वीकारले. मंदिर समितीमधील वरिष्ठ अधिकारी तसेच समितीच्या अध्यक्षांसमोर निश्चितपणे आपल्या मागण्या मांडल्या जातील, असे आश्वासन व्यवस्थापक भोसले यांनी दिले. यावेळी समाजसेवक सागर बाबा तारापूरकर उपस्थित होते.

उन्हाच्या तीव्रतेमुळे भाविकांना त्रास होऊ नये म्हणून मंदिर समितीच्या वतीने महाद्वार ते नामदेव पायरी व चौफाळा ते पश्चिमद्वार तसेच मंदिरा भोवती सावलीकरिता मंडप (कापडी शेड) उभा करण्यात यावे. याबरोबरच भविकांचे पाय गर्मीमुळे भाजू नये या करिता मॅट टाकण्यात यावे. तसेच पंढरपूर सभामंडप येथील बाथरूम हे पाण्याअभावी बंद अवस्थेत आहे. तरी ते त्वरित चालू करण्यात यावे. या बरोबरच बंद अवस्थेत असलेल्या बोअरवेल सुरु करावा व भाविकांची होणारी गैरसोय टाळावी. मंदिर समितीच्या कंट्रोल रूममधील काही कर्मचारी हे अरेरावीची व उध्दटपणाची भाषा वापरतात याचा प्रत्येय वेळोवेळी येतो अश्या वृत्तीवर वेळीच आळा घालण्यात यावा. काही प्रकरणात भाविका ना शिस्तीचे पालन व्हावे या करिता कर्मचारी आपले कर्तव्य पार पाडत असताना, त्या मध्ये गैरवर्तणूक म्हणून समितीकडून विना चौकशी कार्यवाही केली जाते तरी त्यांच्या वर अन्याय होऊ नये आदी मागण्यांचा या निवेदनात समावेश आहे.

## भगीरथ भालकेंचा पक्षप्रवेशाचा १२ एप्रिलचा मुहूर्त?

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पंढरपुरात होणार प्रवेश सोहळा; शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ एप्रिल -**

राज्यातील बदलत्या सत्ताकारणाचे पंढरपुरातील राजकाणावरसुध्दा परिणाम जाणवू लागले आहेत. अनेक दिवसांपासून नुसत्या चर्चेचे गुऱ्हाळ बनलेल्या माजी चेअरमन भगीरथ भालके व नगराध्यक्षा डॉ. प्रणिता भालके यांचा शिवसेना शिंदे गटातील पक्षप्रवेशाच्या विषयाला अखेर मुहूर्त लागल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. येत्या १२ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पंढरपूर येथे कार्यक्रम पार पडणार आहे.

नुकत्याच झालेल्या पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या डॉ. प्रणिता भालके या मोठ्या मताधिक्याने नगराध्यक्षपदी निवडून आल्या आहेत. स्थानिक पातळीवर सत्तेसोबतच राज्यातील सता असणाऱ्या पक्षासोबत असणे शहराच्या विकासाच्या दृष्टीने फायद्याचे ठरत असते. पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने तीर्थक्षेत्र विकास आघाडीस छुपी मदत केल्याची चर्चा राजकारणात रंगत होती. तसेच शिवसेना शिंदे गट राज्यातील सत्तेत असून याचा फायदा शहराच्या विकासाच्यादृष्टीने होणार आहे.

विठ्ठलचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, भारत राष्ट्र समिती या पक्षामध्ये प्रवेश केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाकडून विधानसभेची निवडणूक लढवली होती. मात्र दोन्ही विधानसभेच्या निवडणुकीत भगीरथ भालके यांना पराभव पत्करावा लागला होता. पराभवानंतर भालके गटाची अवस्था दयनीय झाली होती. मात्र पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदी डॉ.प्रणिता भालके निवडून आल्याने भालके गटास नवसंजीवनी प्राप्त झाली आहे. हाच धागा पकडत आगामी विधानसभेच्या निवडणुकीची तयारी भगीरथ भालके यांच्याकडून सुरू करण्यात आली आहे.

### सत्तेशिवाय विकास नाही, त्यामुळेच सत्तेसोबत जाणार

पंढरपूरच्या विकासाच्या दृष्टीने राज्यातील सत्तेसोबत जाणे भालके यांना अनिवार्य झाले आहे. नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भालके या येथील तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून निवडून आल्या आहेत. तसेच त्यांचे पती भगीरथ भालके यांनी काँग्रेसकडून विधानसभेची निवडणूक लढवली होती. मात्र राज्य व केंद्रात काँग्रेस सत्तेत नसल्याने विकासाची कामे प्रलंबित पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे सत्तेशिवाय विकास होवूच शकत नाही म्हणून विकासासाठी सत्ता महत्त्वाची असून यासाठी भालकेंचा पक्षप्रवेश महत्वाचा असल्याचे भालके समर्थकांकडून बोलले जात आहे.





### विधानसभेसाठी भविष्यात पेच निर्माण होण्याची शक्यता

राज्यात सध्याच्या घडीला भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प. गट) यांची राज्यात सत्ता आहे. जागा वाटपामध्ये पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेची जागा ही भाजपच्या वाट्याला आहे.त्यामुळे भविष्यात विधानसभा निवडणूकीच्या वेळी पंढरपूर-मंगळवेढ्याच्या जागा वाटपामध्ये पेचप्रसंग निर्माण होण्याची शक्यता आहे.

## शाळांमध्ये पटपडताळणी मोहीम सुरू

### प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालकांचे आदेश; दहावी-बारावीला सूट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

राज्यातील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटपडताळणी (उपस्थिती पडताळणी) करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. यासंदर्भात माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे शिक्षण संचालक महेश पालकर आणि प्राथमिक विभागाचे शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी संयुक्त आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार राज्यभरातील शाळांमध्ये तीन दिवस विशेष मोहीम राबवून विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती तपासली जाणार आहे. मात्र, दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेतून वगळण्यात आले असून त्यांच्या बाबतीत बोर्ड परीक्षेतील उपस्थिती ग्राह्य धरली जाणार आहे.

या संपूर्ण मोहिमेसाठी शिक्षण विभागाकडून स्वतंत्र पथके नियुक्त केली जाणार आहेत. गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षणाधिकारी, लेखाधिकारी तसेच वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकातील कर्मचारी यामध्ये सहभागी असतील. शाळांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी उपस्थित आहेत की नाही याची खात्री करण्याची जबाबदारी या पथकांवर सोपविण्यात येणार आहे. या कामाचे नियोजन संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांकडून करण्यात येणार आहे.

दरम्यान, या पटपडताळणीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. स्टुडन्ट पोर्टलवर मुख्याध्यापक, क्लस्टर हेड, गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र लॉगिन सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

शाळांना भेट देणारे पथक या लॉगिनच्या माध्यमातून हजर व गैरहजर विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंद करणार आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, सध्या वार्षिक परीक्षा सुरू असल्यामुळे शिक्षक आणि मुख्याध्यापकांवर आधीच मोठा ताण आहे. अशा परिस्थितीत या पटपडताळणीमुळे शालेय कामकाज आणि परीक्षा व्यवस्थापनात अडथळा निर्माण होऊ शकतो, अशी चिंता शिक्षकांकडून व्यक्त केली जात आहे.



### ११, १५ आणि २२ एप्रिलला पडताळणी

शिक्षण विभागाच्या या निर्णयानुसार इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची पटपडताळणी नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पी. ए. टी) परीक्षांच्या दिवशी म्हणजेच ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, गणित आणि इंग्रजी या विषयांच्या परीक्षेदरम्यान ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. तसेच इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांची पडताळणी मराठी, इंग्रजी आणि भौतिकशास्त्र या विषयांच्या परीक्षेच्या दिवशी केली जाणार आहे.

### शिक्षकांवरील ताण व डिजिटल पडताळणीची मागणी

यंदा प्रत्यक्ष पडताळणीऐवजी डिजिटल पद्धतीनेच ही प्रक्रिया राबवावी आणि पुढील वर्षी प्रत्यक्ष पडताळणी करावी, अशी मागणी माजी शिक्षक आमदार दत्तात्रेय सावंत यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे. या संपूर्ण प्रक्रियेबाबतच्या सविस्तर सूचना शिक्षण विभागाकडून ७ एप्रिलपर्यंत जारी केल्या जाणार आहेत. या सूचनांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असून राज्यभरातील शाळांमध्ये या मोहिमेची काटेकोर अंमलबजावणी होणार आहे. विद्यार्थ्यांची अचूक उपस्थिती नोंदवणे, शाळांमधील प्रत्यक्ष उपस्थितीची स्थिती समजून घेणे आणि शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, याची अंमलबजावणी करताना शिक्षकांवरील वाढणारा ताण आणि परीक्षा कालावधीतील अडचणी याकडेही प्रशासनाने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.